# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

एम. ए. भाग–१ : राज्यशास्त्र

# संशोधन पद्धती

## (Research Methodology)

**सत्र १ : पेपर– RM**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०२४

एम. ए. (राज्यशास्त्र) भाग-१ पेपर RM

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ५००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89345-53-7

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


■ **अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र** ■

अध्यक्ष - **डॉ. रविंद्र पांडुरंग भणगे**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. प्रकाश रामचंद्र पवार**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. अरुण मारुतीराव चव्हाण**
  भोगावती महाविद्यालय, कुरुकली, जि. कोल्हापूर
- **डॉ. शिरीषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. कराड,
  जि. सातारा
- **डॉ. सचिन महादेव पाटील**
  श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. विक्रमराव एन. पाटील**
  शंकरराव जगताप जगताप आर्टस कॉलेज, वाघोली,
  जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मेघा संजय पाटील**
  कै. मालती व. पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. संतोष केशव खडसे**
  कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर,
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. श्रद्धा विनोद कोठावळे**
  सहकारभूषण मा. एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड,
  ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
- **डॉ. राहुल दत्ता मांडणीकर**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, २९६८, 'सी',
  दसरा चौक, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. बाळ अनंत कांबळे**
  धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा
- **डॉ. वासंती प्रतापचंद्र रासम**
  घरोंदा ३८४/३८५ आर. के. नगर सोसायटी नं. ५,
  मोरेवाडी, कोल्हापूर
- **डॉ. अनिल देवगौडा पाटील**
  आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. सिकंदर आप्पासाहेब जमादार**
  राजहंस हौसिंग कार्पोरेशन प्लॉट नं. ०९, विजय नगर,
  इस्ट सांगली मिरज रोड, सांगली
- **प्रा. रमेश दिनकर डुबल**
  किसन वीर महाविद्यालय वाई, जि. सातारा

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' या शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूरशिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक एम. ए. भाग एक च्या राज्यशास्त्र विषयाच्या पेपर–RM सत्र एक साठी 'संशोधन पद्धती' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

संशोधन पद्धती यामध्ये संशोधन पद्धतीचा परिचय, संशोधनाची प्रक्रिया, संशोधन पद्धती, संशोधन अहवाल लेखन या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. त्याचप्रमाणे राज्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ मधील प्राध्यापक डॉ. प्रकाश पवार, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. जयश्री कांबळे, डॉ. नेहा वाडेकर, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे तसेच केंद्रातील सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. रविंद्र भणगे**

राज्यशास्त्र अधिविभाग,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**संशोधन पद्धती**
**एम. ए. भाग–१ : राज्यशास्त्र**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. शिवाजी सुबराव पाटील**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | १ |
| **डॉ. सुखदेव उंदरे**<br>राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २ |
| **डॉ. सागर जाधव**<br>आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कासेगांव, ता. वाळवा, जि. सांगली | ३ |
| **डॉ. रविंद्र भणगे**<br>राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ४ |

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. रविंद्र भणगे**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | संशोधन पद्धतीचा परिचय | १ |
| २. | संशोधनाची प्रक्रिया | १५ |
| ३. | संशोधन पद्धती | ३७ |
| ४. | संशोधन अहवाल लेखन | ५५ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२३-२४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक १
# संशोधन पद्धतीचा परिचय

**अनुक्रमणिका**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ संशोधन पध्दतीचा अर्थ व परिचय

१.२.२ सामाजिक शास्त्रांमधील संशोधन पध्दती

१.२.३ राज्यशास्त्रामधील संशोधन

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.४ स्वयंअध्ययन प्रश्न व वस्तुनिष्ठ उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्टे :

संशोधन पद्धती हा अभ्यास विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. या घटकाच्या अभ्यासानंतर आपणांस खालील बाबी लक्षात येतील.

अ) संशोधन पध्दतीचा अर्थ, व्याख्या, विकास लक्षात येईल.

ब) सामाजिक शास्त्रामधील संशोधन पद्धतीचे महत्त्व समजून घेता येईल.

क) राज्यशास्त्रामधील संशोधनाबद्दलची माहिती समजून येईल.

## १.१ प्रास्ताविक :

आज कोणत्याही विषयाचा पद्धतशीरपणे अभ्यास करण्यासाठी संशोधन पध्दतीची आवश्यकता असते व ही पद्धती माहीत असावी लागते. सामाजिक शास्त्रांचा पद्धतशीर अभ्यास दुसऱ्या महायुद्धानंतर युरोप व अमेरिका या देशामधून होऊ लागला व त्या अभ्यासासाठी नवनवीत संशोधन पद्धती विकसित होऊ लागली. राज्यशास्त्रामध्येही डेव्हिड ईस्टन, लॉसवेल, अल्मंड पॉवेल इ. अमेरिकन विचारवंतानी नवीन संशोधनाची

तंत्रे, तसेच आंतरविद्याशास्त्रीय अभ्यास विकसित केला. व २० व्या शतकाच्या मध्यानंतर सामाजिक शास्त्रे तसेच राज्यशास्त्रामध्ये संशोधन पद्धतीला महत्त्व निर्माण झाले. अर्थात प्राचीन काळामध्ये ग्रीक विचारवतांनी, भारतीय विचारवंतानीही अभ्यासाची विशिष्ट पध्दती विकसित केली होती. ग्रीक तत्वज्ञ ॲरिस्टॉटल यांनी तुलनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला होता. भारतात कौटिल्याने निरीक्षण व अनुभवावर आधारीत आपली राजकीय मते मांडली होती. आज प्रत्येक विषयात संशोधन पद्धतीमुळे अभ्यासात व्यवस्थितपणा आला असून चांगल्या प्रकारचे निष्कर्ष निघत आहेत. एकूणच संशोधन पद्धतीमुळे सामाजिक शास्त्रे सूत्रबद्ध, शास्त्रशुद्ध झालेली आहेत.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ संशोधन पद्धतीचा अर्थ व परिचय

संशोधन हे मानवी जीवनाच्या गुणवत्तेमध्ये वाढ करण्यास मदत करते. संशोधनामध्ये ज्ञानाचा सातत्याने शोध घेतला जातो. प्राचीन काळापासून भारत, चीन, ग्रीक विचारवंतानी विविध क्षेत्रांमध्ये सातत्याने शोध सुरू ठेवले व त्यातुनच पुढे विशिष्ट अशी संशोधन पध्दती निर्माण झाली.

संशोधनाचा अर्थ : रिसर्च – Research हा शब्द 'फ्रेंच' शब्द recherch म्हणजे 'शोधत जाणे' यावरून आला आहे. या शब्दाचा वापर साधारणपणे इ.स. १५७७ मध्ये झाला. संशोधन ही सातत्याने चालणारी बौध्दिक प्रक्रिया आहे. यामध्ये जुन्या ज्ञानामधील त्रृटी दूर करुन नवीन ज्ञानाची भर घातली जाते. इंग्रजी भाषेतील Research या शब्दाचा मराठी अर्थ 'संशोधन' हा आहे. याचा अर्थ 'सं' म्हणजे 'संपूर्ण' आणि 'शोधन' म्हणजे 'शोधणे' असा आहे. या ठिकाणी संशोधन म्हणजे जुन्या ज्ञानाचे परीक्षण करुन नवीन ज्ञानाचे संपादन किंवा निर्मिती करणे होय. थोडक्यात, संशोधन हे नित्य नव्याचा शोध घेत असते.

**व्याख्या :**

संशोधनाच्या विविध व्याख्या आहेत कारण संशोधन हे अनेक बाबींचा उलगडा करीत असते. संशोधनाची एखादी विशिष्ट अशी व्याख्या करणे शकय नाही. तरीही ढोबळमानाने संशोधनाच्या खालील व्याख्या करणे शक्य नाही. तरीही संशोधनाच्या खालील व्याख्या सामाजिक शास्त्रज्ञ व राज्यशास्त्रामधील विचारवंतानी केल्या आहेत.

**१) स्लेसिंगर व मेरी स्टिमेन्सन :** सामाजिक शास्त्रांच्या ज्ञानकोषामध्ये या विचारवंतानी संशोधनाची पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे. 'ज्ञानाचा विस्तार, सुधारणा व पडताळा या बाबतीत सामान्यीकरण करण्याच्या हेतुने गोष्टी, संकल्पना व प्रतिके यांची मांडणी करणे म्हणजे संशोधन होय.'

("Research is the manipulation of things, concepts or symbols for the purpose of generalising to extend, correct or verify knowledge.")

**२) वेब्स्टर डिक्शनरी :** ''संशोधन म्हणजे तथ्ये वा तत्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकीत्सा किंवा परीक्षण होय किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत व पध्दतशीरपणे केलेले परिश्रम होय.''

**३) पी.व्ही.यंग :** ''संशोधन पध्दती म्हणजे नवीन तथ्ये शोधण्यासाठी अथवा जुन्या तथ्यांचे परिक्षण करण्यासाठी या तथ्यांमधील अनुक्रम, परस्पर संबंध, कार्यकारण भाव या विषयी स्पष्टीकरणे आणि सामान्यीकरण प्रस्थापित करण्याची एक पध्दतशीर प्रक्रीया होय.''

**४) जॉन क्रेसवेल :** 'संशोधन ही एखादया विषयाची किंवा संमस्येबद्दलची आपली समज वाढवण्यासाठी माहिती गोळा करण्यासाठी आणि विश्लेषण करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या चरणांची प्रक्रिया आहे. यामध्ये तीन चरणांचा समावेश आहे – प्रश्न मांडणे, प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी डेटा गोळा करणे आणि प्रश्नाचे उत्तर सादर करणे.'

**५) पियरसन, कॉर्ल :** संशोधनात तथ्यांचे वर्गीकरण, त्यांचा क्रम व त्यांचे सापेक्ष महत्व शोधणे ही प्रक्रिया म्हणजेच 'संशोधन पध्दती' होय.

**६) ऑक्सफर्ड डिक्शनरी :** 'एखाद्या विषयाचा काळजीपुर्वक अभ्यास, विशेषत: त्याबद्दल नवीन तथ्ये किंवा माहिती शोधण्यासाठी वैज्ञानिक/वैद्यकीय केलेला प्रयत्न म्हणजे संशोधन होय.'

**७) हेरिंग :** ज्यामध्ये कालबाहय गृहितके रद्द करुन सृजनक्षमता विकसित केली जाते त्याला संशोधन म्हणतात.

एकंदरीत, संशोधन पध्दती म्हणजे पध्दतशीरपणे ज्ञान मिळविण्याची प्रक्रिया होय. संशोधन प्रक्रियेमुळे संबंधित विषयाच्या ज्ञानाची कक्षा सातत्याने वाढत असते. संशोधनामुळे विद्यमान तथ्यांची व्याप्ती वाढत असते. संशोधन पध्दतीमुळे ज्ञानाची चौकटीबध्द चिकीत्सा करुन, त्याचे विश्लेषण करून नवज्ञान निर्मिती केली जाते.

संशोधन पध्दती कोणती आहे. त्यानुसार सदरचे संशोधन शास्त्रीय आहे किंवा नाही, ज्ञानाची पातळी किती खोल आहे या बाबी लक्षात येतात. केवळ माहिती गोळा करणे किंवा संकलित करणे हे संशोधन पध्दतीमध्ये अपेक्षित नाही तर त्या माहितीचे योग्य प्रकारे विश्लेषण करुन निष्कर्ष काढणे हे अपेक्षित असते.

**संशोधनाची वैशिष्ट्ये:**

संशोधन हे नवनवीन ज्ञान प्राप्तीसाठी आवश्यक असते. याची काही वैशिष्टये खालील प्रमाणे सांगता येतात.

**१) व्यवस्थितपणा :**

संशोधन हे व्यवस्थितपणे (systematic) चालणारी प्रक्रिया आहे. संशोधन पध्दतीमध्ये व्यवस्थितपणा आवश्यक असतो. भावना, प्रेरणा यापेक्षा ध्येय व उद्दिष्ट संशोधन आधारलेले असले पाहिजे.

**२) समीक्षात्मक/चिकित्सक :**

संशोधन हे समीक्षा करणारे चिकीत्सक असले पाहिजे. मुळात संशोधन ही प्रक्रियाच चिकीत्सक असते.

**३) संशोधन पध्दतीचे ज्ञान :**

संशोधकाला संशोधन पध्दतीचे सखोल ज्ञान असले पाहिजे. संशोधन कार्यासाठी योग्य प्रणालीची निवड करणे आवश्यक असते.

**४) तटस्थता :**

चांगली संशोधन पध्दती ही तटस्थ असते. यामध्ये निष्कर्षांची मांडणी तटस्थपणे करावी लागते. व्यक्ती किंवा समाजाचा धर्म, जात, पंथ, वर्ग, संस्था, संघटना, राजकीय व्यवस्था ही श्रेष्ठ नसून अभ्यासांती येणारे निष्कर्ष हेच महत्वाचे असतात.

**५) स्पष्टता :**

संशोधनामध्ये व संशोधन पध्दती मध्ये स्पष्टता असणे आवश्यक असते. स्पष्टता असणारी संशोधन पध्दतीच योग्य व चांगला निष्कर्ष देऊ शकते. सभोवतालच्या परिस्थितीचा संशोधनविषयीचा परस्पर संबंध साधून त्याचे स्पष्टीकरण करणे आवश्यक असते.

**६) नवज्ञान निर्मिती :**

संशोधन पध्दती ही संशोधना मधून नवीन ज्ञान-निर्मिती होण्यासाठी आवश्यक असते. नवज्ञान निर्मिती ही संशोधनाची मुलभूत अट आहे. या ज्ञानाचा उपयोग मनुष्याच्या भौतिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रगतीसाठी होत असतो. संशोधनामुळे ज्ञानाची कक्षा वाढते.

**संशोधनाचे महत्व :-**

संशोधन हे समाजाच्या उन्नतीसाठी अत्यंत आवश्यक असते. संशोधनाच्या सहाय्याने सामाजिक शास्त्राला एक प्रकारची शिस्त निर्माण झाली आहे. सामाजिक शास्त्राला पद्धतशीरपणा, तटस्थपणा येण्यासाठी संशोधन पद्धती आवश्यक आहे. संशोधनामुळे सिद्धांत व व्यवहार यामध्ये चांगला मेळ घालता येतो. शासनसंस्थेला आपले धोरण ठरवितांना संशोधनावरील निष्कर्षांचा अभ्यास करून धोरण ठरविता येते. एकूणच मानवी जीवन समृद्धीसाठी संशोधन आवश्यक आहे.

### १.२.२ सामाजिक शास्त्रामधील संशोधन पध्दती :

सामाजिक शास्त्रामधील संशोधन पद्धती ही शुध्द शास्त्राच्या संशोधन पद्धतीपेक्षा वेगळी असते. असे असले तरीही दुसऱ्या महायुद्धानंतर सामाजिक शास्त्रज्ञांनी सामाजिक शास्त्रे तसेच राज्यशास्त्राला जास्तीत जास्त

वैज्ञानिक पद्धती प्रमाणे स्वरुप देण्याचा प्रयत्न केला आहे. कोणत्याही विषयाच्या अभ्यासासाठी संशोधन पद्धती आवश्यक असते. या ठिकाणी सामाजिक शास्त्राच्या संशोधन पद्धती व राज्यशास्त्राच्या संशोधन पद्धती एकसारख्याच आहेत. कारण राज्यशास्त्राचे स्वरुप हे पुर्णत: कला नाही. तसेच शुद्ध शास्त्रही नाही तर ते खऱ्या अर्थाने सामाजिक शास्त्र आहे. त्यामुळे राज्यशास्त्राच्या अभ्यास पद्धती या सामाजिक शास्त्राच्या अभ्यास पद्धतीप्रमाणेच आहेत.

बर्नाड यांच्या मते, संशोधनात तथ्यांचे परीक्षण, सत्यापन, व्याख्या, वर्गीकरण, संघटन, स्थिती, ज्ञान इ. प्रक्रियांचा तसेच पूर्वानूमान व उपयुक्तता यांचा जेव्हा समावेश केला जातो तेव्हा त्याला 'संशोधन पद्धती' असे म्हणतात.

साधारणपणे संशोधक संशोधन विषय समस्येच्या उपयोजनानुसार चाचणी, पद्‌निश्चयन श्रेणी, प्रश्नावली, समाजमिती, मुलाखत इ.चा जेंव्हा आधार घेतो व निष्कर्ष काढतो तेंव्हा त्यास संशोधन पध्दती म्हणतात.

सामाजिक शास्त्रामध्ये खालील प्रकारच्या संशोधन पध्दती आहेत. याच संशोधन पध्दतींचा अवलंब राज्यशास्त्राच्या संशोधनामध्येही केला जातो. या संशोधन पध्दतींना संशोधनाचे वेगवेगळे दृष्टीकोन, अभ्यास पध्दती असेही म्हटले जाते. साधारणपणे खालील संशोधन पध्दती आहेत.

**१) ऐतिहासिक संशोधन पध्दती :**

यामध्ये ऐतिहासिक दस्तऐवज, संदर्भ, घटना यांचा आधार घेऊन संशोधन केले जाते. भूतकाळामधील विशिष्ट घटना व त्याचा परिणाम शिलालेख, चरित्रे, वैयक्तिक डायरी, राजाने काढलेले आदेश इ.चा समावेश ऐतिहासिक पध्दती मध्ये होतो. सेबाईन डनिंग यांनी ऐतिहासिक दृष्टिकोनाला महत्व दिले आहे. सेबाईनच्या मते, ऐतहासिक पध्दतीच्या अभ्यासामुळे पिढयानपिढया हस्तांतरित होणाऱ्या संस्कृतीचा राजकीय अभ्यास होतो, प्लेटो, ॲरिस्टॉटल या ग्रीक विचारवंतांनी तर कौटिल्य या भारतीय विचारवंताने ऐतिहासिक अभ्यास पध्दतीचा आधार घेऊन सिध्दांत मांडले. ॲरिस्टॉटल यांचा 'द पॉलिटिक्स', कौटिल्याचा 'अर्थशास्त्र', मॅकीयाव्हलीचा 'प्रिन्स', कार्लमार्क्सचा 'दास कॅपिटल', कम्युनिस्ट मॅनिफेस्टो इ.ग्रंथ पुढे ऐतिहासिक दस्तऐवज झाले आहेत. समाजशास्त्रामधील ऑगस्ट कॉम्ट, हर्बर्ट स्पेन्सर, मॅक्स वेबर, हॉबहाऊस यांनी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा पाया रचला आहे. छत्रपती संभाजी महाराज यांचा 'बुधभूषण' हा ग्रंथ सुध्दा एक राजकीय विचारावरील ऐतिहासिक दस्तऐवज आहे.

राज्यसंस्थांच्या उदयाचा अभ्यास, ॲरिस्टॉटलने केलेला १५८ राज्यघटनांचा तुलनात्मक अभ्यास इ.चा. समावेश ऐतिहासिक संशोधन पध्दतीमध्ये होतो.

**२) निगमनात्मक पध्दती** :

तर्कशास्त्रामधील अनुमानावर आधारीत या पध्दतींचा विकास झाला आहे. ज्ञानप्राप्तीची ही अत्यंत महत्वाची संशोधन पध्दती मानली जाते. निगमनात्मक अनुमान पध्दतीला निगामी अनुमान पध्दती असेही

म्हणतात. यामध्ये 'नि' म्हणजे 'खाली' आणि 'गम' म्हणजे 'जाणे' म्हणजेच निगामी याचा अर्थ 'खाली जाणारा' असा आहे. या पध्दतीमध्ये 'सामान्य विधानांच्या पातळीवरुन विशेष विधानांच्या पातळीकडे जाणारे निष्कर्ष किंवा अनुमान किंवा तत्व' काढण्यात येते. सामाजिक शास्त्रे तसेच राज्यशास्त्रामध्ये निगमनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केला जातो. प्लेटोने या पध्दतीचा वापर केला होता.

**३) विगमनात्मक किंवा विगामी पध्दती :**

यामध्ये विगमन मधील 'वि' म्हणजे 'उलट' तर 'गम' म्हणजे 'जाणे' म्हणजेच विरुध्द किंवा उलट जाणारे होय. याचा अर्थ 'विशिष्टाकडून सामान्याकडे जाणारे अनुमान' होय. विगमनात्मक अनुमान हे विशेषाच्या खालच्या पातळीवरुन सामान्याच्या वरच्या पातळीवर जाते. येथे कमी व्यापक समूहाकडून जास्त व्यापक समुहाकडे जाणारे अनुमानाचे किंवा निष्कर्षाचे स्वरुप असते. थोडक्यात विगमनात्मक संशोधनामध्ये विशिष्टाकडून सामान्यकडे जाणारे तत्व शोधले जाते. या पध्दतीचा वापर सामाजिक शास्त्रामध्ये मोठ्या प्रमाणावर केला आहे. ॲरिस्टाटल यांनी या पध्दतीवर भर दिला.

लिटो, ॲरिस्टॉटल, मॅकियाव्हली यांनी विगमन-निगमन या दोन्हीही तर्कशास्त्रामधील संशोधन पध्दतीचा वापर केलेला दिसून येतो. या तार्किक आधारावरच पुढे सामाजिक शास्त्रांना जास्तीत जास्त वैज्ञानिक स्वरुप देण्याचा प्रयत्न आधुनिक समाजशास्त्रज्ञांनी केलेला आहे.

**४) तुलनात्मक संशोधन पध्दती :**

ऐतिहासिक, तार्किक पध्दती बरोबरच सामाजिक शास्त्राच्या संशोधनासाठी तुलनात्मक संशोधन पध्दतीचाही वापर केला जातो. राज्यसंस्था, सामाजिक संस्था या परस्परांशी बांधलेल्या असतात. ॲरिस्टॉटलने १५८ राज्यघटनांचा तुलनात्मक अभ्यास करून ग्रीक नगर राज्यासाठी राज्यघटना तयार केली. प्लेटोनेही आदर्श राज्य व राजा कसा असावा यासाठी विविध शासनपध्दतींचा अभ्यास केला. या पध्दतीचा मोठया प्रमाणात वापर उरखाईम, हॉबहाऊस, व्हीलर, मॉरिस गीन्सबर्ग इ. समाजशास्त्रज्ञानी केला. आज राज्यशास्त्रामध्ये अमेरिकेची अध्यक्षीय शासनपध्दती व भारताची संसदीय शासन पध्दती, न्यायालयीन व्यवस्था यांचा तुलनात्मक पध्दतीने अभ्यास केला जातो.

**५) तत्वज्ञानात्मक संशोधनाची पध्दती :**

तत्वज्ञानाचा आधार घेऊन निरीक्षण करुन सिध्दांत मांडण्याची प्रक्रिया या संशोधन पध्दतीमध्ये आहे. यामध्ये संशोधक प्रथमत: संबंधित विषयाची तत्वज्ञानात्मक बैठक मांडत असतो व त्यानंतर माहितीच्या आधारे, तार्कीक पध्दतीने निष्कर्ष काढून नियमावली किंवा सिध्दांतन करीत असतो. अर्थात ही पध्दती अवघड व किचकट आहे. तसेच अनेकवेळेस वैयक्तिक मुल्ये, विचार यावर ही पध्दती अवलंबून असते. त्यामुळे मांडलेला सिध्दांत वास्तवात येईल असे नाही. उदा. प्लेटोने सांगितलेल्या तत्वज्ञानी राजा, आदर्श राज्य इ. संकल्पना वास्तवात आल्या नाहीत.

### ६) शास्त्रीय संशोधन पध्दती :

आधुनिक काळामध्ये प्रामुख्याने दुसऱ्या महायुध्दानंतर सामाजिक शास्त्रामध्ये मोठया प्रमाणावर शास्त्रीय संशोधन पध्दतीचा अवलंब होऊ लागला. साधारणपणे ज्या वेळेस संशोधक संशोधन करीत असताना वस्तुनिष्ठतेला महत्व देतो, पडताळ्यावर भर देतो तेंव्हा त्या संशोधन पध्दतीस शास्त्रीय संशोधन पध्दती म्हणतात. यामध्ये निश्चितता, स्पष्टपणा, निरीक्षण, गृहीतके निष्कर्ष इ. बाबींचा समावेश असतो. काही वेळेस विज्ञानामधील संकल्पना, सिध्दांत यांचा वापर या पध्दतीमध्ये केला जातो. उदा. कार्ल डवाइश यांनी मांडलेला राजकीय संसूचन (Political Communication) हा सिध्दांत मांडताना विज्ञानामधील लूलशीपशींळली म्हणजे संतांत्रिकी विज्ञान याचा आधार घेतला आहे.

### ७) प्रयोगात्मक संशोधन पध्दती :

प्रयोगात्मक संशोधन पध्दती विज्ञानावर आधारलेली आहे. यामध्ये एखाद्या बाबींविषयी अंतिम निष्कर्ष काढण्यापूर्वी सातत्याने त्या संदर्भात प्रयोग केले जातात. सामाजिक शास्त्रामध्ये कुटूंब, समाज, विविध व्यवस्था याच एक प्रकारच्या प्रयोगशाळा असतात. या पध्दतीमध्ये सातत्याने नवनवीन सिध्दांत मांडले जातात किंवा तशा प्रकारचा प्रयत्न केला जातो. आज सामाजिक शास्त्रामध्ये विज्ञानामधील अनेक बाबींचा वापर केला जातो. उदा. संख्याशास्त्र, गणित यांचा वापर निवडणुकीमधील निकालाच्या विश्लेषणासाठी केला जातो. मानसशास्त्राचा उपयोग मतदार वर्तनासाठी केला जातो.

### ८) विश्लेषणात्मक संशोधन पध्दती :

जॉर्ज सिमेल आणि डुरखाईम यांनी या पध्दतीचा मोठ्या प्रमाणावर पुरस्कार केला. या पध्दतीमध्ये कोणत्याही सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण केले जाते. हे विश्लेषण करीत असताना काही निकष लक्षात घेतले जातात. हे विश्लेषण करीत असताना विविध सामाजिक शास्त्रामधील तसेच विज्ञानामधील ज्ञानशाखांची मदत घेतली जाते. या पध्दतीमध्ये विश्लेषणावर भर देऊन निष्कर्ष काढले जातात. राज्यशास्त्रात डेव्हिड ईस्टन, आत्मंड व पॉवेल, ग्रॅहम वालास यांनी या संशोधन पध्दतीचा पुरस्कार केला. आज आधुनिक राज्यशास्त्राला आधुनिक राजकीय विश्लेषण असेही म्हटले जाते. या पध्दतीमध्ये विशिष्ट गृहीतके मानून अभ्यास केला जातो.

### ९) वर्णनात्मक पध्दती :

वर्णनात्मक संशोधन पद्धतीमध्ये सामाजिक, राजकीय तसेच आर्थिक घडामोडींचे केवल वर्णन करण्यात येते. पारंपारिक सामाजिक शास्त्रामध्ये या पध्दतीचा मोठया प्रमाणावर वापर केला आहे. या पध्दतीमध्ये त्या घडामोडीची समीक्षा, चिकीत्सा केली जात नाही. केवळ वर्णनावरून काही प्रमाणात निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला जातो. आज ही पध्दती मागे पडली आहे. या ऐवजी विश्लेषणात्मक, प्रायोगिक संशोधन पध्दती जास्त प्रमाणात वापरल्या आहेत. वर्णनात्मक पध्दतीमध्ये गृहीतके, उद्दिष्टे यावर भर दिला जात नाही.

**१०) मूलभूत संशोधन पध्दती :**

या संशोधन पध्दतीला शुध्द संशोधन, मुलभूत किंवा मूळ संशोधन पध्दती असेही म्हणतात. यामध्ये बौध्दिक चिकित्सा करुन ज्ञानप्राप्ती केली जाते. मुख्यत: विज्ञानामधील संशोधन हे मुलभूत संशोधन मानले जाते. या संशोधनामधून काही सुत्रे निर्माण केली जातात व त्या आधारे विश्लेषण केले जाते. उदा. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र इ.

**११) उपयोजित संशोधन पध्दती :**

यामध्ये संशोधनामधून निर्माण झालेले सिध्दांत, नियम यांचे प्रत्यक्षात वापर करुन निष्कर्ष काढले जातात. याला उपयोजित संशोधन पध्दती म्हणतात. उदा. समाजातील तसेच मानवी जीवनातील समस्या शोधून त्यावर उपाय शोधणे.

**१२) अनुभवजन्य संशोधन पध्दती :**

यामध्ये संशोधक प्रत्यक्ष संशोधन कृतीमध्ये सहभागी असतो. प्रत्यक्ष वर्तमानकाळावर आधारीत संशोधन केले जाते. अनुभवाद्वारे प्राप्त होणारे ज्ञान हेच खरे ज्ञान असे यामध्ये मानले जाते. विशिष्ट परिस्थितीमध्ये होणाऱ्या घटना आणि व्यक्ती किंवा समाज यांच्या कार्याचा संबंध लक्षात घेऊन निष्कर्ष काढले जातात. वर्तनवादी विचारवंतानी या अभ्यास पध्दतीला प्राधान्य दिले. या संशोधन पध्दतीमुळे सामाजिक शास्त्रांना शास्त्रीय दर्जा मिळविण्यासाठी मदत झाली. रुसो, बेंथॅम, आर्थर बेंटले, डेव्हिड ईस्टन, ग्रॅहम वालास, अल्मंड व पॉवेल इ. राज्यशास्त्रज्ञांनी अनुभववादी संशोधन पध्दतीला महत्व दिले.

**१३) आंतरविद्याशाखीय संशोधन पध्दती :**

या संशोधन पध्दतीमध्ये केवळ एकाच विषयाला गृहीत धरुन संशोधन केले जात नाही. त्याऐवजी विविध विषयांच्या महत्वाच्या बाबी लक्षात घेऊन त्याचा उपयोग करुन संशोधन केले जाते. मानवी जीवन हे सर्वस्पर्शी असते. मानवाच्या विविध समस्या असतात. त्यामुळे या समस्यांचे निराकरण केवळ एक विषय किंवा ज्ञानशाखा करू शकत नाही. त्यामुळे संशोधकाने आंतरविद्याशास्त्रीय अभ्यास पध्दतीवर भर दिला पाहिजे. यामध्ये इतिहास, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, संख्याशास्त्र, गणित तसेच इतर ज्ञानशाखामधील अध्ययन पध्दतींचा एकत्रित वापर करण्यावर भर दिला जातो. डेव्हिड ईस्टन यांनी वर्तनवादी दृष्टीकोन मांडताना आंतरविद्याशास्त्रीय संशोधन पध्दतीला महत्व दिले आहे. आज निवडणूक अंदाज शास्त्र हे याचे उत्तम उदाहरण आहे. यामध्ये मतदार वर्तनाचा अभ्यास केला जातो. त्याबरोबर संख्याशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र इ. च्या आधारावर निवडणूकांचे विश्लेषण केले जाते. निवडणूक पूर्व जनमताचा कौल कोणाकडे आहे याचाही अभ्यास केला जातो.

**१४) मुल्यमापनात्मक संशोधन पध्दती :**

या संशोधन पध्दतीमध्ये मुल्यमापनावर भर दिला जातो. उदा. एखादी शासकीय योजना, कल्याणकारी प्रकल्प यांचे मुल्यमापन करुन सदरची योजना भविष्यात चालू ठेवावी की बंद करावी यासाठी या संशोधन

पध्दतीचा उपयोग होतो. उदा. म. गांधी रोजगार हमी योजना, हगणदारी मुक्त ग्रामयोजना, मोफत औषध वाटप योजना, दारिद्रयाच्या विविध योजना. या संशोधन पध्दतीमध्ये शासनाच्या विविध कार्यालये. तसेच बिगर शासकीय संस्थांच्या कार्याचेही मुल्यमापन केले जाते व त्यांची उपयोगिता लक्षात येते.

**१५) आदर्शवादी संशोधन पध्दती :**

ही संशोधन पध्दती प्राचीन काळापासून अस्त्विात आहे. यामध्ये संशोधक स्वत:च्या बुध्दीच्या तार्किक शक्तीच्या जोरावर आपली मते तसेच सिध्दांत मांडत असतो. यामध्ये कल्पनाशक्तीचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. अमूर्त बाबींवर आधारीत संशोधन केले जाते. मुल्ये, नैतिकता, आदर्श यांना महत्व दिले जाते व आदर्श समाज तसेच राज्य निर्माण होण्याच्या दृष्टीने सिध्दांत मांडले जातात. उदा. प्लेटोचा आदर्श राजा, प्लेटोचा स्त्रियाविषयक साम्यवादी विचार, मार्क्सची राज्यविरहीत, वर्गविरहीत समाजरचना. अनेक वेळेस या सिध्दांतामध्ये कल्पना विलास जास्त असल्यामुळे केवळ युटोपिया - स्वप्नरंजन पध्दतींचा अविष्कार होत असतो.

या संशोधनपध्दतीमध्ये मानवी जीवनाच्या समस्येचे समाधानकारक उत्तर न सापडल्यामुळे सामाजिक शास्त्रांनी जास्तीत जास्त अनुभववादी, प्रयोगवादी, शास्त्रीय, आंतरविदयाशास्त्रीय इ. आधुनिक संशोधन पध्दतीचा वापर करण्यावर भर दिला आहे.

थोडक्यात, मानवी जीवन जास्तीत जास्त समृध्द, शांततामय होण्याच्या दृष्टीने वरील विविध संशोधन पध्दतीमध्ये उपाययोजना सांगितल्या आहेत. वरील संशोधन पध्दतीमध्ये काही गुण-दोष आहेत. कोणतीही एकच एक संशोधन पध्दती परिपूर्ण नाही. त्यामुळे कोणतीही संशोधन पध्दती पूर्णपणे कालबाहय होत नाही किंवा कालबाह्य करता येत नाही. त्यामुळे प्रत्येक संशोधन पध्दतीमधील चांगल्या गुणांचा (मेरिट) उपयोग करुन सामाजिक शास्त्रांचा अभ्यास तसेच संशोधन समृध्द करणे आवश्यक आहे. यामध्येच संपूर्ण मानव समाजाची समृध्दी व अस्तित्व टिकविण्याची क्षमता वाढणारी आहे.

## १.२.३ राज्यशास्त्रातील संशोधनाचे विषय :

राज्यशास्त्रामध्ये अनेक विषयावरती संशोधन केले जाते. संशोधन करीत असताना वर चर्चीलेल्या सर्व संशोधन पध्दतीचा वापर केला जाते. या संशोधन पध्दतीच्या माध्यमातुन समाजातील आर्थिक, सामाजिक, राजकीय स्थिती किंवा परिस्थिती, प्रश्न त्यावरील उपाय, देशा देशातील संबंध व त्यांचे संघर्ष व उपाय स्थानिक पासून ते देशपातळीवरील नेतृत्व इत्यादी अभ्यास विषयाचा समावेश होतो. जेणे करुन या विषयाच्या अभ्यासावर राज्यशास्त्रातील संशोधनाचे काम चालते असे म्हणता येईल. ते विषय खालीलप्रमाणे आहेत.

**१. शासन संस्था :** देशातील ज्या शासनसंस्था आहेत. त्याचे कार्ये, रचना, त्याच्या कार्याची अंमलबजावणी इत्यादी गोंष्टीचा अभ्यास केला जातो. संसद, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ घटकराज्यातील विधीमंडळ, विधानपरिषद इत्यादी शासन संस्थेचा अभ्यास केला जातो.

२. **शासनपध्दती :** जगामध्ये अनेक शासनपध्दती अस्त्विात आहेत. त्यामध्ये संसदीय शासनपध्दती, अध्यक्षीय शासनपध्दती, हुकूमशाही शासनपध्दती अशा शासनपध्दतीचाअभ्यास राज्यशास्त्राच्या दृष्टीकोनातून केला जातो. त्यामुळे प्रामुख्याने जगातील सर्व शासनव्यवस्थेला अंमलबजावणी त्याचे गुण दोष यासर्व गोंष्टीचा विचार या संशोधनात केला जातो.

३. **शासकीय योजना :** ज्या ज्या शासनसंस्था असतात किंवा शासनपध्दती कार्यरत असतात त्या कार्यपध्दती किंवा शासनसंस्था हे अनेक नीतिनियम कायदे, योजना तयार करीत असतात. अशा कायद्याचा शासकीय योजना, धोरणांचा समाजामध्ये कितपत लाभ घेतला आहे किंवा त्याचे चांगले वाईट परिणाम झाले आहे. याचाही अभ्यास राज्यशास्त्राच्या संशोधणामध्ये केला जातो. योजनामध्ये जलमुक्त शिवार योजना, हागणदारीमुक्त ग्राम योजना, ग्राम स्वच्छता अभियान इत्यादींचा समावेश होतो.

४. **प्रशासनाचा अभ्यास :** देशाचा राज्यकारभार कठीण असताना प्रशासन व्यवस्था कार्यरत असते. शासनाने निर्माण केलेले कायदे व योजना त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची जबाबदारी हे प्रशासनावर असते. प्रशासन जितक्या तत्परतेने काम करते त्यावर त्या समाजातील प्रश्न सुटण्यासाठी मदत होते. योजना व्यवस्थितरीत्या राबविलेल्या तर समाजातील अडचणी दूर होतील म्हणून प्रशासनाच्या कार्याचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो.

५. **राजकीय प्रक्रियेचा अभ्यास :** देशातील ज्या काही राजकीय प्रक्रिया, राजकीय कृती कार्यरत असतात. त्याचा अभ्यास केला जातो. जेणेकरुन समाजामध्ये विविध यंत्रणा, कार्यरत असतात. राजकीय पक्ष चळवळी, घटना योजना या सर्व गोष्टीवरती राजकीय प्रक्रिया होते. त्या सर्व राजकीय प्रक्रियेचा अभ्यास केला जातो.

६. **राजकीय तत्वज्ञान व विचारसरणी :** जगामध्ये निर्माण झालेल्या सर्व तत्वज्ञान व विचारसरणीचा अभ्यास राज्यशास्त्राच्या संशोधनात केला जातो. ग्रीक तत्वज्ञान, भारतीय तत्वज्ञान, प्राचीन तत्वज्ञान, इत्यादी अनेक तत्वज्ञानाचा आजच्या परिस्थितीशी उपयुक्त कशी आहेत याचा अभ्यास केला जातो. त्याचबरोबर लोकशाही मार्क्सवादी, हिटलरशाही, उदारमतवाद, भांडवलशाही, साम्राज्यवाद इत्यादी अनेक विचारसरणीचा ही अभ्यास राज्यशास्त्राच्या संशोधनात केला जातो. जेणे करुन तत्वज्ञान विचारसरणीचा अभ्यास केल्याने समाजातील प्राप्त परिस्थितीतील प्रश्न व समस्यावर तोडगा काढण्यासाठी मदत होईल अशी अपेक्षा असते. त्या अनुषंगाने राज्यशास्त्राच्या संशोधनात तत्वज्ञान व विचारसरणीचा अभ्यास केला जातो.

७. **राजकीय नेतृत्व :** देशातील कोणतीही शासन व्यवस्था चालवताना नेतृत्वाची गरज असते. त्यामुळे राज्यशास्त्राच्या संशोधनात नेतृत्वाचा अभ्यास केला जातो. समाजातील अनेक नेते हे नेतृत्वाचा प्रभाव समाजमनावर किंवा तिथल्या कार्यकर्तुत्वावर पडलेला असतो. त्याच्या कार्याचा आधारावर लोकांनी त्यांना नेतृत्वाची संधी वारवार दिलेली असते अशा राजकीय नेतृत्वाचा अभ्यास करणे गरजेचे असते. जेणेकरुन त्याचा अभ्यास हे भविष्यात काम करणाऱ्या नेतृत्वाला आदर्श राहतील ही अपेक्षा या अभ्यासाच्या पाठीमागे असते.

८. **राजकीय विचारवंत :** जगामध्ये अनेक राजकीय विचारवंत होऊन गेले आहेत. ग्रीक देशातील सॉक्रेटीस पासून विचारवंताची सुरुवात होते. प्लेटो ॲरिस्टॉटल, मॅकियाव्हेली, पादुआ, हॉब्ज, लॉक, रुसो इत्यादी अनेक पाश्चात्य विचारवंत आहेत. तसेच भारतातील प्राचीन काळापासून कौटिल्य, नेद्रेस, गांधी, गोखले, आगरकर, टिळक, आंबेडकर इत्यादी अनेक विचारवंताचा समावेश होतो. या सर्व राजकीय विचारवंतानी आपल्या चिंतनातून पुस्तकाव्दारे अनेक विचार मांडले आहेत. ते विचार त्यावेळेच्या प्राप्त परिस्थितीनुसार असले तरी समाजातील आजच्या समस्या व अडचणी सोडवण्यासाठी कशा रितीने उपयुक्त ठरतील. त्या दृष्टीकोनातून अभ्यास केला जातो.

९. **विविध चळवळी :** समाजामध्ये अनेक चळवळी उभ्या राहिलेल्या असतात. त्यामध्ये स्त्री-चळवळ, विदयार्थी चळवळ, सामाजिक संघटनेची चळवळ, आंदोलने, विद्रोही चळवळ, सांस्कृतिक चळवळी, अंधश्रध्दा, निमूर्लन चळवळ, राजकीय संघटनेच्या चळवळी, पर्यावरण चळवळ अशा अनेक चळवळी कार्यरत असतात. त्याच्याव्दारे समाजामध्ये राजकीय जाणीव जागृती निर्माण होत असते त्याचा समाजावर एक प्रकारे प्रभाव निर्माण होतो. त्याचे काही गुणात्मक परिणाम समाजावर पडतात. या सर्व गोष्टींचा अभ्यास राज्यशास्त्राच्या अभ्यासामध्ये केला जातो.

**१०. राजकीय पक्ष व दबावगट :** प्रत्येक देशामध्ये राजकीय पक्ष व दबावगट कार्यरत आहेत. हे राजकीय पक्ष विचारसरणीच्या आधारावर, जातीच्या आधारावर धर्माच्या आधारावर निर्माण झालेले असतात. त्याचबरोबर सत्ता प्रस्थापित केल्यानंतर काही नवनवीन योजना निर्माण करतात. समाजातील गरीबी, दारिद्र्य, बेरोजगारी हे प्रश्न सोडविण्यासाठी वेगवेगळे योजना राबविण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे राजकीय पक्षानी केलेले कार्य, त्याची रचना, नेतृत्व इत्यादी गोष्टींचा अभ्यास हे राज्यशास्त्राच्या संशोधनात केला जातो. त्याचबरोबर काही दबावगटही निर्माण झालेले असतात. त्याचाही अभ्यास राज्यशास्त्राच्या संशोधनात केला जातो.

**११. निवडणुकीचा अभ्यास :** अलीकडच्या काळामध्ये निवडणुकीच्या संदर्भातील अभ्यास महत्वाचा बनला आहे. काही राजकीय पक्ष हे निवडणूकीच्या माध्यमातून कला प्रस्थापित करीत असतात. निवडणूकीचे एक नवे शास्त्र उदयास आले आहे. त्याला आपण सेफॉलॉजी असे म्हणतो. निवडणूक प्रक्रिया मतदाराचे वर्तन, राजकीय पक्षाची प्रचार यंत्रणा, निवडणूकीचे निकाल त्यातील टक्केवारी त्याचा परिणाम वेगवेगळे निवडणूक पूर्ण अंदाज इत्यादी गोष्टींचा अभ्यास आपण निवडणुकीच्या संशोधनात करीत असतो. निवडणूकीमध्ये अभ्यास करताना मतदार पुर्नरचना झाल्यानंतर अनेक राजकीय पक्ष किंवा नेत्याचे गणित चुकते त्याचा फायदा किंवा तोटा होतो या सर्व गोष्टींचा अभ्यास राज्यशास्त्राच्या संशोधनात केला जातो.

**१२. राजकीय विश्लेषन :** देशातील राजकीय परिस्थितीचा अभ्यास हे विश्लेषणाच्या आधारे केला जातो. राजकीय घडामोड, नेत्याची बदलती भुमिका, सरकार टिकविणे किवा सरकार संपुष्ठात आणणे इत्यादी राजकीय हालचाली होत असतात. त्याचे विश्लेषण करणे गरजेचे असते. त्यामुळे राजकीय विश्लेषण

हे एक राज्यशास्त्राच्या संशोधनातला महत्वाचा विषय आहे जेणेकरुन ज्या प्राप्त परिस्थितीचा अभ्यास करता येतो.

**१३. आतंरराष्ट्रीय राजकारण :** जगामधील आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास राज्यशास्त्राच्या संशोधनात केला जातो. त्यामध्ये परस्पर देशातील संबध, (राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक) अनेक योजना, करार, तह इत्यादी संबध प्रस्थापित होत असतात. त्यामुळे या सर्व आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास करणे क्रमप्राप्त आहे. या सर्व अभ्यासाचा विचार केला तर आपल्याला आंतरराष्ट्रीय राजकारणातील देशादेशातील परस्परसंबध कशारीतीने आहे याची जणिव होते. त्याचबरोबर त्याचे परिणाम चांगले की वाईट झाले कि याचा ही अभ्यास केला जातो. आंतरराष्ट्रीय राजकारणातील जे काही साम्राज्यवादी वर्चस्व प्रस्थापित झाले होते. त्याचाही अभ्यास केला जातो. अनेक संघटना निर्माण झाले आहेत. त्यात प्रामुख्याने UNO, SENTO, CETO, SAARC, BRICS, EU इत्यादी अनेक संघटना आहेत. त्याचाही अभ्यास राज्यशास्त्राच्या संशोधनात केला जातो.

**१४. युध्द व संघर्षाचा अभ्यास :** आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये परस्पर संबध प्रस्थापित करत असताना युध्द व संघर्ष, सहकार्य, शांतता करार यांचा वापर करतात. त्याचबरोबर ज्या संघटना प्रस्थापित केले आहे. या संघटना या जगामध्ये शांतता प्रस्थापित करण्याचे काम करतात. त्यामुळे जगात घडणाऱ्या विविध युध्दाचा किंवा संघर्षाचा उदा. शीतयुध्द, इराक-इराण युध्द, अफगाणिस्तान व तालीबानचा युध्द, पहिले व दुसरे महायुध्द युक्रेन रशिया, इस्त्राईल-पॅलेस्टाईन, भारत पाकीस्तान युध्द, भारत चीन युध्द इत्यादी अनेक घटना आंतरराष्ट्रीय राजकारणात घडतात या सर्व युध्द आणि सहकार्याच्या घटनांचा अभ्यास राज्यशास्त्राच्या संशोधनात केला जातो.

**१५. राजकारण व साहित्य :** समाजामध्ये राजकारणाबरोबर साहित्य, कला, संस्कृती भाषा इत्यादी गोष्टी कार्यरत असतात. देशातील किंवा प्राप्त परिस्थितीतील राजकारणाचा प्रभाव साहित्यात पडलेला असतो. त्यामुळे अनेक कथा, कांदबरी मध्ये सद्यकालीन काळातील राजकारणाचा प्रतिबिंब रेकाटण्याचे काम हे साहित्यीक व लेखक करीत असतात प्रामुख्याने सिंहासन, तणकट, रोंदेळ या कादंबरी अभ्यासल्या तर राजकारणाचा प्रभाव या कांदबरीवर पडलेला आहे. आमदार सौभाग्यवती असे नाटक सुध्दा हे राजकारणाच्या आधारावर निर्माण झाले आहेत एकूणच साहित्यामध्ये राजकारणाचे चित्रण केले जाते त्यातुन त्या काळातील राजकारणांचा अंदाज येऊ शकतो. तसेच अनेक राजकीय नेते, प्रशासकीय अधिकारी, साहित्यीक इत्यादीचे आत्मचरित्र निर्माण झाली आहेत किंवा होत असतात या सर्व साहित्यामधून राजकारणाचे प्रतिबिंब किंवा प्रभाव कशारीतीने समाजावर पडला आहे याची प्रचिती येते. त्यामुळे साहित्यामध्ये राजकारण किंवा राजकारणाचा साहित्यातील प्रभावाचा अभ्यास केला जातो.

**१६. सार्वजनिक धोरणांचा अभ्यास :** आज सार्वजनिक धोरणांचा (Public Policy) अभ्यास महत्वाचा झाला आहे. सार्वजनिक धोरण या संकल्पनेत 'सार्वजनिक' व 'धोरण' या दोन संकल्पनांचे एकत्रीकरण झाले आहे. सार्वजनिक धोरण ही अत्यंत व्यापक संकल्पना आहे. शासनाची वर्तणूक पध्दत

किंवा निश्चित योजना म्हणजे सार्वजनिक धोरण होय. सार्वजनिक जीवनाच्या सर्व बाजु सार्वजनिक धोरणांशी संबंधित असतात. लोककल्याण, लोकहित, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक कायदा, सार्वजनिक कर्मचारी वर्ग, सार्वजनिक दळणवळण अशी सार्वजनिक धोरणाची व्याप्ती वाढली आहे. या सार्वजनिक धोरणांची अंमलबजावणी, प्रभाव व त्यामुळे झालेला जनतेचा फायदा इ. बाबी या राज्यशास्त्रामधील संशोधनाचे अभ्यासविषय आहेत.

## १.३ सारांश :

मानवी जीवन सुखी व समृध्द करण्यासाठी सामाजिक शास्त्रे, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी इ. ज्ञानशाखा समृध्द असणे आवश्यक असते. या ज्ञानशाखा समृध्द करण्यासाठी त्या-त्या विषयामधील संशोधन अदययावत असणे आवश्यक असते व यासाठी संशोधन पध्दती जास्तीत जास्त बिनचूक, तटस्थ, अदययावत असावी लागते. सामाजिक शास्त्रांची मोठया प्रमाणावर प्रगती दुसऱ्या महायुध्दानंतर झाली. यामध्ये अनेक नवनवीन बाबींची भर पडली. सामाजिक शास्त्रे व राज्यशास्त्र यामध्ये संशोधन पध्दतीचा विकास झाला. ऐतिहासिक, आदर्शवादी संशोधन पध्दती, तत्वज्ञानात्मक, मूलभूत, उपयोजित, विश्लेषणात्मक, मूल्यमापनात्मक, शास्त्रीय, अनुभवजन्य इ. प्रकारच्या महत्वाच्या संशोधन पध्दती सामाजिक शास्त्रामध्ये वापरल्या जात आहेत. त्याचबरोबर राज्यशास्त्रामध्येही आज संशोधनासाठी अनेक उपविषय उपलब्ध आहेत. यामध्ये शासनसंस्था, शासनपध्दती, शासकीय योजना, सार्वजनिक धोरण, सामाजिक चळवळी, राजकीय नेतृत्व राजकीय पक्ष, निवडणूक अभ्यास इ. संशोधन विषयाचा समावेश होतो. एकूणच, सामाजिक शास्त्रामधील संशोधन पध्दती हा एक महत्वाचा अभ्यास विषय आहे.

## १.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१) गृहीतक - संशोधनासाठी गृहीत धरलेली कल्पना

२) निगमन - सामान्याकडून विशेषाकडे जाणारे विधान किंवा तत्व

३) विगमन - विशिष्टाकडून सामान्याकडे जाणारे विधान किंवा तत्व.

४) उपयोजित - प्रत्यक्ष व्यवहारामध्ये सिध्दांताचे उपयोजन.

५) सायबरने टिक्स - संतांत्रिकी विज्ञान/संवहनशास्त्र

## १.५ स्वयंअध्ययन प्रश्न व उत्तरे.

१) ॲरिस्टॉटलने किती राज्यघटनांचा अभ्यास केला होता?

२) सेबाईन हे विचारवंत कोणत्या संशोधन पध्दतीशी संबंधित आहेत?

३) राजकीय संसूचन हा सिध्दांत कोणी मांडला?

४) Research हा शब्द कोणत्या भाषेमधून आला आहे?

५) राज्यशास्त्राला शास्त्रीय बैठक देणारे डेव्हिड ईस्टन हे कोणत्या देशामधील विचारवंत आहेत?

उत्तरे : १) १५८ २) ऐतिहासिक ३) कार्ल ड्वाइश ४) फ्रेंच ५) अमेरिका

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

१) सामाजिक शास्त्रामधील संशोधनाचा अर्थ, व्याख्या व प्रस्तावना स्पष्ट करा.

२) सामाजिक शास्त्रामधील संशोधन पध्दती सविस्तर लिहा.

३) राज्यशास्त्रामधील विविध संशोधन विषय लिहा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) Jayapalan, N., Research Methods in Political Science, Atalantic Publishers, New Delhi, 2000.

२) Kothari C.R., Research Methodology, New Age International Publisher 2017.

३) निकुंभ, दिलीपसिंह, राज्यशास्त्रातील संशोधन पध्दती, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव, २०१९.

४) अन्नदाते, शशिकांत, संशोधन पध्दती, 'के' सागर पब्लिकेशन, पुणे.

५) कदम महेंद्र, संशोधन पध्दती, अथर्व, जळगांव, २०००.

6) www.britannica.com <http://www.britannica.com>

7) www.en.m.wikipedia.org <http://www.en.m.wikipedia.org>.


❑❑❑

## घटक २
# संशोधनाची प्रक्रिया

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

 २.२.१ समस्यासूत्रण (Formation of Problem)

 २.२.२ गृहीतके (Hypothesis)

 २.२.३ संशोधन आराखडा (Research Design)

 २.२.४ तथ्य संकलन (Data Collection)

२.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

२.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ सरावासाठी स्वाध्याय

२.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## २.० उद्दिष्ट्ये

१) संशोधनाचा अर्थ समजून घेणे.

२) संशोधन प्रक्रिया समजून घेणे.

३) समस्यासूत्रणाची प्रक्रिया स्पष्ट करणे.

४) गृहीतकांची निर्मिती प्रक्रिया व आवश्यकता स्पष्ट करणे.

५) संशोधन आराखड्याचे महत्व स्पष्ट करणे.

६) संशोधनात तथ्य का? व किती? महत्वाची असतात ते समजून घेणे.

७) तथ्य संकलनाच्या विविध पद्धती स्पष्ट करणे.

## २.१ प्रास्ताविक (Introduction)

'संशोधन' हा मराठी शब्द इंग्रजीतील 'Research' या शब्दाचा अर्थ आहे; परंतु येथे 'Re' म्हणजे वारंवार, पुन्हा - पुन्हा, समग्र आणि 'Search' म्हणजे शोधन किंवा शोध घेणे एवढाच अर्थ मर्यादित नसून जे अस्तित्वात आहे, पण ज्ञान नाही ते पद्धतशीर व चिकित्सकपणे शोधणे म्हणजे संशोधन होय. संशोधन म्हणजे सामाजिक शास्त्रासह अगदी कोणत्याही ज्ञानाच्या शाखेत नवीन तथ्ये आणि तत्वांचा शोध घेण्यासासाठी अस्तित्वात असलेल्या तथ्ये व तत्वांचे पुन्हा - पुन्हा परीक्षण करणे होय. असे परीक्षण करण्यासाठी संशोधकर्त्याने वैज्ञानिक व पद्धतशीर पद्धतींचा अवलंब करून चिकित्सक अभ्यास करणे आवश्यक असते. संशोधन हे विज्ञानाचे अपत्य मानले जाते. असाधारण बुद्धीमत्ता असलेल्या व विशिष्ट प्रकारचे शिक्षण आत्मसात केलेल्या अभ्यासक व विद्वानांनी जी ज्ञानसाधना केलेली असते, त्यात संशोधनाचे योगदान अनन्यसाधारण असते. अगदी शालेय शिक्षणापासूनच प्रत्येक विद्यार्थी हा संशोधनातून नवनिर्मित अभ्यासविषयांशी संबंधित असतो. ज्ञानार्जनामध्ये ज्ञान हे ग्रंथांमधून म्हणजे इतरांच्या जवळ असणारे ज्ञान व इतरांपासून घेतलेल्या ज्ञानाच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न केला जातो. अशा प्राप्त ज्ञानामध्ये संशोधनाच्या माध्यमातून सतत भर घातली जाते. हा सर्व प्रपंच कशाच्यातरी शोधाकरिता किंवा विशिष्ट समस्येच्या सोडवणुकीसाठी व त्यावरील उत्तर शोधण्यासाठी केला जातो. यासाठी पद्धतशीर अभ्यासाची आवश्यकता असते. अशाप्रकारचा अभ्यास हा वैज्ञानिक, क्रमबद्ध व पद्धतशीर प्रक्रियेतून जावा लागतो, यालाच संशोधन प्रक्रिया म्हटले जाते. संशोधन प्रक्रियेत प्रामुख्याने 'समस्यासूत्रण' (Formation of Problem), 'गृहीतके' (Hypothesis), 'संशोधन आराखडा' (Research Design), आणि 'तथ्य संकलन' (Data Collection) या पायऱ्या अत्यंत महत्वपूर्ण आहेत.

## २.२ विषय विवेचन

प्रस्तुत घटकामध्ये संशोधन प्रक्रियेच्या आवश्यक टप्यांचे विश्लेषण केले गेले आहे. संशोधन करणे हे काही सहज सोपे कार्य नाही. संशोधन करण्यासाठी एका विशिष्ट अशा वैज्ञानिक प्रक्रियेतून जावे लागते. संशोधनासाठी वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब करावा लागतो. संशोधनासाठी संशोधनकर्ता अतिशय सजग असणे आवश्यक आहे. कारण संशोधनकर्त्याला आपल्या भोवतालाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, नैसर्गिक अशा सर्व प्रकारच्या पर्यावरणाविषयीचे भान व अभ्यास असणे गरजेचे आहे. कोणत्याही सामाजिक शास्त्रातील संशोधनामध्ये संशोधनाची प्रक्रिया समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. सर्वसामान्यपणे संशोधन प्रक्रियेमध्ये 'समस्यासूत्रण' (Formation of Problem), 'गृहीतके' (Hypothesis), 'संशोधन आराखडा' (Research Design), आणि 'तथ्य संकलन' (Data Collection) या अत्यंत महत्वपूर्ण पायऱ्यांच्या आधारेच संशोधनकर्त्याला संशोधनाच्या विषयवस्तुचे विकसन करता येते.

### २.२.१ समस्यासूत्रण (Formation of Problem)

**समस्यासूत्रण : अर्थ व व्याख्या (Meaning and Definition of Formation of Problem)**

मानवी जीवनात मार्गक्रमण करीत असताना अनेविध अडचणी व अडथळे यांचा सामना करावा लागतो. किंबहुना अडचणी व अडथळे हे मानवी जीवनाचे अविभाज्य भाग आहेत असे म्हटल्यास अतिशयोक्तीचे होणार नाही. या अडचणी व अडथळ्यांनाच 'समस्या' असे संबोधले जाते. 'Problem' हा इंग्रजी भाषेतील शब्द 'Proballein' या ग्रीक भाषेतील शब्दापासून बनलेला आहे. ग्रीक भाषेत 'Proballein' चा अर्थ 'उलगडण्यासाठी दिलेला प्रश्न' असा आहे. इंग्रजीत 'Problem' या शब्दाचा अर्थ 'A difficult question to be solved', तसेच 'A thing difficult to understand'. Problem साठी मराठीत 'समस्या' या शब्दाचा उपयोग केला जातो. 'समस्या म्हणजे उपलब्ध माहिती आणि साध्य यांच्यामध्ये निर्माण झालेला अडथळा होय'. अडथळे व अडचणी या मानवी जीवनाचा अविभाज्य भागच असल्यामुळे समस्येला चिरंतन स्वरूप प्राप्त झाले आहे. जीवनाच्या प्रारंभापासून ते अंतापर्यंत व्यक्ती, समाज, व सर्व प्रकारच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आदि संस्था ह्या कायमच समस्याग्रस्त असतात.

वैज्ञानिक संशोधनात समस्या निर्धारण किंवा समस्यासूत्रण ही सामाजिक संशोधनाची प्रथम पायरी समजली जाते. संशोधन प्रक्रियेला आरंभ करण्यापूर्वी संबंधित समस्येचे संपूर्ण स्वरूप समजून घ्यावे लागते. समस्येचे स्वरूप फारच व्यापक असेल तर ते मर्यादित करावे लागते. कारण मर्यादित व अस्पष्ट असलेल्या समस्येवर संशोधन करणे शक्य नसते. तसेच सामान्य स्वरूपाच्या संशोधन विषयाला विशिष्ट समस्येचे रूप देणे आवश्यक असते. संशोधकाने अध्ययन विषयाची निवड केल्यानंतर नेमके कशाचे संशोधन करायचे आहे? नेमके काय शोधून काढायचे? नेमके कोणती तथ्ये संपादित करायची? कोणत्या साधनांनी व पद्धतीने तथ्ये संकलित करायची? हे संशोधकाला निश्चित करावे लागते. त्यासाठी सामान्य संशोधन विषयाचे संशोधन समस्येत रूपांतर करणे नितांत गरजेचे असते. समस्यासूत्रण करणे म्हणजे संशोधनक्षम वाटेल अशी विषयाची मांडणी करणे होय. अर्थात संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या विषयक्षेत्राचे विशिष्ट संशोधन समस्येत रूपांतर करणे म्हणजे समस्यासूत्रण होय. समस्यांचे स्वरूप हे कधी सोडविण्यासाठी सोपे तर कधी ते अत्यंत किचकट, गुंतागुतीचे असते. त्यामुळे समस्येचा नेमका अर्थ व तिचे स्वरूप समजून घेणे संशोधनकर्त्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. समस्येचा अधिक खोलवर अर्थ पुढील काही महत्वपूर्ण व्याख्यांमधून स्पष्ट होतो.

१) पारसन्सच्या मते, "समस्या ही परिस्थितीची अशी निश्चित बाजू आहे की, ज्यामध्ये सुधारणा केल्यास अडचणींवर मात करता येईल."

1) According to John Dewey, "A problem represents the partial transformation by inquiry of a problematic situation into a determinate situation."

१) टाऊनशेडच्या मते, "संशोधन समस्या म्हणजे निराकरणासाठी समोर आलेला प्रश्न होय."

२) एफ. एन. केरलिंगरच्या मते, "समस्या म्हणजे प्रश्नवाचक विधान होय."

उपरोक्त व्याख्यांवरून असे स्पष्ट होते की, समस्यासूत्रण ही संशोधनाची पहिली पायरी आहे. सामाजिक समस्येचे स्वरूप अतिशय जटिल असते. समस्या ही काहीसी गोंधळाच्या व असमंजस्याच्या स्थितीला जन्म देते. समस्येचे अनेक पैलू असतात. त्यामुळे समस्येतील अडचणी व अडथळे हे संशोधनकर्त्याला बरेचदा क्लेष व वैताग निर्माण करणारे असतात. सामाजिक समस्येतील गुंतागुंत अनेक पैलुंशी निगडीत असते. त्यातील कोणत्याही एका पैलूची निवड संशोधन अध्ययनासाठी करावी लागते. संशोधनाच्या सामान्य विषयक्षेत्राचे विशिष्ट संशोधन समस्येत रूपांतर करणे म्हणजे समस्या सूत्रण होय. संशोधन समस्या संशोधनकर्त्यास जाणवणारी एक सैद्धांतिक किंवा व्यावहारिक अडचण होय. संशोधकाने गहन अध्ययनासाठी निवडलेला समस्यावत प्रश्न असतो. सामान्यपणे समस्यासूत्रणात काही मूलभूत प्रश्नांचा विचार करणे आवश्यक असते. जसे कशाचा अभ्यास करावयाचा आहे? अभ्यासाचे क्षेत्र कोणते आहे? अभ्यासाचा कल काय स्वरूपाचा आहे? कोणत्या माध्यमातून अध्ययन करावयाचे आहे आदी प्रश्नांचा विचार करणे आवश्यक आहे. जे स्पष्ट नाही त्याची चौफेर चौकशी करावयाची आहे आणि या चौकशीत अनेक प्रकारचे अडथळे येत असतात. या अडथळ्यांवर मात करुन समस्येचे आकलन व नंतर तिचे निराकरण करण्याचे मोठे आव्हान संशोधनकर्त्यासमोर असते. त्याचबरोबर समस्या सोडवित असताना उपलब्ध माहितीचे अचूक आकलन व त्यावर आधारित तर्क काढणे आणि त्यासंदर्भात आपल्या स्मृति - भांडारात उत्तरांचा शोध घेणेही महत्त्वाचे असते.

जिकमंड या अभ्यासकाने 'समस्यासूत्रण' करण्यासाठी काही आवश्यक घटकांचा विचार संशोधनकर्त्याकडून होणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. या घटकांमध्ये - संशोधनाचा उद्देश, संशोधन विषयाचे पूर्वज्ञान, अतिरिक्त माहिती जाणून घेण्याची आवश्यकता, कशाचे मूल्यमापन करावयाचे याबाबतची निश्चिती, मूल्यमापन पद्धतीची निश्चिती, आवश्यक ती तथ्य सामग्री संकलनाची शक्यता, वर्तमान परिस्थिती, गृहीतकांच्या निर्मितीची शक्यता. संशोधनासाठी पुरेसा वेळ व लागणा-या वित्ताची उपलब्धता आदींचा समावेश होतो.

सामान्यपणे समस्यासूत्रणासाठी संशोधनकर्त्याने जे महत्वपूर्ण घटक लक्षात घेणे आवश्यक आहेत, त्यामध्ये प्रामुख्याने पुढील घटकांचा समावेश होतो. i) संशोधन समस्या ही दोन किंवा अधिक संकल्पना अथवा चलांच्या आंतर-संबंधाच्या मूल्यांकनावर केंद्रित असावी, ii) संशोधन समस्या ही सुस्पष्ट असावी, iii) सामान्य समस्येला विशिष्ट समस्येमध्ये परिवर्तीत करता आले पाहिजे, iv) संशोधन समस्येशी संबंधित माहिती

व तथ्यांचे संकलन करणे शक्य असावे, v) संशोधन समस्येच्या संदर्भात वस्तुनिष्ठता असली पाहिजे, vi) संशोधन समस्येच्या संदर्भात तटस्थता असावी. संशोधनाचे स्वरुप शीर्षकातूनच स्पष्ट होत असल्यामुळे संशोधन हे अधिक अर्थपूर्ण होण्यासाठी या सर्व अटी पूर्ण होणे आवश्यक आहेत. संशोधन विषयाची निवड व समस्यासूत्रण करताना संशोधकर्त्याने वरील घटकांना केंद्रीभूत मानून संशोधन विषयात पद्धतशीर तल्लीन होणे, शोध विषयाच्या संबंधित साहित्य सामग्रीचे अध्ययन करणे, तज्ज्ञ, अभ्यासक व अनुभवी व्यक्तींबरोबर विचार विनिमय व चर्चा करणे, प्रत्यक्ष क्षेत्र निरीक्षण करणे आदि अटींची पूर्तता करूनच गृहीतकांची पद्धतशीर मांडणी केल्यास संशोधन कार्य हे अधिक अर्थपूर्ण बनू शकेल.

## २.२.२ गृहीतके (Hypothesis)

**गृहीतके (Hypothesis) : अर्थ व व्याख्या :**

गृहीतकांनाच 'परिकल्पना' किंवा 'उपकल्पना' (Hypothesis) असेही म्हणतात. सर्वसाधारणपणे ज्याचा शोध घेत आहोत त्याबाबतचे विधान म्हणजे गृहीतक. वैज्ञानिक चिंतन प्रक्रियेत प्रारंभिक ज्ञानाचा आधार घेऊन विषयवस्तूशी सादृश्य राहील अशी सैद्धांतिक कल्पना जी पुढे संशोधनास संशोधकाच्या आवाक्यात आणते, त्यास गृहीतके असे म्हणतात. गृहीतके हा असा प्रस्ताव किंवा प्रस्तावांचा समूह असतो कि ज्याचे परीक्षण अद्याप झालेले नसते. म्हणजेच अप्रमाणित प्रस्ताव किंवा प्रस्तावांचा समूह ही 'गृहीतके' म्हणून ओळखले जाते. गृहीतकांमध्ये मांडलेले निष्कर्ष हे अस्थायी व काल्पनिक स्वरूपाचे असतात आणि त्यांची प्रमाणिकता संशोधनकर्ता अनुभवाने व वास्तविक तथ्यांच्या आधारे सिध्द करण्याचा प्रयत्न करीत असतो. वस्तूनिष्ठ व उपयोगी गृहीतके हीच सिध्दांत व अन्वेषण यातील दुवा असून त्याद्वारे नवीन ज्ञानप्राप्ती केली जाते.

गुडे व हॅटच्या मते, "गृहीतके ही अशी मान्यता आहे, जी सत्य सिध्द करण्यासाठी तिचे प्रयोगात्मक परीक्षण केले जाऊ शकते."

लुण्डबर्गच्या मते, "ज्याची सत्यता अद्यापही पडताळावयाची आहे अशा तात्पुरत्या व तकलादू सामान्यीकरणास किंवा निष्कर्षास गृहीतके असे म्हणतात. प्रारंभी गृहीतके ही कल्पना, कल्पनापूर्ण विचार, अनुमान, अंदाज किंवा अंतःप्रेरणा इत्यादींपैकी काहीही असू शकतात परंतू पुढे ती संशोधनकृती किंवा अन्वेषणाचा आधार बनते.

According to E.S. Bogardus, "A hypothesis is aproposition to be tested."

**गृहीतकांच्या निर्मिती प्रक्रियेतील अडथळे :**

'विचारांचा वैज्ञानिक पध्दतीने विचार' या उक्तीपासून सुरुवात झालेली वैज्ञानिक चिंतन प्रणाली गृहीतकांच्या निर्मितीस कारणीभूत होते. या चिंतन प्रणालीला शून्यात क्रियान्वित करता येत नाही, त्यासाठी पूर्व तयारी करणे आवश्यक ठरते. परिपूर्ण व पूर्व तयारी न केल्यास संशोधनकर्त्याला गृहीतकांच्या निर्मितीत काही अडथळ्यांना सामोरे जावे लागते. त्यामध्ये - i) स्पष्ट सैध्दांतिक आराखड्याच्या ज्ञानाचा अभाव, ii) सैध्दांतिक आराखड्याला तर्काने उपयोगात आणण्याची अक्षमता, हे अडथळे प्रमुख आहेत.

उपरोक्त अडथळ्यांवर मात करून संशोधनकर्ता गृहीतके निर्मितीचे कार्य करु शकतो. गृहीतके सहजपणे अस्तित्वात येत नाही. गृहीतके अस्तित्वात येण्यापूर्वीची स्थिती ही पूर्वविचार, पूर्वज्ञान, अतार्किक विधान, रचनाबध्द विचार मांडणी, कल्पना, आदींच्या स्वरुपात असते. यातूनच एक विवेकी किंवा तर्कपूर्ण विधान अस्तित्वात आणले जाऊ शकते. या तर्कपूर्ण व विवेकी विधानाला विविध स्तरावर परिस्कृत करुन निश्चितता दिली जाते. अशाप्रकारे संशोधनकर्ता गृहीतकांच्या निर्मितीतील अडथळ्यांवर मात करीत असतो.

सामान्यपणे अभ्यासक हे गृहीतकांच्या निर्मितीचे स्त्रोत मुख्यत्वे दोन प्रकारचे मानतात.

i) व्यक्तीगत स्त्रोत (Individual Source): जेव्हा व्यक्ती स्वतः निर्मिती करतो तेव्हा ते स्त्रोत व्यक्तीगत स्त्रोत असतात. संशोधनकर्त्याचा आंतरिक दृष्टिकोन, विचारधारा, मनोविश्व, कल्पना, आदींचा यात समावेश होतो.

ii) बाह्य स्त्रोत (External Source): व्यक्तीच्या बाह्य जगताशी आलेल्या संबंधातून अस्तित्त्वात आलेल्या घटना, कृती, विचार, सिध्दांत, आदी गृहीतके निर्मितीचे बाह्य स्त्रोत मानले जातात.

गुडे व हॅटच्या मते, गृहीतके निर्मितीचे प्रमुख चार स्त्रोत आहेत. त्यामधे - संस्कृती (Culture), व्यक्तीगत अनुभव (Personal Experience), सादृश्य किंवा समरुपता (Analogy), वैज्ञानिक सिद्धांत (Scientific Theories) यांचा समावेश होतो.

i) **संस्कृती :** संस्कृती ही गृहीतके निर्मितीसाठी भिन्न भिन्न स्त्रोत उपलब्ध करते. संस्कृतीचा प्रभाव लोकांवर पडतोच. प्रत्येक राष्ट्राची संस्कृती असते. उदा. भारतीय संस्कृती ही दर्शनवाद व आदर्शवादाने व्यापलेली आहे. म्हणूनच भारतात अस्तित्वात येणाऱ्या गृहीतकांमध्ये नैतिकता, तत्त्वज्ञान, आदर्श यांचे प्रतिबिंब दिसते. याउलट अमेरिकन संस्कृतीत भौतिकवादाला प्राधान्यता प्राप्त झाल्यामुळे तेथील गृहीतकांमध्ये भौतिक सुखाला व उपयुक्ततेला अग्रक्रम मिळाला आहे.

सांस्कृतिक लक्षणांच्या अंतर्गत लोक-विश्वास, लोक-कला, लोक-साहित्य, इत्यादी व अन्य मान्यता गृहीतके निर्मितीस सहायक ठरल्या आहेत. उदा. कुंभाराच्या मुलाने कुंभारच बनले पाहिजे हा भारतातील समाजाने सर्वमान्य केलेला लोक-विश्वास. परंतु बदलत्या काळाने कुंभाराच्या व्यवसायाला व्यापार बनविले आणि आज जन्माने कुंभार नसलेल्या लोकांचे अधिक वर्चस्व या व्यवसायावर आहे.

ii) **व्यक्तीगत अनुभव :** संशोधकाचे स्वानुभव हे अनेकदा गृहीतक निर्मितीचे स्त्रोत बनत असतात. जीवनात घटीत होणाऱ्या घटनांनी जी काही अनुभूती तो प्राप्त करतो, त्यातून जीवनाबाबत एक दृष्टिकोन अस्तित्वात येतो. त्यातून उपलब्ध ज्ञानाचा वापर करुन तो गृहीतकांची निर्मिती करतो. प्रत्येक संशोधकाचा दृष्टिकोन हा भिन्न प्रकारचा असतो, त्या विशेष दृष्टिकोनातून तो 'विशिष्ट विषयवस्तू' चे अध्ययन करीत असतो व 'विशिष्ट विषयवस्तू'त दडलेल्या अज्ञाताला स्पष्ट व प्रकट करीत असतो.

iii) **सादृश्यता किंवा समरुपता :** भिन्न-भिन्न विषयातील सादृश्यता गृहीतकांच्या निर्मितीस कारणीभूत ठरते. राज्याची रचना व स्वरुपाच्या आधारावर वर्गीकरण करण्याची जी पध्दती अस्तित्वात आहे तिचे मूळ प्लेटोच्या रिपब्लिक या पुस्तकात असल्याचे आढळून येते. उदाहरणार्थ, राजेशाही. जेव्हा एका विषयाची संरचना व स्वरूप ही दुसऱ्या विषयाच्या अध्ययनासाठी वापरली जाते तेव्हा ती संरचना वा स्वरूप हे दुसऱ्या विषयाचे गृहितक बनते.

iv) **वैज्ञानिक सिद्धांत :** विज्ञान हे चांगल्या व नवनवीन गृहितक निर्मितीचे स्त्रोत आहे. विज्ञानाच्या भिन्न-भिन्न विषयातील सामान्यीकरण हे सतत गृहितकाचे स्त्रोत असते. प्रचलित सिध्दांताचे पुनर्परीक्षण केले जाते तेंव्हा त्यात काही दोष किंवा उणीवा आढळल्यास त्यांना दूर करण्यासाठी केलेल्या प्रयत्नातूनच गृहीतकाची निर्मिती होत असते.

**गृहीतकांचे प्रकार :**

i) **प्रमाणित किंवा उपयोगी गृहीतके :** प्रमाणित गृहितक हे संशोधनात सर्वाधिक महत्त्वपूर्ण गृहितक होय. या गृहीतकांच्याद्वारे सिध्दांत निर्मिती करुन सामान्यीकरण साधता येते. शोधकार्यातील क्लिष्ट व जटील तथ्यांना संबंधित गृहीतकांच्या स्वरुपात शोध अध्ययनाला घेता येते.

ii) **अप्रमाणित किंवा अशुध्द गृहीतके :** अप्रमाणित गृहीतकांच्या आधारे कोणताही दृष्टिकोन लागू करुन गृहितकाच्या कोणत्याही पैलूचे अध्ययन केले तरी देखील नवीन सिध्दांत प्रस्थापित करता येत नाही. अप्रमाणित गृहीतकांना ओढून ताणून सत्य सिध्द करण्याचे प्रयत्न हा शब्दंच्छलाशिवाय अन्य दुसरे काही नसते.

**गृहीतकांचे संशोधनातील महत्त्व :**

i) **अध्ययनाला निश्चितता प्राप्त होते :** गृहीतके ही शोध अध्ययनाला एका निश्चित मर्यादेत नियोजित करीत असल्यामुळे संशोधनास एक निश्चित आकृतीबंध प्राप्त होतो. या आकृतीबंधामुळे गृहीतकांची लांबी, रुंदी व खोली स्पष्ट होते. यामुळे संशोधकाला अध्ययनात काय व किती करायचे आहे, कोणत्या तथ्यांचे संकलन केले पाहिजे व कोणत्या तथ्यांना पूर्णतः वगळले पाहिजे, याचे आकलन होते. कोणत्या तथ्यांचा शोध घेतला पाहिजे, याची निश्चिती गृहीतकच करीत असते. यामुळे संशोधक व्यर्थ तथ्य, आकडे व सामग्रीचे संकलन न करता आपल्या वेळ, श्रम व धनाची बचत करीत असतो.

ii) **उद्देशाला स्पष्टता प्राप्त होते:** गृहीतके ही शोध विषयवस्तूच्या उद्देशाला विवरणासहित स्पष्ट करते. संशोधनकर्त्याकडून केले जाणारे संशोधन हे सैध्दांतिक आहे की व्यावहारिक, निदानात्मक आहे की उपचारात्मक, यांविषयीची स्पष्टता येते.

iii) **संशोधनाची व्याप्ती निश्चित होते :** संशोधनासाठी निवडलेल्या विषयवस्तूचे सर्व पैलू अभ्यासणे व्यावहारिकदृष्ट्या अशक्य असते. संशोधनकर्त्याला वेळ, श्रम व धन यांचे भान राखून अध्ययन करावे लागते. म्हणूनच शोध अध्ययनासाठी माहितीचे भंडार उपलब्ध असले तरी त्यातून विशिष्ट प्रकारचीच सामग्री किंवा माहिती संशोधनकर्त्याला वेगळी करावी लागते. अशावेळी योग्य सामग्रीला उपलब्ध सामग्रीतून निवडण्यात गृहीतकेच संशोधकाला सहायक ठरतात व शोध अध्ययनासाठी निवडलेल्या 'समस्येची' विशिष्ट दृष्टिकोनातूनच व्याप्ती निश्चित करतात.

iv) **संशोधनकर्त्याचे दिशादिग्दर्शन होते:** गृहितकामुळे संशोधनकर्ता दिशाहीन शोधापासून सुरक्षित होतो व त्याचे संपूर्ण लक्ष्य हे शोध विषयवस्तूवर केंद्रीत होते. यामुळे अनावश्यक बाबींना संशोधनापासून वेगळे करता येते व उपलब्ध वेळ, श्रम आणि धन यांचा विषयवस्तूच्या सखोल अध्ययनासाठी योग्य उपयोग करता येतो.

v) **तथ्य सामग्रीच्या संकलनास उपयोगी :** गृहीतकांच्या निश्चीतीमुळे संशोधनकर्त्याला योग्य व तर्कसुसंगत तथ्य - सामग्रीचे संकलन करण्यासाठी मदत होते. संकलित तथ्य - सामग्रीचा उपयोग गृहीतकांची सत्य-असत्यता पडताळण्यासाठी केला जातो. परिणामी, संशोधनकार्याचे उद्दिष्ट्ये साध्य करता येते.

vi) **निष्कर्ष काढण्यास उपयुक्त:** गृहीतकांच्या विशिष्ट प्रकारच्या निश्चीतीमुळे संकलित केलेल्या तथ्यांच्या आधारे गृहितकांच्या सत्य-असत्याचे परीक्षण अर्थात पडताळ केला जातो. गृहीतकांच्या पडताळ्याअंती गृहितक हे सत्य किंवा असत्य यापैकी काहीही सिद्ध झाले तरी त्याची उपयोगीता अबाधीत असते. असत्य सिद्ध झालेले गृहितक हे वास्तविकतेची जाणीव करवून देते. तर सत्य सिद्ध झालेले गृहितक हे

नवीन सिध्दांताची निर्मिती करते. अशाप्रकारे निर्मित सिध्दांत हे पुढे संबंधित विषयांसाठी अनेक गृहीतकांच्या निर्मितीसाठी स्त्रोत बनतात.

आरंभिक व पूर्व ज्ञानाच्या आधारे संशोधनकर्ता आपल्या शोध विषयासंबंधी काही सामान्य अनुमान बांधतो. त्या कामचलाऊ पूर्वानुमानाला परिकल्पना, उपकल्पना, किंवा गृहितकृत्य असे म्हणतात. गृहितकृत्यामुळे मुख्य विषयांवर लक्ष केंद्रीत करण्यास मदत होते. गृहितकृत्याचे उगमस्थान व महत्त्वावरून त्याची उपयोगिता लक्षात येते. गृहितकृत्य परिक्षण म्हणजे संशोधनकर्त्याने संकलीत केलेल्या माहितीच्या आधारे गृहितकृत्य सत्य किंवा असत्य ठरण्याची प्रक्रिया होय. संशोधनातील गृहीतकृत्याच्या या सबंध प्रक्रियेच्या परिणामी शोध कार्याचे उद्दिष्ट्ये साध्य केले जाऊ शकते.

### २.२.३ संशोधन आराखडा (Research Design)

सामाजिक शास्त्रातील कोणत्याही विद्याशाखेत संशोधनकर्त्याने प्रत्यक्ष संशोधन कार्य सुरू करण्यापूर्वी कोणत्या स्वरुपाची तयारी केली पाहिजे, याचा थेट संबंध संशोधन आराखड्याशी आहे. संशोधनकार्य करीत असताना येणाऱ्या अडचणी व त्यावर मात करण्यासाठी कोणत्या उपाययोजना आखता येतील, याबाबत आधीच विचार केला तर संशोधन प्रक्रियेच्या विविध पैलूंवर संशोधनकर्त्याला अधिक चांगल्या पद्धतीने नियंत्रण प्रस्थापित करता येते. त्यासाठी संशोधनकर्त्याने संशोधन कार्य सुरू करण्यापूर्वी नियोजनबद्ध व पद्धतशीर तयार केलेली रूपरेषा म्हणजेच 'संशोधन आराखडा' होय. शोध विषयवस्तुला योग्य दिशा आणि गती देण्यासाठी संशोधन आराखड्याची आवश्यकता असते. उदाहरणार्थ, जर एखादे घर बांधावयाचे असेल तर त्यासाठी आवश्यक जागा, त्या जागेचे क्षेत्रफळ, त्या अंतर्गत स्वयंपाक खोली, नहाणीघर, बेडरूम, हॉल, वॉशरुम, बाल्कनी, पार्किंग, पडवी इत्यादीसह त्या घराच्या बांधकामासाठी लागणारे साहित्य जसे की, विटा, रेती, लोखंड, तार, खिळे, पाणी, कामगार, श्रमाचे दर, या अतिशय छोट्या-मोठ्या परंतु अत्यंत महत्त्वाच्या बाबींसह एक कृती योजना तयार करावी लागते. जेंव्हा प्रत्यक्ष घर बांधावयाचे असते तेंव्हा हाच आराखडा उपयुक्त ठरतो. त्याचप्रमाणे संशोधनकर्त्याने आपल्या शोध कार्याच्या विषयानुषंगाने केलेली कृती व योजना अर्थात 'संशोधन आराखडा' पुढील शोध कार्यासाठी उपयुक्त ठरतो.

**संशोधन आराखड्याचा अर्थ व व्याख्या :**

'संशोधनाचा आराखडा' हा संशोधन प्रक्रियेचा एक अनिवार्य भाग असतो. वास्तविक संशोधन सुरू होण्यापूर्वी तयार केलेल्या संशोधनाच्या तार्किक व्यवस्थित योजनेला बहुधा 'आराखडा' असे संबोधले जाते. संशोधन प्रणालीने 'Design' हा शब्द अभियांत्रिकीपासून (Civil Engineering) हा शब्द घेतला आहे, ज्याचा अर्थ 'आराखडा' असा होतो. 'Design' या शब्दाचा अर्थ 'अभिप्राय' किंवा 'आशय' किंवा

'प्रयोजन' या मराठीतील शब्दांना पर्याय म्हणून वापरला जातो. मराठीतील या शब्दांना 'आराखडा' 'प्ररचना' किंवा 'अभिकल्प' हा शब्द 'Design' साठी रूढ करण्यात आला आहे.

संशोधनामध्ये 'Design' या शब्दाचा अर्थ 'Drawing an outline or planning of Arranging details' असा घेतला जातो, तर 'Research Design' चा अर्थ 'Planning a Strategy of Conducting Research' असा आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षेपूर्वी प्रत्येक विषयाचा अभ्यास करण्यासाठी तयार केलेले वेळापत्रक म्हणजे तो एक प्रकारचा आराखडाच असतो. आराखडा म्हणजे शोध विषयासंबंधी कार्ययोजना होय. आराखडा बनविणे म्हणजे कार्ययोजना आखणे. नियोजित कार्यात उद्भवणाऱ्या समस्या व अडचणीचा विचारपूर्वक अंदाज घेऊन त्या समस्या व अडचणींच्या निराकरणाची आगाऊ व्यवस्था करण्याच्या प्रक्रियेस संशोधन आराखडा बनविणे असे म्हणता येईल. संशोधन आराखड्यामुळे संशोधनात सुसूत्रता येते आणि संशोधन प्रक्रियेस गती प्राप्त होते. संशोधनातील संभाव्य अडचणी शोधण्यास मदत होते. त्यामुळे संशोधकाचा वेळ, पैसा आणि शक्ती यांचा होणारा अपव्यय टाळता येतो. थोडक्यात, आराखडा म्हणजे अशी योजना जी विषयवस्तूच्या विभिन्न पैलूंचे अन्वेषण करुन शोध विषयाच्या पूर्वनिर्धारीत उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी क्रियान्वित केली जाते.

संशोधन आराखडा समस्येची निवड केल्यानंतर संशोधकास आराखडा तयार करावा लागतो. वेळ, पैसा, श्रम यांचा अपव्यय न करता संशोधनाचे उद्दिष्ट्ये पूर्ण करण्याकरिता तथा संकलनाच्या कार्यपद्धतीसंबंधी नमुना निवड यात घेण्यात आलेल्या निर्णयाचा व त्याविषयीच्या कार्यपद्धतीबाबतच्या निर्णयाचा अंतर्भाव करून बनविलेली योजना म्हणजे 'संशोधन आराखडा' होय. भविष्यात शोधकार्य करीत असताना येणाऱ्या अडचणी व त्या अडचणींचे निवारण कसे करता येईल आदींचा विचार आधीच करावा लागतो. आपल्या अध्ययन विषयास अनुसरून संशोधन आराखडा तयार करावा लागतो. संशोधनामुळे संशोधकास निश्चित पद्धतीने संशोधन पूर्ण करण्यास मदत होत असते. आराखड्यात संशोधन समस्या, विषय निर्मिती, पूर्वसाहित्य, उद्दिष्ट्ये, गृहितके, प्राथमिक व्याप्ती व मार्यादा, माहिती संकलन प्रक्रियेसंबंधी माहिती द्यावी लागते.

मिलरच्या मते, "संशोधन आराखडा म्हणजे चालविलेल्या संशोधन अभ्यासातील समाविष्ट असणाऱ्या संपूर्ण प्रक्रियेचा नियोजित कालक्रम होय."

यंग पी. व्ही. च्या मते , "संशोधन आराखडा ही एक तार्किक व व्यवस्थित योजना आहे, जी संशोधनाला मार्गदर्शन करते."

सेल्टिझ, जहोडा, इवॉईश आणि कुक यांच्या मते, "निष्कर्षाची संशोधन उद्दिष्टयांची संबद्धता व संशोधन कार्यात मित्तव्ययता यांची सांगड घालता येण्याच्या दृष्टीने तथ्यांचे संकलन व विश्लेषण करता यावे यासाठी आवश्यक अशा अटींची नियोजित व्यवस्था म्हणजे संशोधन आराखडा होय."

According to Karlingar E. N., "Research design in the plan , structure and strategies of investigation conceved so as to obtain answer to research question and to control variance."

उपरोक्त व्याख्यांमधून आराखड्याचा सखोल अर्थ व उपयोगिता स्पष्ट होते. संशोधन आराखडा किंवा संशोधनाची रूपरेषा ही अशाप्रकारची योजना आहे की, ज्याद्वारे संशोधनकर्त्याला संशोधन समस्येच्या निश्चीतीपासून ते संशोधन अहवालाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत शोध कार्यासाठी लागणारा वेळ, पैसा, श्रम नियंत्रित करून संशोधनाची उद्दिष्ट्ये अधिकाधिक प्रात करता येऊ शकतात. संशोधन आराखड्याच्या वरील व्याख्या व अर्थावरून त्याची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील. संशोधन आराखड्याची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. सामाजिक शास्त्रातील संशोधनाच्या क्षेत्रात शोध विषयवस्तूच्या संशोधनासाठी संशोधनकर्त्याकडून पूर्व नियोजन केले जाते.

२. संशोधनकर्ता आपल्या प्रस्तावित शोध विषयवस्तूच्या संशोधनासाठी जे पद्धतशीर पूर्व नियोजन करतो, त्याला 'संशोधन आराखडा' (Research Design) असे म्हणतात.

३. 'संशोधन आराखडा' ही संकल्पना सामाजिक शास्त्रातील संशोधन प्रणालीने अभियांत्रिकी पासून घेतली आहे.

४. 'Design' या शब्दाचा अर्थ 'अभिप्राय' किंवा 'आशय' किंवा' प्रयोजन या मराठीतील शब्दांना पर्याय म्हणून वापरला जातो. मराठीतील या शब्दांना 'आराखडा' 'प्ररचना' किंवा 'अभिकल्प' हा शब्द 'Design' साठी रूढ करण्यात आला आहे.

५. 'संशोधन आराखडा' तयार करणे म्हणजेच कृती किंवा कार्य योजना आखणे होय. म्हणजेच संशोधनकर्त्याकडून शोधकार्य सुरु होण्यापूर्वीच संशोधनाची रूपरेषा आखली जाते.

६. व्यक्ती व सामाजिक घटिते अथवा समस्या हेच सामाजिक शास्त्रातील संशोधनाचे क्षेत्र आहे. व्यक्तीचे वर्तन व सामाजिक घटना ह्या अत्यंत गुंतागुंतीच्या व जटिल स्वरूपाच्या असतात. अशावेळी या सामाजिक घटनांच्या जटिल स्वरूपाची शिस्तबद्ध, पद्धतशीर व सुलभ पद्धतीने आखणी करणे हे केवळ संशोधन आराखड्यामुळेच शक्य होते.

७. 'संशोधन आराखडा' हा संशोधकासाठी केवळ मार्गदर्शकच नव्हे तर संशोधनकार्याचा नियंत्रकसुद्धा असतो. संशोधन प्रक्रियेच्या दरम्यान संशोधनकार्यास सुलभ बनविणे व परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे संशोधन आराखड्यामुळे शक्य होते.

८. पूर्व-नियोजनाचा अभाव असेल तर संशोधनकर्त्याला त्याच्या शोध विषयवस्तूचे उद्दिष्ट साध्य होणार नाही.

९. सामाजिक संशोधनाची समस्या आणि गृहीतके यांचे स्वरुप कसे आहे त्या आधारावर संशोधन आराखड्याची निवड केली जाते.

१०. संशोधन आराखडा म्हणजे अशी कार्य योजना जी शोध विषयवस्तूच्या विभिन्न पैलूंचे अन्वेषण करुन संशोधनाच्या पूर्वनिर्धारीत उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी क्रियान्वित केली जाते.

**उत्कृष्ट संशोधन आराखड्याची तत्वे :**

सामाजिक शास्त्रातील संशोधनात उत्कृष्ट संशोधन आराखडा कसा असावा याबाबत संशोधक अभ्यासकांची भिन्न मते आहेत. बहुतांश संशोधकांनी लहान संशोधन आराखड्याला उत्कृष्ट असल्याचे मानले आहे. अशा संशोधन आराखड्यात लवचिकता, अचूकता, विश्वसनीयता, समर्पक संकल्पनाची निवड, चलांची व्याख्या आदि महत्वाची तत्त्वे असणे अपेक्षित व आवश्यक आहेत.

i) **अचूकता :** अचूकता हा शास्त्रीय संशोधनातील गाभा आहे. कोणतीही चूक ही संशोधनाला निरर्थक बनवीत असते. त्यासाठी सतर्क राहून, कोणत्याही प्रकारचे दोष व उणीवा नसलेला आराखडा तयार करणे आवश्यक आहे. त्रुटी किंवा उणीव राहिल्यास ती शोध अध्ययन कालावधीतच संपुष्टात आणणे आवश्यक आहे, अन्यथा शोध कार्यात अनेक अडचणी व अडथळे निर्माण होतात.

ii) **योग्य संकल्पनाची निवड:** संशोधन आराखडा निर्मितीच्याकाळात संशोधनात वापरल्या जाणाऱ्या संकल्पनांची निवड करावी लागते. निवडलेल्या संकल्पना या संशोधन विषयातील अस्पष्ट व दडलेल्या वस्तुस्थितीचे सार व ते समोर आणण्याची क्षमता ठेवणाऱ्या सारभूत व समर्पक असणे आवश्यक आहे. अज्ञानतेत संकल्पनेची निवड करु नये किंवा दैवसंयोग पध्दतीचाही उपयोग संकल्पना निवडीसाठी करता काम नये. संशोधनात जे गृहितक (Hypothesis) वापरले जाते त्याचे परीक्षण करण्याची क्षमता संकल्पनेत असणे आवश्यक आहे.

iii) **विश्वासार्हता :** सामाजिक शास्त्रातील शोध अध्ययनात विषयवस्तूच्या अनुषंगाने ज्या तथ्य सामग्रीचा उपयोग केला जातो, त्या माहिती व आकडेवारीच्या प्रमाणतेची व विश्वसनियतेची पडताळणी करणे गरजेचे असते. तसेच संशोधनाचा निष्कर्ष हा शोध विषयवस्तूच्या प्रयोजनाशी समरूप आहे किंवा नाही याचा

देखील पडताळा केला पाहिजे. कारण शोध कार्याअंती अशी पडताळणी केल्यानंतरच शोध विषयवस्तूच्या यशस्वीता व त्याची विश्वसनियता प्रस्थापित होऊ शकेल.

vi) **चलांची** (Variables) **व्याख्या:** संशोधन आराखडयात संबंधित चल, घटना, व्याप्ती व उद्देश आदींची व्याख्या केली जाते. अशी व्याख्या ही शोध कार्याचे दिग्दर्शन करीत असते. शोध विषयवस्तूच्या स्वरुपानुसार चलांचे स्थिर किंवा परिवर्तनीय मूल्यांचे स्पष्टीकरण करावे लागते. चलांच्या स्वरुपातील परिवर्तन हे शोध विषयवस्तूच्या स्थिती व व्याप्तिशी निगडित असते.

v) **लवचिकता** (Flexibility) **:** संशोधन आराखड्यात अनेक तत्त्वांचा अंतर्भाव असतो. अशा तत्त्वांना संशोधन आराखडयात स्थान देण्यासाठी आराखड्यात लवचिकता असावी लागते. अनेकदा प्रारंभी समाविष्ट सर्व तत्त्वे परिस्थितीनुसार बदलत असतात. म्हणून अशा काही अनुपयुक्त व अनावश्यक तत्त्वांना आराखड्यातून बाहेर काढण्यासाठी व त्याऐवजी आवश्यक व उपयुक्त तत्वांना समाविष्ट करण्यासाठी संशोधन आराखड्यात लवचिकता असणे आवश्यक असते.

संशोधन आराखडयात संशोधन उद्दिष्ट पूर्तिसाठी ज्या ज्या बाबींना अधिक महत्त्व दिले आहे त्यांचा समावेश करुन त्यांची उपयोगिता, शुध्दता, सत्यता व सखोल व सूक्ष्म अध्ययन करण्याची त्यांची क्षमताही स्पष्ट केली पाहिजे. असे न केल्यास संशोधनाचे परिणाम अविश्वसनीय व कुचकामी बनतील. अध्ययनाची व्याप्ती संशोधकत्याच्या क्षमतांवर अवलंबून असते.

**संशोधन आराखड्याचे प्रकार** (Kinds of Research Design ) :

सामाजिक शास्त्रातील संशोधन अध्ययनासाठी जे अनेक आराखडे उपलब्ध आहेत त्यापैकी काही अत्यंत महत्त्वाचे व प्रचलित आराखडे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. अन्वेषणात्मक किंवा निरुपणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखडा (Exploratory Research Design)

२. वर्णनात्मक संशोधन आराखडा (Descriptive Research Design),

३. निदानात्मक संशोधन आराखडा (Diagnostic Research Design),

४. प्रयोगात्मक किंवा परीक्षणात्मक संशोधन आराखडा (Experimental Research Design).

**१. अन्वेषणात्मक किंवा निरुपणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखडा** (Exploratory Research Design) :

जेव्हा संशोधनाचा उद्देश 'कार्यकारण' संबंधाचा शोध घेणे असते तेव्हा अन्वेषणात्मक संशोधन आराखडयाचा उपयोग शोध विषयवस्तूच्या अध्ययनासाठी केला जातो. कार्य - कारण संबंधाचा शोध घेण्यासाठी ज्या वैज्ञानिक व व्यवस्थित पद्धतीचा उपयोग केला जातो त्यास अन्वेषणात्मक किंवा निरुपणात्मक

किंवा परिचयात्मक संशोधन आराखडा असे म्हणतात. जेव्हा विषयवस्तूच्या शोध कार्यासाठी प्रचलित अन्य आराखडे अनुपयुक्त ठरतात तेव्हा प्रस्तुत संशोधन आराखड्याचा अवलंब केला जातो. हा आराखडा शोध कार्यासाठी यशस्वी होण्यासाठी त्यामध्ये योग्य प्रकाशित साहित्याचे पुनर्निरीक्षण, अनुभव सर्वेक्षण, अन्तर्दृष्टि प्रोत्साहित घटनांचे विश्लेषण आदि महत्त्वपूर्ण तत्वांचा समावेश असणे आवश्यक आहे.

प्रस्तुत संशोधन आराखडा अत्यंत लोकप्रिय आहे. कारण अन्य आराखड्यांच्या तुलनेत या आराखड्याचा वापर करुन शोधकार्य पूर्ण करणे हे संशोधनकर्त्याला अधिक सहज व सुलभ आहे. शोध विषयवस्तूच्या अनुषंगाने जेव्हा अन्य आराखडे संशोधनासाठी  उपयुक्त ठरत नाहीत. येत नाहीत तेव्हा या आराखड्याचा वापर करावा लागतो. म्हणूनही याला अधिकाधिक महत्त्व प्राप्त होत आहे.

२. **वर्णनात्मक संशोधन आराखडा** (Descriptive Research Design) :

उपलब्ध तथ्य, माहिती व आकडेवारीच्या आधारावर शोध विषयवस्तूचे अधिक सखोल व विस्तृत स्पष्टीकरण करणे हा वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उद्देश आहे. वर्णनात्मक संशोधन आराखड्यात संज्ञा, संकल्पना व परिभाषेला सर्वाधिक महत्त्व आहे. या संशोधन आराखड्यात समस्येचे स्पष्टीकरण, समस्येतील प्रश्नांची उत्तरे, त्यांचे विश्लेषण, अर्थनिर्वचन, सिध्दांत - निर्मिती, सामान्यीकरण आदि बाबींवर विचार होतो. संशोधनकर्त्याला शोध अध्ययनासाठी निवडलेल्या विषयवस्तूची संपूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. सामग्री सत्य व वास्तविक असेल तरच वैज्ञानिक अध्ययन होईल, अन्यथा अध्ययनाचे स्वरूप तत्त्वज्ञानीय किंवा अशास्त्रीय व विस्कळीत बनेल. या संशोधन आराखड्याचा आधार विश्वसनीयता व वास्तविकता हा असतो. या  आधारे तथ्यपूरक विश्लेषणातून प्राप्त नवीन माहितीचे अर्थनिर्वचन केले जाते. अशी अर्थनिर्वचन प्रक्रिया ही वर्णनात्मक विश्लेषण पद्धती म्हणून ओळखले जाते आणि जेंव्हा संशोधनकर्ता हा अशा वर्णनात्मक अर्थनिर्वचनाला आपल्या शोधकार्य आराखडयाच्या केंद्रस्थानी ठेवतो तेंव्हा त्याला वर्णनात्मक संशोधन आराखडा  असे म्हणतात.

३. **निदानात्मक संशोधन आराखडा** (Diagnostic Research Design) :

जेव्हा संशोधनाचा उद्देश 'समस्येच्या' कारणांचा शोध घेणे व त्यांचे निराकरण करण्यासाठी योजना प्रस्तुत करण्याचा असतो तेंव्हा शोध अध्ययनासाठी निदानात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग केला जातो. निदानात्मक संशोधन आराखड्याला सामाजिक शास्त्रांनी वैद्यकीय शास्त्रातून स्वीकारले आहे. ज्याप्रमाणे वैद्यकीय शास्त्र रोग, रोगाचे निदान व त्यावर उपचार योजना सुचविते तर सामाजिक शास्त्रातील संशोधनकर्ता हा उपचार सुचवितो. संशोधनकर्ता उपलब्ध तथ्य सामग्रीच्या आधारावर अशा निदानात्मक संशोधन

आराखड्याद्वारे गृहीतकाची निर्मिती करतो, त्यामुळे शोध विषयवस्तुतील समस्या सोडविण्यात देखील सहाय्य प्राप्त होऊ शकते.

४. **परीक्षणात्मक संशोधन आराखडा** (Experimental Research Design):

परीक्षणात्मक संशोधन आराखड्याद्वारे शोधकार्यास यथार्थवादी बनविले जाऊ शकते. हा आराखडा प्रत्यक्ष 'प्रयोगशाळा पध्दती' म्हणून देखील ओळखला जातो. अतिशय नियंत्रित परिस्थितीत सामग्रीचे संकलन, परीक्षण व विश्लेषण केले जाते. त्याचबरोबर बदलत्या परिस्थितीचे व वस्तुस्थितीचे ज्ञान प्राप्त करणे व त्याच्या प्रभावामुळे व्यक्ती व समाजाच्या प्रवृत्तीत आलेले बदल जे की  सामाजिक जीवनातही स्थित्यंतर घडवितात अशा स्थित्यंतराचे अध्ययन हे परीक्षणात्मक संशोधन आराखड्याद्वारे केले जाते. या आराखड्यात केलेले अध्ययन पूर्णतः प्राकृतिक विज्ञानातील संशोधकास उपलब्ध आहेत.

सामाजिक शास्त्रातील कोणत्याही विषयाच्या संशोधनकर्त्यास शोध अभ्यासासाठी घेतलेल्या विषयवस्तूवर तंतोतंत नियंत्रण ठेवणे अशक्य असते. त्यामुळे सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनकर्त्याने आपल्या शोध कार्यासाठी ज्या संशोधन आराखड्याची निवड केली असेल त्यासाठी संशोधनकर्त्याने पूर्व तयारी करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी विषयानुषंगाणे विविध संस्था, संघटनांची मदतही प्राप्त केली पाहिजे. संशोधनासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या तथ्य सामग्रीची प्रामाणिकता व उपयुक्तता तपासून बघितली पाहिजे. गरज भासल्यास संशोधनकर्त्याने लघु अध्ययन व पूर्व परीक्षण पध्दतीचाही  अवलंब करणे आवश्यक आहे. अनेकदा नियोजित आराखड्याचा उपयोग करुन  शोध कार्याचे लक्ष्य प्राप्त केले जाऊ शकत नाही. अशा स्थितीमध्ये संशोधनकर्त्याने अवलंबलेल्या परीक्षण प्रक्रियेत 'बदल किंवा संशोधन आराखड्यात सुधारणा देखील करणे आवश्यक असते.

थोडक्यात संशोधन आराखडा म्हणजे प्रस्तावित किंवा नियोजित संशोधनाचे प्रतिबिंब होय. त्यामध्ये समस्येची निवड, संशोधनाची उद्दिष्ट्ये, गृहितके, संशोधन समस्येचे स्पष्टीकरण, संशोधनाची पद्धती, सामग्रीचे संकलन, संकलित सामग्रीची विश्लेषण पद्धती, शोध विषयवस्तूची व्याप्ती व मर्यादा, प्रकरण संरचना आदींचा समावेश होतो.

### २.२.४ तथ्य संकलन (Data Collection)

संशोधन विषयाच्या उद्दिष्ट्यानुसार अभ्यासक्षेत्रामधून संबंधित माहितीचे संकलन म्हणजेच तथ्य संकलन (Data Collection) होय. संशोधनामध्ये विषयाच्या अनुषंगाने माहिती व तथ्यांचे संकलन ही एक अतिशय महत्त्वाची पायरी मानली जाते. कारण संशोधनकर्ता तथ्य सामग्रीला आपल्या शोध कार्याचा आधार बनवून व त्यासाठी संपूर्णपणे शास्त्रशुद्ध व वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब करीत असतो. तथ्य म्हणजे जे जसे आहे ते तसे पाहणे. तथ्य हे अनुभवक्षम असतात. ज्ञानेंद्रीयांच्या आधारे होणारा वास्तविक बोध म्हणजे तथ्य.  केवळ मूर्त

वस्तु अथवा घटिते यांनाच तथ्य म्हणता येणार नाही तर सामाजिक शास्त्रांमध्ये अनुभव, विचार इतकेच नाही तर भावनादेखील तथ्यांच्या वर्गवारीत येतात, तथ्यांना त्या संदर्भातील घटनांच्या स्वरूपात तपासून बघितले पाहिजे की ज्यांची खात्रीपूर्वक पुष्टी केली जाऊ शकेल असे पोलिंग यंग म्हणतात. संकलित केलेली माहिती, तथ्य अचूक व विश्वसनीय असतील तरच संशोधनाअती निघणारे निष्कर्ष हे देखिल अचूक असतील. संशोधन हे तथ्य संकलनावर आधारलेले असते. तथ्य संकलनासाठी संशोधकाला सर्वकश जाणीव, अनुभव व ज्ञानाची आवश्यकता असते. कोणत्याही संशोधनासाठी तथ्य संकलित करीत असताना संशोधनकर्ता हा तत्परशील, सवेदनशील व जबाबदारीचे जाणीव असणारा असला पाहिजे. सामाजिक शास्त्रातील सर्व प्रकारच्या संशोधनकार्यात तथ्य ही प्राथमिक व दुय्यम पद्धतीद्वारे संकलित केली जातात.

सामाजिक शास्त्रातील कोणत्याही विद्याशाखेतील संशोधनात एकदा अभ्यास विषय निश्चित झाल्यानंतर त्या अभ्यासविषयासंबंधीची तथ्य गोळा करणे अत्यंत आवश्यक असते. अभ्यासाविषयी निष्कर्ष अधिक वस्तूनिष्ठ व सर्वमान्य होण्यासाठी तथ्यांचा आधार केव्हाही महत्वाचा असतो. तथ्य म्हणजे जसे आहे ते तसे रेखाटणे होय. विश्वसनियता व वस्तूनिष्ठता हे तथ्यांचे महत्वाचे गुण आहेत. तथ्य म्हणजे घटनेविषयी व्यक्त केलेली क्रिया, प्रतिक्रिया आणि यांच्या पुढची पायरी म्हणजेच प्रतिक्रियेची नोंद असते.

माहिती गोळा करणे, तथ्य संग्रह करणे ही एक पद्धतशीर प्रक्रिया आहे. याद्वारे संशोधनकर्त्याला अपेक्षित संशोधन प्रश्नांची उत्तरे, गृहीतकांची चाचणी आणि परिणामांचे मूल्यांकन करण्यास सक्षम बनविते. तथ्य संकलन ही संशोधन प्रक्रियेतील पहिली आणि सर्वात महत्त्वाची पायरी आहे. संशोधन कार्यात एखाद्या विशिष्ट विषयाबद्दल माहिती किंवा तथ्यांचे संकलन करणे, त्यांचे मोजमाप करणे आणि तथ्यांचे विश्लेषण करणे आदि बाबींचा समावेश होतो. 'तथ्य' या मराठी शब्दाला इंग्रजीमध्ये 'Fact' असे म्हणतात. तथ्य म्हणजेच जसे आहे तसे पाहणे किंवा त्याचे वास्तविक चित्र रेखाटणे होय. सामाजिक तथ्ये ही आचार-विचार, अनुभव, वर्तन-व्यवहार, क्रिया-प्रतिक्रिया आदींच्या संबंधित असणारी प्रक्रिया आहे. तथ्य ही अनेक प्रकारची असू शकतात. उदाहरणार्थ, मूल्ये, संख्या, शब्द, निरीक्षणे किंवा अगदी काही बाबतीत ते गोष्टींचे वर्णन देखील असण्याची शक्यता असते. तेंव्हा निश्चित अशा उद्देशाने गोळा केलेल्या माहितीला 'तथ्य' असे म्हणतात.

संशोधनकर्त्याने संशोधन विषयाची व्याप्ती व संशोधन पद्धती निश्चित केल्यानंतर संशोधनकर्त्याला तथ्य संकलन करावे लागते. तथ्य संकलन करताना विशिष्ट पध्दतीचा अवलंब करावा लागतो. यामध्ये साधारणपणे निरिक्षण, मुलाखत, प्रश्नावली, पाहणी आदि तथ्य संकलन तंत्र व साधनांचा तथ्य संकलनासाठी संशोधनामध्ये उपयोग केला जातो. संशोधकाला संशोधन विषयाचे सखोल ज्ञान असावे लागते. त्यास शोध विषयासंबंधीत वाचन साहित्याचा अभ्यास असावा लागतो. तरच संशोधनकर्त्याकडून योग्य पध्दतीचे तथ्य संकलन शक्य होते. संशोधकाने संशोधनासंबंधी तथ्याचे संकलन केल्यानंतर त्याचे वर्गीकरण करणे आवश्यक असते. संशोधकाने संकलित केलेले तथ्य, माहिती व आकडेवारी ही अस्ताव्यस्त व विखुरलेली असते. तेंव्हा

अशा अवस्थेत असलेली माहिती व्यवस्थीत करणे आवश्यक असते. कारण त्याशिवाय शोध कार्याचे ईप्सित साध्यच होऊ शकत नाही. म्हणूनच 'तथ्य संकलन' ही संशोधन कार्यातील अतिशय महत्वाची पायरी ठरते.

**तथ्यांचे प्रकार** (Types of Data)

सामाजिक शास्त्रातील शोध कार्यासाठी आवश्यक तथ्य संकलन पुढील दोन प्रकारांनी केले जाते.

**प्राथमिक तथ्य** (Primery Data)

जेंव्हा संशोधनकर्ता आपल्या संशोधन कार्यासाठी मूळ स्वरूपातील तथ्य संकलित करतो तेंव्हा त्या तथ्यांना प्राथमिक तथ्य म्हणतात. जी तथ्ये प्रथमत: नव्याने संकलित केली जातात आणि अशा तथ्यांमध्ये मूळ वैशिष्ट्ये असतात, म्हणूनच अशा तथ्यांना प्राथमिक तथ्य म्हणतात.

संशोधकर्ता स्वतः क्षेत्र स्थळी उपस्थित राहून निरिक्षण, अनुसूची, साक्षात्कार किंवा मुलाखत, प्रश्नावली, निरीक्षण आदींच्या माध्यमातून माहिती व आकडेवारी संकलित करतो. अशाप्रकारे घटना स्थळावर व्यक्ती आणि वस्तूपासून उपलब्ध झालेल्या तथ्य सामग्रीला प्राथमिक तथ्य सामग्री म्हटले जाते. उदाहरणार्थ, संशोधनकर्ता जर निवडणूक काळात मतदारांचे वर्तनावर अभ्यास करीत असेल. तर संशोधनकर्त्याने निवडणूक काळात प्रत्यक्ष मतदारांना भेटून मुलाखतीद्वारे किंवा प्रश्न विचारुन माहिती संकलित करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे संकलित माहिती तथा सामग्रीलाच प्राथमिक तथ्य (Primery Data) असे म्हणतात.

**दुय्यम तथ्य** (Secondary Data)

जेंव्हा संशोधनकर्ता आपल्या संशोधन कार्यासाठी मूळ स्वरूपातील तथ्य संकलित न करता इतर संशोधनकर्त्याने किंवा एखाद्या संस्था, संघटनेने संकलित केलेली, प्रकाशित झालेली किंवा प्रकाशित न झालेली सामग्री वापरतो, तेंव्हा अशा सामग्रीस दुय्यम तथ्य म्हटले जाते. दुय्यम किंवा द्वितीयक तथ्य सामग्री ही अशा स्वरूपाची माहिती आहे की, जी संशोधनकर्ता प्रकाशित किंवा अप्रकाशित दस्तावेज, पाण्डुलिपी (Manuscripts), जीवनी, आत्मचरित्र, संस्मरण, दैनंदिनी, पत्र, अहवाल चरित्र, आदींच्या माध्यमातून संकलित करतो. उदाहरणार्थ संशोधनकर्ता जर निवडणूक काळात मतदारांचे वर्तनावर अभ्यास करीत असेल आणि त्यासाठी संशोधनकर्ता जेंव्हा निवडणुक काळात प्रत्यक्ष मतदारांना प्रश्न न विचारता किंवा निवडणूक काळात मतदारांच्या वर्तनाचे निरीक्षण न करता मतदार वर्तनावर प्रकाशित पुस्तके किंवा नियतकालिकांमधून प्रकाशित झालेल्या लेखांमधून सामग्री संकलित करतो, अशा सामग्रीला दुय्यम तथ्य (Secondary Data) असे म्हणतात.

संशोधनकर्ता तथ्य सामग्रीला आपल्या शोध विषयाचा आधार मानून संशोधन कार्य करित असतो. तथ्य सामग्रीशिवाय शोधकार्य शक्य होत नसते. सामाजिक विज्ञानातील शोधकार्यासाठी वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब केला जातो. आणि अशा वैज्ञानिक पद्धतीद्वारा अवलंब केली जाणारी सर्व साधने ही 'तांत्रिक' स्वरुपाची

असतात. परिणामी, तथ्य सामग्रीचे स्वरूप व प्रकृती भिन्न असल्याचे आढळून येते. संशोधनकार्याचे यश हे तथ्य सामग्री संकलन साधनांच्या विश्वसनियतेवर अवलंबून आहे. संशोधकाला अध्ययन सुरु करण्यापूर्वी संकलन साधनांची पूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. तसेच तथ्य संकलन साधनातील फरक, उपयोगात आणावयाची पध्दती, त्यांचे प्रकार, आदिबाबतही माहिती असणे आवश्यक आहे. सामाजिक संशोधनात तथ्यांचे विभिन्न प्रकार व त्यांना प्राप्त करण्यासाठी विविध साधने उपलब्ध आहेत. शोध विषयाच्या प्रकृतीनुसार तथ्य सामग्री संकलित करण्याच्या प्रकार व पद्धतीला प्राधान्य दिली पाहिजे.

लुण्डबर्गने स्त्रोतांचे ऐतिहासिक स्त्रोत व क्षेत्रीय स्त्रोत असे दोन प्रकार केले आहेत. त्याच्या मते, ऐतिहासिक स्त्रोतामध्ये बखर, आत्मचरित्र, दैनंदिनी, पत्रव्यवहार, अहवाल, दस्तावेज, शिलालेख, पाण्डुलिपी चरित्र आदींचा समावेश होतो. तर क्षेत्रीय स्त्रोतामध्ये प्रत्यक्ष क्षेत्रस्थळी व्यक्ति संपर्कात येऊन त्यांनी केलेल्या व्यवहाराचे निरीक्षण, अवलोकन व क्षेत्रातील अन्य बाबीच्या निरीक्षणाचा समावेश होतो.

पाऊलिन यंगने स्त्रोतांचे दस्तावेजी स्त्रोत व क्षेत्रीय स्त्रोत असे दोन मानले आहेत. त्याच्या मते, दस्तावेजी स्त्रोतामध्ये सर्व पारकरचे दस्तावेज, आकडेवारी, बखरी, पत्र, पाण्डुलिपी, दैनंदिनी, आदींचा समावेश होतो. तर क्षेत्रीय स्त्रोतामध्ये व्यक्तींचा समावेश होतो.

अशाप्रकारे संशोधनासाठी निवडलेल्या समस्येचे उत्तर देण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान किंवा माहिती मिळवण्यासाठी उपरोक्त विश्लेषित प्रथम व दुय्यम पद्धतींद्वारे तथ्य संकलन करणे महत्त्वाचे कसे आहे ते स्पष्ट होते. सामान्यपणे तथ्य सामग्रीच्या संकलन पद्धतींमध्ये सर्वेक्षण, लक्ष्यकेंद्री गट, मुलाखती, निरिक्षणे, प्रयोग, आणि  दुय्यम तथ्य सामग्री आदींचा समावेश होतो. या पद्धतींद्वारे गोळा केलेल्या तथ्य सामग्रीचे नंतर विश्लेषण केले जाऊ शकते, संशोधन गृहीतकांचे समर्थन किंवा खंडन केले जाऊ शकते आणि तसेच शोध विषयाबद्दल निष्कर्ष काढण्यासाठी अशा तथ्य सामग्रीचा उपयोग केला जाऊ शकतो. कारण वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब करून संकलित केलेल्या तथ्यांच्या आधारावरच शेवटी शोध कार्याचे ईप्सित साध्य केले जाऊ शकते.

## २.३ सारांश

संशोधन प्रक्रियेमध्ये अनेक महत्त्वपूर्ण पायऱ्यांचा अंतर्भाव होतो. संशोधन प्रक्रियेतील याच पायऱ्यांच्या आधारे संशोधनकर्त्याला आपले शोध कार्य यशस्वीपणे पूर्ण करता येऊ शकते. संशोधन प्रक्रियेमध्ये प्रामुख्याने 'समस्या सूत्रण' (Formation of Problem), 'गृहीतके' (Hypothesis), 'संशोधन आराखडा' (Research Design), आणि 'तथ्य संकलन' (Data Collection) या अत्यंत महत्त्वपूर्ण पायऱ्या आहेत. संशोधन करणे हे किती कष्टाचे, जिकीरीचे व वैज्ञानिक पद्धतीचे आहे हे यावरून स्पष्ट होते. संशोधनकर्ता जेंव्हा एखाद्या विशिष्ट विषय समस्येची शास्त्रीय उकल करण्यासाठी शोधकार्य हाती घेतो तेंव्हा त्याला वर

विश्लेषित एका वैज्ञानिक शोध प्रक्रियेचा अवलंब करावा लागतो. संशोधन करण्यासाठी एका विशिष्ट अशा वैज्ञानिक प्रक्रियेतून जावे लागते. संशोधनासाठी वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब करावा लागतो. संशोधनासाठी संशोधनकर्ता अतिशय सजग असणे आवश्यक आहे. कारण संशोधनकर्त्याला आपल्या भोवतालाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, नैसर्गिक अशा सर्व प्रकारच्या पर्यावरणाविषयीचे भान व अभ्यास असणे गरजेचे आहे. कोणत्याही सामाजिक शास्त्रातील संशोधनामध्ये संशोधनाची प्रक्रिया समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सामान्यपणे कोणत्याही सामाजिक शास्त्रातील शोध कार्याला 'समस्या सूत्रण' (Formation of Problem), 'गृहीतके' (Hypothesis), 'संशोधन आराखडा' (Research Design), आणि 'तथ्य संकलन' (Data Collection) या निश्चित पायऱ्यांच्या प्रक्रियेतून जावे लागते. वर विश्लेषित संशोधन प्रक्रियेतील या पायऱ्या एकमेकांवर अवलंबून असतात. त्यामुळे संशोधनकर्त्यांकडून या पायऱ्यांतील क्रमाचे तंतोतंत पालन होणे आवश्यक आहे.

## ३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

**संशोधन (Research) :**

संशोधन हा मराठीतील शब्द 'सं' + 'शोधन' या दोन शब्दांनी मिळून बनलेला आहे. यामध्ये 'सं'चा अर्थ संपूर्ण किंवा समग्र असा होतो आणि अशा समग्राचे 'शोधन' अर्थात जे ज्ञात आहे, त्यामध्ये आणखी नवीन किंवा जे अज्ञात आहे ते शोधून काढणे. संशोधन म्हणजे सामाजिक शास्त्रासह अगदी कोणत्याही ज्ञानाच्या शाखेत नवीन तथ्ये आणि तत्वांचा शोध घेण्यासासाठी अस्तित्वात असलेल्या तथ्ये व तत्वांचे पुन्हा-पुन्हा परीक्षण करणे होय.

**समस्या (Problem) :**

'Problem' हा इंग्रजी भाषेतील शब्द 'Proballein' या ग्रीक भाषेतील शब्दापासून बनलेला आहे. ग्रीक भाषेत 'Proballein' चा अर्थ 'उलगडण्यासाठी दिलेला प्रश्न' असा आहे. इंग्रजीत 'Problem' या शब्दाचा अर्थ 'A difficult question to be solved', तसेच 'A thing difficult to understand' असा होतो. 'Problem' साठी मराठीत 'समस्या' या शब्दाचा उपयोग केला जातो. 'समस्या म्हणजे उपलब्ध माहिती आणि साध्य यांच्यामध्ये निर्माण झालेली अडचण किंवा अडथळा होय'.

**समस्यासूत्रण (Formation of Problem) :**

संशाधकाने अध्ययन विषयाची निवड केल्यानंतर नेमके कशाचे संशोधन करायचे आहे? नेमके काय शोधून काढायचे? नेमके कोणती तथ्ये संपादित करायची? कोणत्या साधनांनी व पद्धतीने तथ्ये संकलित करायची? हे संशोधकाला निश्चित करावे लागते. त्यासाठी सामान्य संशोधन विषयाचे संशोधन समस्येत

रूपांतर करणे नितांत गरजेचे असते. समस्यासूत्रण करणे म्हणजे संशोधनक्षम वाटेल अशी विषयाची मांडणी करणे होय. अर्थात संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या विषयक्षेत्राचे विशिष्ट संशोधन समस्येत रूपांतर करणे म्हणजे समस्यासूत्रण होय.

**गृहीतके किंवा उपकल्पना किंवा परिकल्पना (Hypothesis) :**

गृहीतके किंवा उपकल्पना किंवा परिकल्पना हे संशोधन कार्यातील विषयवस्तुशी संबंधित असे प्रस्तावित उत्तर किंवा प्रस्तावित उत्तरांचा समूह आहे कि ज्याचे परीक्षण अद्याप व्हावयाचे आहे. म्हणजेच अप्रमाणित प्रस्तावित उत्तर किंवा प्रस्तावित उत्तरांचा समूह हे गृहीतके किंवा उपकल्पना किंवा परिकल्पना होय. परिकल्पनेत मांडलेले निष्कर्ष हे अस्थायी व काल्पनिक असतात आणि त्यांची प्रामाणिकता संशोधनकर्ता अनुभवाने व वास्तविक तथ्यांच्या आधारे सिध्द करण्याचे प्रयत्न करतो.

**संशोधन आराखडा (Research Design) :**

संशोधनामध्ये 'Design' या शब्दाचा अर्थ 'Drawing an outline or planning of Arranging details' असा घेतला जातो, तर 'Research Design' चा अर्थ 'Planning a Strategy of Conducting Research' असा आहे. संशोधन आराखडा म्हणजे प्रस्तावित किंवा नियोजित संशोधनाचे प्रतिबिंब होय. त्यामध्ये समस्येची निवड किंवा समस्यासूत्रण, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके, संशोधन पद्धती, तथ्य संकलन, तथ्य विश्लेषण, प्रकरण संरचना आदिंचा अंतर्भाव होतो.

**तथ्य संकलन (Data Collection) :**

माहिती गोळा करणे, तथ्य संग्रह करणे ही एक पद्धतशीर प्रक्रिया आहे. 'तथ्य संकलन' ही संशोधन प्रक्रियेतील पहिली आणि सर्वात महत्त्वाची पायरी आहे. 'तथ्य' या मराठी शब्दाला इंग्रजीमध्ये 'Fact'असे म्हणतात. तथ्य म्हणजेच जसे आहे तसे पाहणे किंवा त्याचे वास्तविक चित्र रेखाटणे होय. सामाजिक तथ्ये ही आचार-विचार, अनुभव, वर्तन–व्यवहार, क्रिया-प्रतिक्रिया आदींच्या संबंधित असणारी प्रक्रिया आहे. तथ्य ही अनेक प्रकारची असू शकतात. उदाहरणार्थ, मूल्ये, संख्या, शब्द, निरीक्षणे किंवा अगदी काही बाबतीत ते गोष्टींचे वर्णन देखील असण्याची शक्यता असते. तेंव्हा निश्चित अशा उद्देशाने गोळा केलेल्या माहितीला 'तथ्य संकलन' असे म्हणतात.

## २.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

१. संशोधन म्हणजे काय?

२. समस्या सूत्रणाचा अर्थ सांगा?

३. संशोधन आराखड्याचे प्रकार सांगा?

४. संशोधनात गृहीतकांचे काय महत्व आहे?

५. तथ्य संकलनाची संकल्पना काय आहे?

## २. ६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. नवीन ज्ञान प्राप्तीच्या सुव्यवस्थित प्रयत्नातून केलेल्या संशोधन म्हणजे सामाजिक शास्त्रासह अगदी कोणत्याही ज्ञानाच्या शाखेत नवीन तथ्ये आणि तत्वांचा शोध घेण्यासासाठी अस्तित्वात असलेल्या तथ्ये व तत्वांचे पुन्हा पुन्हा परीक्षण करणे होय. असे परीक्षण करण्यासाठी संशोधकर्त्यांने वैज्ञानिक व पद्धतशीर पद्धतींचा अवलंब करून चिकित्सक अभ्यास करणे आवश्यक असते.

२. गृहीतके म्हणजे वैज्ञानिक पद्धतीची पहिली पायरी असून अध्ययन विषयातील घटनेचे ते संभाव्य स्पष्टीकरण असते. समस्येची संभाव्य उत्तरे ही संशोधनकर्त्याला अध्ययन विषयाच्या कोणत्या तरी पैलूमुळे व अध्ययन विषयाच्या पूर्वज्ञानामुळे सूचतात. अशा उत्तरांचे जेव्हा एखाद्या विधानामध्ये रूपांतर केले जाते तेव्हा असे उत्तर गृहीतक (Hypothesis) बनते.

३. संशोधन आराखड्याचे महत्वाचे प्रकार पुढीलप्रमाणे –

   १) अन्वेषणात्मक किंवा निरुपणात्मक संशोधन आराखडा

   २) वर्णनात्मक संशोधन आराखडा

   ३) निदानात्मक संशोधन आराखडा

   ४) परीक्षणात्मक संशोधन आराखडा

४. गृहीतके (Hypothesis) किंवा उपकल्पना हा संशोधनासाठी अतिशय महत्वाचा भाग आहे. त्यामुळे सामाजिक शास्त्रांच्या कोणत्याही विद्याशाखेत संशोधन करीत असताना गृहीतकृत्यांची नितांत आवश्यकता असते. गृहीतकांमुळेच निरीक्षणाला योग्य अशी दिशा मिळते. त्यामुळेच संशोधन कार्याचे विकसन व्यवस्थित पद्धतीने व्हायला मदत होते.

५. तथ्य संकलन ही एक व्यवस्थित व पद्धतशीर पद्धतीने विशिष्ट संशोधन विषयासाठी आवश्यक असणा-या चलांवर माहिती गोळा करण्याची आणि मूल्यमापन प्रक्रिया आहे. ज्याद्वारे संशोधनकर्त्याला आपल्या संशोधन विषयाच्या प्रश्नांची उत्तरे, गृहीतकांची चाचणी आणि परिणामांचे मूल्यांकन करण्यास सक्षम करते.

## २.७ सरावासाठी स्वाध्याय

१. संशोधन म्हणजे काय? ते सांगून संशोधनाची प्रक्रिया सविस्तर स्पष्ट करा.

२. संशोधनातील समस्यासूत्रणाची प्रक्रिया स्पष्ट करा.

३. संशोधन समस्येच्या अर्थपूर्णतेसाठी आवश्यक अटी कोणत्या? यावर सविस्तर चर्चा करा.

४. गृहीतके म्हणजे काय? ते सांगून गृहीतकांची वैशिष्ट्ये सविस्तर स्पष्ट करा.

५. गृहीतकांची निर्मिती प्रक्रिया सविस्तर स्पष्ट करा.

६. संशोधन आराखड्याचा अर्थ सांगून त्याची वैशिष्ट्ये सविस्तर स्पष्ट करा.

७. संशोधन आराखड्याचे महत्व विशद करा.

८. संशोधनात तथ्यांचे महत्व सविस्तर विशद करा.

९. तथ्य संकलनाच्या पद्धतींची सविस्तर चर्चा करा.

## २.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


१. पाटील, व्ही. बी. (२०१२): संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

२. भांडारकर, पी. एल. (१९९४): सामाजिक संशोधन पद्धती. हिमालया पब्लिशिंग हाऊस. नवी दिल्ली.

३. जरारे, व्ही. एल. (२००४) : संशोधन प्रणाली, अद्वैत प्रकाशन, अकोलो.

4. Gauba, O. P. (1981): Methods in Social Research Interviewing in Social Research. McGraw Hill. New Delhi.

5. Goode and Hatt. (१९६८): Research Mothodology in Social Science. Mac Graw Hill Publishing Company. New York.

6. Kothari, C. R. (2004): Research Methodology: Methods and Techaigues. New Age International Publisher. New Delhi.

7. Rao, A. B. (2008): Research Methodology. Excel Books. New Delhi.


❑❑❑

# घटक ३
# संशोधन पद्धती

**अनुक्रमणिका**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

    ३.२.१ संशोधन पद्धती अर्थ

    ३.२.२ संशोधन पद्धतीची वैशिष्ट्ये व उद्दिष्ट्ये

    ३.२.३ क्षेत्रीय अभ्यास पद्धत

    ३.२.४ नमुना निवड पद्धत

    ३.२.५ व्यष्टी अध्ययन पद्धत

    ३.२.६ निरीक्षण पद्धत

    ३.२.७ सर्वेक्षण पद्धत

    ३.२.८ मुलाखत पद्धत

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक संज्ञा

३.५ सरावासाठी प्रश्न

३.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्ट्ये

- संशोधन पद्धतीचा अर्थ आणि प्रकार समजून घेणे.
- संशोधन पद्धतीतील क्षेत्रीय अभ्यास पद्धत समजून घेणे.
- संशोधनातील नमुना निवड आणि व्यष्टी पद्धतीची माहिती घेणे.
- निरीक्षण आणि सर्वेक्षण पद्धती समजून घेणे.
- संशोधन पद्धतीतील  मुलाखत पद्धतीची माहिती करून घेणे.

## ३.१ प्रास्ताविक :

एखाद्या समस्येबद्दलची माहिती पध्दतशीरपणे जमा करणे, त्याचे योग्य प्रकारे व्यवस्थापन करणे आणि संकलित माहितीचे तर्कशुद्धरित्या अर्थनिर्वचन करणे म्हणजे संशोधन होय. ज्ञानाचे क्षेत्र व्यापक करण्याकरिता,

समस्यांचे आकलन व निराकरण करण्याकरिता संशोधन महत्त्वाचे साधन आहे. तसेच एखाद्या समस्येबद्दलची माहिती पध्दतशीरपणे जमा करणे, त्याचे योग्य प्रकारे व्यवस्थापन करणे आणि संकलित माहितीचे तर्कशुद्धरित्या अर्थनिर्वचन करणे म्हणजे संशोधन होय. ज्ञानाचे क्षेत्र व्यापक करण्याकरिता, समस्यांचे आकलन व निराकरण करण्याकरिता संशोधन महत्त्वाचे साधन आहे.

## ३.२ विषय विवेचन :

### ३.२.१ संशोधन पद्धतीचा अर्थ :

संशोधन पद्धती ही एखाद्या विषयाची माहिती ओळखण्यासाठी, निवडण्यासाठी, प्रक्रिया करण्यासाठी आणि विश्लेषण करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट प्रक्रिया किंवा तंत्रे आहेत. संशोधन पद्धती म्हणजे तथ्य व तत्त्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा किंवा परिश्रम किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत पद्धतशीर केलेले परिश्रम होय.

ज्ञान मिळविण्यासाठी, सत्य शोधण्यासाठी माणसाची अव्याहतपणे धडपड चालूच असते. संशोधनाची बैठक ही वस्तुनिष्ठ व तार्किक असली पाहिजे. अभ्यास विषयासंबंधी शोधलेले पुरावे, त्यातील क्रम, त्याचा संबंध, कार्यकारण भाव इ. लक्षात घेऊन अत्यंत तर्कशुद्ध व वस्तुनिष्ठ पद्धतीने निष्कर्ष काढले जातात. त्या पद्धतीला संशोधन पद्धती म्हणतात.

- पी. व्ही. यंग यांच्या मते, संशोधन पद्धती म्हणजे नवीन तथ्ये शोधण्यासाठी अथवा जुन्या तथ्यांचे परिक्षण करण्यासाठी या तथ्यांमधील अनुक्रम, परस्पर संबंध, कार्यकारण भाव या विषयी स्पष्टीकरण आणि सामान्यीकरण प्रस्थापित करण्याची एक पद्धतशीर प्रक्रिया होय.
- व्ही. पी. मिचल यांच्या मते, व्यवस्थापनातील समस्याची पद्धतशीर तपासणीची प्रक्रिया म्हणजे संशोधन पद्धती होय.

### ३.२.२ संशोधन पद्धतीची वैशिष्ट्ये व उद्दिष्ट्ये :–

आधुनिक कालखंडामध्ये प्रामुख्याने २० व्या शतकानंतर सामाजिक शास्त्रामध्ये जी संशोधने झाली आहेत. तसेच वर्तमान परिस्थितीमध्ये जी संशोधने होत आहेत. त्यांचे स्वरुप लक्षात घेतल्यानंतर सामाजिक संशोधनाची विविध वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील. पॉलीन व्ही.यंग, गुड आणि हॅट यांच्यासारख्या संशोधन पध्दतीचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांनी संशोधनाची काही वैशिष्ट्ये सांगितली आहेत. त्यापैकी काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे विशद करता येतील.

**१) सामाजिक परिस्थितीतील विविध घटनांचा अभ्यास :–**

सामाजिक शास्त्रातील संशोधनात शास्त्रीय पध्दतीचा अवलंब करून सामाजिक परिस्थितीमधील विविध घटनांचे, त्या घटनांमधील परस्पर संबंधाचे तसेच कार्यकारण संबंधाचे अध्ययन केले जाते. व्यक्ती वर्तनाचे विविध पैलू, क्रिया-आतंरक्रिया, व्यक्ती वर्तनास प्रभावित करणारे विविध घटक यांचे तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात अध्ययन केले जाते.

**२) समाजजीवनातील प्रस्थापित समजुती आणि धारणांचे पुनर्विलोकन :–**

समाजामध्ये मानवी जीवनाशी संबंधित काही समजुती, विचार, रुढी, प्रथा, परंपरा, संकेत निर्माण झालेल्या असतात. त्यामुळे काळाच्या ओघात बदलत्या परिस्थितीनुरुप त्यांची उपयुक्तता ठरविणे आवश्यक असते. त्यासंबंधीची स्वीकृती किंवा विरोध (अस्वीकार) ठरविताना त्या संदर्भातील शास्त्रीय कारणे योग्य पध्दतीने दिली गेल्यास सामाजिक मानसिकतेला धक्का न पोहचविता बदल करणे शक्य होते. ही महत्वपूर्ण जबाबदारी संशोधक सामाजिक संशोधनाच्या माध्यमातून पार पाडतो.

उदा. राज्याच्या निर्मितीचा दैवी सिध्दांत, कार्ल मार्क्सचा साम्यवाद इ.

**३) तथ्य चिकित्सा :–**

व्यक्ती ज्या सामाजिक परिस्थितीमध्ये वास्तव्य करत असतो. त्यामध्ये सातत्याने सामाजिक–राजकीय बदल घडत असतात. कोणतीही परिस्थिती स्थिर व कायम स्वरुपी असत नाही. त्यामुळे परिस्थितीमध्ये होणाऱ्या या बदलांचे सातत्याने अध्ययन होणे गरजेचे बनते. त्या माध्यमातून नव–नवीन माहिती उपलब्ध होत जाते. तसेच या माहितीच्या आधारावर नवीन निष्कर्ष मांडता येतात. शिवाय जुन्या सिध्दातांचे, निष्कर्षांचे पुन:परिक्षण करुन त्या सदंर्भातील विश्वासर्हता तपासून पाहून त्याचा स्वीकार, अस्वीकार करता येणे शक्य होते.

**४) कार्यकारण संबंधाचा शोध घेणे शक्य :–**

मानवी वर्तनातील कार्यकारण संबंधाचा शोध सामाजिक संशोधनाच्या माध्यमातून घेतला जातो. मानवी वर्तन हे अत्यंत गुंतागुंतीचे असते. मानवाकडून विविध प्रकारचे वर्तन घडून येत असते. या वर्तनात एकसारखेपणा आढळून येत नाही. त्यामुळे या वर्तनात अनुक्रम, नियम आढळून येतो का? याची चिकित्सा करणे आवश्यक असते. ढोबळमानाने निरिक्षण केल्यास मानवी क्रिया किंवा वर्तनामध्ये परस्पर संबंध दिसून येत नाही. मात्र शास्त्रीय दृष्टीकोनातून चिकित्सकपणे अध्ययन केल्यास यामधील क्रिया–प्रतिक्रियांमध्ये कार्यकारण संबंध असल्याने लक्षात येते. तसेच हा कार्यकारण संबंध लक्षात घेऊन त्यासंबंधी एक सामान्य सूत्र लक्षात घेऊन नियम, सिध्दांत किंवा निष्कर्ष प्रस्थापित केले जाऊ शकतात.

**५) शास्त्रीय पध्दतींचा वापर :–**

सामाजिक संशोधनात शास्त्रशुध्द पध्दतीने संशोधन केले जाते. सामाजिक शास्त्रांना शास्त्रीय दर्जा प्राप्त व्हावा यासाठी अनेक नव–नवीन संशोधन पध्दतींचा स्वीकार सामाजिक शास्त्रात करण्यात आला आहे. तसेच निरिक्षण, परिक्षण, तथ्य संकलन, प्रश्नावली, अनुसूची, मुलाखत, वर्गीकरण इ. चा स्वीकार करून सामाजिक शास्त्रात निष्कर्ष मांडले जातात. त्यामुळे शास्त्रीय पध्दतीचा तंत्राचा संशोधनासाठी केला जाणारा वापर हे देखील सामाजिक संशोधनाचे महत्वाचे वैशिष्ट्ये आहे.

**सामाजिक संशोधनाचे उद्देश :–**

सामाजिक संशोधनाचे विविध उद्देश पुढीलप्रमाणे विशद करता येतील.

**१) ज्ञानप्राप्ती :–**

कोणतेही संशोधन ज्ञानप्राप्तीचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून केले जाते. नवीन ज्ञानाची भर घालून ज्ञानाची व्याप्ती वाढविणे या प्रमुख उद्येशाने संशोधन केले जाते. यासाठी नवीन तथ्यांचा शोध घेतला जातो तर जून्या तथ्यांचे निरिक्षण, परिक्षण करुन त्यांचा स्वीकार, अस्वीकार होत असतो. संशोधनातून जे निष्कर्ष प्राप्त होतील त्यांचे सामान्यीकरण/सार्वत्रिकरण होणे आवश्यक आहे. संशोधनातून प्राप्त झालेले निष्कर्ष सामान्य लोकांपर्यंत पोहचण्यासाठी त्यांचा प्रचार केल्यास त्यासंदर्भातील उपयुक्तता वाढते तथापि ते संशोधन केवळ संशोधकापुतेच मर्यादित राहते.

**२) कार्यकारण संबंधांचा शोध घेणे :–**

समाज जीवनातील कोणतेही घटना अचानक किंवा सहज घडून येत नाही. जसे पाऊस, पृथ्वीचे परिवलन, परिभ्रमण, भूकंप, ऋतुचक्र या घटना ज्या पध्दतीने अचानकपणे घडून येत नाहीत. तर काही विशिष्ट नियमाद्वारे या घटना नियंत्रित होत असतात. तसेच मानवी किंवा समाज जीवनातील घटनांच्या पाठीमागे काही नियम असलेले दिसून येतात. या नियमांचा शास्त्रीय संशोधन पध्दतीच्या आधारे शोध होऊन त्यामधील कार्यकारण संबंध शोधणे हा देखील सामाजिक संशोधनाचा एक प्रमुख उद्देश आहे.

**३) सामाजिक समस्या सोडविण्यासाठी :–**

प्राचीन काळी साधे व सरळ असणारे मानवी समाजीवन आज आधुनिक काळात अत्यंत जटील व गुंतागुंतीचे बनले आहे. त्यामध्ये विविध समस्यांनी प्रवेश केला असून त्या समस्या सोडविण्यासाठी, त्यांची उकल होण्यासाठी त्यासाठी शास्त्रीय पध्दतीने ज्ञान मिळविणे. तसेच मिळविलेले हे ज्ञान समाजातील मानवी जीवनातील विविध समस्यांची सोडवणूक करण्यासाठी उपयुक्त ठरावे हा देखील संशोधनाचा प्रमुख उद्देश असतो. बऱ्याच वेळा सामाजिक संशोधनातून प्राप्त झालेला निष्कर्षांचा अहवाल शासनाला सादर केला जातो. त्या अहवालाच्या आधारे शासन समाजजीवनातील विविध प्रश्नांची सोडवणूक करताना दिसते.

**४) सामाजिक तणाव दूर होण्यासाठी :–**

सामाजिक संशोधनाच्या माध्यमातून प्राप्त माहितीच्या व निष्कर्षाच्या वापर करून सामाजिक तणावदेखील दूर करता येतो. तसेच त्यातून सामाजिक संघटन साधता येते. बऱ्याचवेळा समाजजीवनात चुकीचे संकेत, प्रथा, रुढी पाळल्या जातात. त्या गैरसमजूती व विघटनास कारणीभूत ठरतात. उदा. भारतातील जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था इ. त्यामुळे त्यासंदर्भातील संशोधन करुन गैरसमज दूर केल्यास असे संशोधन समाजासाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकते.

**५) सामाजिक योजना तयार करण्यासाठी :–**

सामाजिक संशोधनाच्या माध्यमातून मांडलेले निष्कर्ष शासनाला धोरण निश्चित करताना मार्गदर्शक ठरतात. ज्या विशिष्ट भागासंबंधी संशोधन झालेले आहे. त्या संबंधीची सामाजिक, राजकीय, प्रशासकीय माहिती व प्रश्न शासनाला समजण्यास मदत होते. त्यामुळे त्या ठिकाणी कोणते कार्यक्रम व योजना आखण्यात याव्यात यासंबंधी ज्ञान प्राप्त होते. त्या पध्दतीने धोरणनिश्चिती होत असते.

उदा. डॉ. प्रकाश बाबा आमटे यांनी आदिवासी भागामध्ये केलेल्या संशोधन व कार्याचा शासनाला नवे कार्यक्रम तयार करताना उपयोग झाला.

### ३.२.३ क्षेत्रीय अभ्यास पद्धत :

क्षेत्रीय अभ्यास ही एक संशोधन पद्धत आहे. ज्यामध्ये नैसर्गिक निरीक्षणे आयोजित करणे आणि माहिती गोळा करणे समाविष्ट आहे. या पद्धतीमध्ये सहभागींचे निरीक्षण, मुलाखत घेणे आणि त्यांच्या वातावरणात, जसे की कार्यस्थळ, समुदाय किंवा नैसर्गिक निवासस्थानासोबत संवाद साधणे समाविष्ट आहे.

**क्षेत्रीय अभ्यासाचे नियोजन कसे करावे ? :**

यशस्वी संशोधन सुनिश्चित करण्यासाठी क्षेत्रीय अभ्यासाचे नियोजन करणे ही एक महत्त्वाची पहिली पायरी आहे. तुमचा क्षेत्रीय अभ्यास तयार करताना खालील पायऱ्या अवलंबणे आवश्यक आहे.

- **तुमचा संशोधन प्रश्न पारिभाषित करा :** एक चांगला संशोधन प्रश्न विकसित करताना, तुम्ही ते स्पष्ट, संक्षिप्त आणि विशिष्ट केले पाहिजे. एकदा तुमच्याकडे एक परिभाषित संशोधन प्रश्न आला की, तुम्हाला अभ्यास करण्यासाठी आवश्यक असलेली मुख्य माहिती गोळा करता येते.
- **तुमची संशोधन ठिकाण ओळखा :** संशोधन ठिकाण हे एक स्थान आहे. क्षेत्रीय अभ्यासाचे नियोजन करताना या ठिकाणाचा विचार महत्वाचा आहे.
- **तुमच्या माहिती संकलन पद्धती निश्चित करा :** योग्य पद्धत निवडणे हे संशोधन प्रश्न, आवश्यक माहितीचा प्रकार आणि सहभागींच्या वैशिष्ट्यांवर अवलंबून असेल.
- **आवश्यक परवानग्या मिळवा :** संशोधनाचे स्थान आणि अभ्यासाचे स्वरूप यावर आवश्यक परवानग्या अवलंबून असतात, तुमचे संशोधन करण्यापूर्वी तुम्हाला स्थानिक अधिकारी, संस्था किंवा व्यक्तींची परवानगी आवश्यक असू शकते. त्या संशोधकाने घ्याव्यात.

**क्षेत्रीय संशोधनाचे फायदे**

- **सत्यता:** नैसर्गिक वातावरणात केलेल्या क्षेत्रीय संशोधनामुळे संशोधकांना वास्तविक जीवनातील घटनांचे निरीक्षण आणि अभ्यास करण्याची अनुमती मिळते. ही सत्यता गोळा केलेल्या माहितीची वैधता आणि अचूकता वाढवते.

- **लवचिकता:** क्षेत्रीय संशोधन पद्धती लवचिक आणि विविध संशोधन संदर्भांना अनुकूल आहेत. संशोधक त्यांच्या संशोधन प्रश्नांच्या आणि सहभागींच्या विशिष्ट गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांची धोरणे समायोजित करू शकतात आणि संशोधन जसजसे उघड होईल तसतसे नवीन अंतर्दृष्टी उघड करू शकतात.
- **योग्य माहिती :** क्षेत्रीय पद्धती समृद्ध आणि तपशीलवार माहिती प्रदान करते, सहसा संदर्भित माहितीसह जी इतर संशोधन पद्धतींद्वारे मिळवणे कठीण असते. योग्य माहिती, ज्ञानाची खोली, संशोधन विषयाचे अधिक व्यापक आणि सूक्ष्म आकलन करण्यास अनुमती देते.

**क्षेत्रीय संशोधनाचे तोटे**

- **वेळ घेणारे:** संशोधकांना या क्षेत्रात वेळ घालवणे आवश्यक आहे, शक्यतो आठवडे किंवा महिने, आव्हानात्मक असू शकतात.
- **खर्च:** क्षेत्रीय संशोधन आयोजित करणे महाग असू शकते, विशेषतः जर संशोधन ठिकाणी विशेष उपकरणे किंवा सामग्रीची आवश्यकता असेल.
- **सहभागींवर अवलंबून राहणे:** सहभागींची नियुक्ती करणे आव्हानात्मक असू शकते आणि वैयक्तिक परिस्थिती, दृष्टीकोन आणि विश्वास यासारखे विविध घटक त्यांच्या सहभागावर प्रभाव टाकू शकतात.
- **नैतिक विचार:** क्षेत्रीय संशोधन नैतिक चिंता वाढवू शकते, प्रामुख्याने जर संशोधनात असुरक्षित लोक किंवा संवेदनशील विषयांचा समावेश असेल.

संशोधकांनी क्षेत्रीय संशोधनाचे फायदे आणि तोटे काळजीपूर्वक मोजले पाहिजेत आणि त्यांचे संशोधन प्रश्न, सहभागी आणि संदर्भ यावर आधारित सर्वात योग्य संशोधन पद्धत निवडावी.

### ३.२.४ नमुना निवड पद्धत :

संशोधक संशोधन करताना माहितीच्या स्रोताचा जो एक लहान संच निश्चित करतो, त्यास नमुना निवड असे म्हणतात. नमुना निवड हे व्यक्ती अथवा लोकसंख्या निवडीबाबतचे तंत्र आहे. संशोधन करत असताना विषय व्यापक असल्यामुळे सगळ्या घटकांचा किंवा लोकसंख्येचा समावेश संशोधन प्रकल्पात करता येत नाही. त्यामुळे नमुना निवड करून संशोधित बहुसंख्य किंवा विशिष्ट घटकांचे योग्य प्रतिनिधित्व साकारले जाईल या निकषावर नमुन्याची निवड केली जाते. मोठ्या गटातून प्रातिनिधिक स्वरूपाचा लहान गट निवडणे म्हणजे नमुना निवड होय.

- गुड आणि हॅट च्या मते, 'नमुना त्यातील नावाप्रमाणेच एक विस्तृत समुहाचा लघु प्रतिनिधी आहे.'
- श्रीमती पॉलिन यंग च्या मते, 'एक सांख्यिकीय नमुना त्या संपूर्ण समुह किंवा समग्राचे एक लघु चित्र आहे ज्यामधून नमुना घेतला आहे.'
- बोगार्डस च्या मते, 'एका पुर्व निर्धारित योजनेनुसार एककांच्या एका समुहामधून एक निश्चित प्रतिमान निवडणे म्हणजे नमुना होय.'

प्रातिनिधिक नमुन्यांची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :

- नमुना प्रातिनिधिक असावा म्हणजेच समग्राचे योग्य प्रतिनिधित्व करणारा असावा.
- नमुना हा खुप लहान किंवा खूप मोठा असू नये नमुन्याचा आकार पर्याप्त असणे आवश्यक आहे.
- अनेकदा नमुना निवड करताना समग्रातील पक्षापात आणि पुर्वग्रहापासून मुक्त असला पाहिजे.
- नमुना अध्ययन विषयाच्या उद्दिष्टांशी संबंधीत असावा तरच निष्कर्ष निघतात.
- सामान्य ज्ञान व तर्काच्या आधारावर नमुन्याची योग्य निवड करावी.
- प्रातिनिधीक नमुना निवडतांना व्यवहारिक अनुभवाला महत्व दिले जावे.

ब) नमुना निवडीच्या प्रमुख पायऱ्या

- ➢ समग्र निश्चित करणे.
- ➢ नमुन्याच्या एककाचे निर्धारण करणे.
- ➢ अध्ययन सुची उपलब्ध करणे.
- ➢ नमुन्याचा आकार निश्चित करणे.
- ➢ नमुना निवड पध्दती ठरविणे.
- ➢ नमुना निवड.

**नमुना निवड पध्दतीचे फायदे**

- नमुना निवड पध्दतीचा अवलंब केल्यामुळे संपूर्ण समग्राचे अध्ययन करण्याची गरज नसते. त्यामुळे वेळ, श्रम व पैसा यांची बचत होते.
- नमुना निवड पध्दतीमध्ये संपूर्ण एककापैकी प्रातिनिधिक एककाची निवड केली जाते. त्यामुळे अध्ययन क्षेत्र मर्यादित असल्यामुळे त्यांचे अधिक सखोल अध्ययन करता येते.
- नमुना निवड पध्दती मध्ये एककांची संख्या मर्यादित असल्यामुळे विश्वसनीय निष्कर्ष संपादित करणे शक्य होते.

**ड) नमुना निवड पध्दतीच्या मर्यादा :–**

- नमुना निवड तंत्राचा मोठा दोष म्हणजे नमुना निवड पध्दती ही पक्षपात व पुर्वग्रहापासून अलिप्त राहू शकत नाही. नमुन्याची निवड करतांना कोणत्या ना कोणत्या प्रकारे पक्षपात आणि पुर्वग्रह केला जातो.
- सामाजिक हक्कामध्ये फार मोठया प्रमाणात भिन्नता आढळून येते.
- नमुना प्रातिनिधिक असणे किंवा नसणे ही गोष्ट नमुना निवडीच्या पध्दतीवर सुध्दा अवलंबून असते.
- नमुना निवडीमध्ये नमुन्यावर अवलंबून राहणे कठीण जाते.

**ई) नमुना निवडीचे प्रकार :**

**(१) संभाव्यता निवड पद्धत :** लोकसंख्येतील प्रत्येक घटक नमुन्यात निवडले जाण्याची संभाव्यता/शक्यता ज्या नमुना निवड पद्धतीत असते, त्या पद्धतीस संभाव्यता नमुना पद्धत म्हणतात. या पद्धतीमध्ये पुढील प्रकारांचा समावेश होतो.

- **यादृच्छिक नमुना निवड (रँडम सॅम्पल) :** या प्रकारामध्ये लोकसंख्येतील प्रत्येक एककास (व्यक्तीस) नमुना निवडीमध्ये निवडले जाण्याची समान संभाव्यता/शक्यता असते. उदा., लॉटरी पद्धत. यामध्ये कोणताही पूर्वग्रह न ठेवता, जाणीवपूर्वक निवड न करता रँडम पद्धतीने नमुना ठरविला जातो. यामुळे लोकसंख्येतील सर्व व्यक्तींना नमुन्यामध्ये समाविष्ट होण्याची समान संधी राहते.

- **नियमबद्ध नमुना निवड (सिस्टिमॅटिक सॅम्पल) :** यामध्ये लोकसंख्येतील एककाला विशिष्ट अनुक्रम देऊन निवडीची संख्या ठरविण्यात येते. यामध्ये लोकसंख्येच्या घटकांची यादी करून त्यांना क्रमाने लावून निवड करतात. उदा., समजा एकूण लोकसंख्या १,००० आहे. त्यातील १० टक्के लोकसंख्या निवडून त्याचे पुढे नियमबद्ध पद्धतीमध्ये विभाजन करायचे असल्यास १०० ही संख्या येते. त्यातून १ ते १० मधील कोणताही एक क्रमांक निवडून समान अंतराने पुढील नमुना निवड करत जावी. जसे की, १ ते १० मधील ५ हा क्रमांक निवडला आहे, तर पुढील यादीतील (१० च्या फरकाने) १५, २५, ३५ ९५ असे क्रमांक निवडून नमुना निवड करण्यात येते.

- **स्तरीय नमुना निवड (स्ट्रॅटिफीड सॅम्पल) :** ही पद्धत स्वस्पष्टीकरणात्मक आहे. ज्या वेळी लोकसंख्या एक स्तरीय (एकसंध) नसते, त्या वेळी ही पद्धत अवलंबली जाते. उदा., एखाद्या शाळेतील विद्यार्थ्यांचा आरोग्यविषयक अभ्यास करायचा असल्यास, संशोधकाला अशा वेळी स्तरीय पद्धत अवलंबून प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक या स्तरांनुसार वेगवेगळ्या गटांची प्रतिनिधिक निवड करून त्यांचा नमुना तयार केला जातो.

- **बहुस्तरीय नमुना निवड (मल्टिस्टेज सॅम्पल) :** लोकसंख्येच्या एका गटाच्या अंतर्गत दुसरा गट, दुसऱ्या गटाच्या अंतर्गत तिसरा गट असे गट जेव्हा अस्तित्वात असतात, तेव्हा ही पद्धत वापरली जाते. उदा., महाराष्ट्रातील शाळांच्या गुणवत्तेचा अभ्यास करण्यासाठी यादृच्छिक पद्धतीने प्रथम जिल्ह्यांची निवड केल्यानंतर त्याच पद्धतीने तालुक्यांची व नंतर शाळांची निवड अभ्यासासाठी केली जाते.

- **गुच्छा पद्धत (क्लस्टर सॅम्पलिंग) :** समान गुणधर्म अथवा लक्षणे असलेल्या लोकांच्या समूहाची निवड या पद्धतीत केली जाते. जसे की, विशिष्ट भूप्रदेशातील मुलींच्या शाळा, अंगणवाडी सुविधा असलेली गावे, क्षयरोगींचा समूह इत्यादी.

**(२) असंभाव्यता निवड पद्धत :** असंभाव्यता निवड पद्धत ही संशोधकाच्या सोयीशी व निर्णय क्षमतेशी निगडित आहे. या पद्धतीमध्ये संशोधक स्वतःच्या ज्ञानाने व सोयीनुसार नमुना निवडतो. त्याचे प्रकार पुढील प्रमाणे :

- **प्रासंगिक/सहजप्राप्त नमुना :** या पद्धतीला सोयीस्कर नमुना निवड असेदेखील म्हणतात. यामध्ये संशोधक वेळ, खर्च या सर्व बाबींचा विचार करून त्याला जे योग्य वाटेल, त्या नमुन्याची निवड करून संशोधन करतो.

- **सहेतुक निवड पद्धत (पर्पसिव्ह सॅम्पलिंग) :** या पद्धतीत संशोधक आपल्या उद्दिष्टांनुसार नमुना निवड करतो. ज्यातून उद्दिष्टपूर्ती होत नाही, त्याची निवड टाळतो. उदा., एखाद्या सरकारी योजनेचा फायदा घेणारे १० लोक आहेत. यातील केवळ ५ लोकांचाच अभ्यास करायचा असे जर संशोधकाने ठरविले, तर हे ५ जरी त्याने यादृच्छिक पद्धतीने निवडले, तरी एकूण नमुनासंख्येची निश्चिती तो हेतूपूर्वक करतो.

- **निर्दिष्टांक नमुना पद्धत (कोटा सॅम्पलिंग) :** लोकसंख्येत लिंग, जात, वर्ग अशा अनेक एककांनुसार जे गट असतात, त्यांचे लोकसंख्येमध्ये किती प्रमाण आहे हे पाहून संशोधक प्रमाणानुसार त्या त्या गटाचा हिस्सा ठरवितो. उदा., शिक्षकांमधील पर्यावरण जागृती तपासण्यासाठी स्त्री व पुरुष शिक्षक वेगळे करून त्यातून संशोधक स्वतःच्या सोयीनुसार नमुना निवड करतो.

- **बॉल पद्धती (स्नोबॉल सॅम्पलिंग) :** या पद्धतीला साखळी पद्धतदेखील म्हटले जाते. या पद्धतीमध्ये संशोधक संशोधित व्यक्तीकडून दुसऱ्या संशोधित व्यक्तीचा संदर्भ घेऊन त्या व्यक्तीशी संपर्क साधून माहिती संकलित करत जातो. उदा., घरकाम करणाऱ्या स्त्रियांविषयी संशोधन करत असता, संशोधक एखाद्या घरकामगार स्त्रीमार्फत तिच्या संपर्कातील अन्य एखाद्या घरकामगार महिलेचा संपर्क मिळवितो व अशा नमुनानिवडीतून माहिती संकलित करत जातो. जोपर्यंत संशोधकास पर्याप्त माहिती मिळत नाही अथवा त्याने निर्धारित केलेला नमुना पूर्ण होत नाही, तोपर्यंत ही प्रक्रिया तो चालू ठेवतो.

**३.२.५ व्यष्टी अध्ययन :**

व्यष्टी अध्ययन ही एक संशोधनाची प्रसिद्ध पद्धत आहे. या पद्धतीचा प्रथम वापर इ.स. १८८२ मध्ये फेडरीक प्लॅन यांनी घरगुती अंदाजपत्रकाचा अभ्यास करण्यासाठी केला होता. त्यानंतर हर्बट स्पेन्सर यांनी या पद्धतीचा वापर मानववंशशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी केला होता. त्यानंतर ही पद्धत शास्त्रीय पद्धत म्हणून वापरात आली. या व्यष्टी अध्ययन बाबत विविध विचारवंताच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

- पी व्ही यंग यांच्या मते, ''व्यष्टी अध्ययन म्हणजे सामाजिक गट. जसे की व्यक्तीचा समुह, कुटुंब, संस्था, सांस्कृतिक जमाव किंवा एखादी विशिष्ट जमात यांच्या जीवनांचा चिकित्सक व संपूर्ण अभ्यास होय.''

- शिवपाल यंग यांच्या मते, 'व्यष्टी अध्ययनपद्धत म्हणजे ज्या पद्धतीमध्ये संशोधक स्वत:चे कौशल्य व पद्धतीचा वापर करून व्यक्तीगत पातळीवर सर्वसमावेशक अभ्यास करणे होय.

- लिडी आणि ओर्मरॉड यांच्या मतानुसार व्यष्टी अध्ययन हे गुणात्मक संशोधन आहे. व्यष्टी अध्ययनामध्ये संस्था, व्यक्ती, उपक्रम वा घटनांबाबत सखोल माहिती संकलित करून त्या माहितीचे विश्लेषण केलें जाते.

**व्यष्टी अध्ययन पद्धतीची वैशिष्टये**

- **विशिष्ट गटाचा सर्वसमावेशक अभ्यास–** या पद्धतीमध्ये संशोधनासाठी निवडलेल्या सामाजिक गटाच्या विषयांचा व्यापक अभ्यास केला जातो. या पद्धतीमध्ये संशोधन विषयांच्या सर्व बाजूना समान महत्व दिले जाते.
- **गुणात्मक संशोधन पद्धती –** व्यष्टी अध्ययनादरम्यान संशोधक निरीक्षण, मुलाखत, विविध प्रकारचे प्रलेख इत्यादी मार्गानी संशोधन समस्येबाबत गुणात्मक माहिती संकलित करतो व त्या माहितीचे गुणात्मक तंत्रांच्या साहाय्याने विश्लेषण करतो, म्हणून या संशोधन पद्धतीला ‘गुणात्मक संशोधन पद्धती’ असे म्हणतात.
- **विशिष्ट क्षेत्राशी संपर्क साधने–** या पद्धतीमध्ये विषयांचा अभ्यास करण्यासाठी संशोधक विशिष्ट क्षेत्राचा अभ्यास विस्तृत प्रमाणात करत असतो.
- **क्लिष्ट समस्या समजून घेण्यासाठी उपयुक्त :** व्यष्टी अध्ययनामध्ये एकाच घटकाचा अभ्यास केला जातो. शिवाय हा अभ्यास सखोल असतो. त्यामुळे व्यष्टी व्यवस्थित समजून घेणे शक्य होते. क्लिष्ट समस्या समजून घेण्यासाठी व्यष्टी अध्ययकाकडे साधनेही असतात आणि वेळही असतो.
- **विषयांच्या अभ्यासासाठी वेळ लागतो–** ह्या पद्धतीमध्ये विशिष्ट गटाचा व्यक्तीगत, कौटुंबिक, सामाजिक बाजूचा विस्तृत अभ्यास केला जातो. त्यामुळे या पद्धतीमध्ये विषयांच्या अभ्याससाठी जास्त वेळ लागतो.
- **एकापेक्षा अधिक माहिती संकलन साधनांचा वापर–** माहिती संकलनासाठी विविध साधनांचा वापर हे व्यष्टी अध्ययनाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे.

**व्यष्टी अध्ययन पद्धतीची प्रक्रिया**

- संशोधकाने विषयांची व्याप्ती एक व्यक्ती किंवा अनेक व्यक्तींच्या समुहाची आहे हे ओळखणे.
- संशोधकाने विषयासंबधी सर्व प्रकारच्या माहितीचा संग्रह करावा.
- संशोधकाने व्यक्तीगत माहितीस्त्रोत जसे की, पत्रे, डायऱ्या, चरित्र, नोंदी इत्यादीची सत्यता पडताळून त्यावरून आवश्यक असल्यास गृहितके मांडावीत.
- संशोधकाने मुलाखत, वेळापत्रक इत्यादी साधनांचा वापर करून माहितीचा संग्रह व स्पष्टीकरण करावे.
- संशोधकाने संख्यात्मक माहितीपेक्षा गुणवत्तापूर्ण माहितीला जास्त महत्व देऊन अशा माहितीचा संग्रह करावा.

- विषयासंबधीच्या माहितीच्या प्रत्येक नोंदीच्या बाबींचा समावेश असावा. जसे की, अ. माहिती मिळाली त्यावेळचा दिनांक, क. जशी माहिती मिळाली त्याचे विवरण, ड. ज्या अटीवर माहिती मिळाली त्यांचे संक्षिप्त वर्णन, इ. माहितीचा संग्रह करण्यासाठी वापरलेली तंत्रे व पद्धतीचा सारांश.
- माहितीचा चिकित्सक व स्पष्टीकरणात्मक अभ्यास करण्यासाठी विविध कौशल्ये व तंत्रे यांचा वापर करावा.
- माहितीचे स्पष्टीकरण हे शास्त्रीय व सुलभ असावे.
- संशोधनाची अखेरची पायरी म्हणजे संशोधन अहवाल होय. या अहवालामध्ये संशोधनाची माहिती लेखी स्वरूपात दिलेली असते. संशोधनाची माहिती व निष्कर्ष सुलभ असावेत जेणेकरून वाचकांना व इतर संशोधकांना संशोधनाची माहिती व गुणवत्ता त्वरीत समजेल.

**माहिती संकलनाचे स्त्रोत**

व्यष्टी अध्ययनपद्धतीमध्ये माहिती संकलित करण्यासाठी

१. व्यक्तीगत कागदपत्रे
२. जीवनांचा इतिहास
३. इतर स्त्रोतामध्ये ग्रंथ, नियतकालिके, सरकारी कागदापत्रे, विषयासंबंधी वाचनसाहित्य, विशिष्ट विषयावरील संशोधन, इतर कागदपत्रे जे समाजासाठी वारवांर प्रकाशित होत असतात.

**व्यष्टी अध्ययनाचे प्रकार**

विविध तज्ञांनी व्यष्टी अध्ययाचे अनेक प्रकार सांगितले आहेत. जसे बर्नस् यांनी व्यष्टी अध्ययनाचे खालील सहा प्रकार सांगितलेले आहेत.

१. ऐतिहासिक व्यष्टी अध्ययन
२. निरीक्षणात्मक व्यष्टी अध्ययन
३. मौखिक इतिहास व्यष्टी अध्ययन
४. प्रासंगिक व्यष्टी अध्ययन
५. उपयोगात्मक व्यष्टी अध्ययन
६. बहु पायऱ्यात्मक व्यष्टी अध्ययन

### ३.२.६ निरीक्षण पध्दत :

निरीक्षण या पद्धतीला वैज्ञानिक अथवा शास्त्रीय पद्धती म्हटले जाते. निरीक्षण केवळ वैज्ञानिक संशोधनाचा महत्त्वाचा मूलाधार नाही, तर आपल्या दैनंदिन जीवनाला समजून घेण्यासाठी त्याची महत्त्वपूर्ण भूमिका असते.

- जॉन डॉलार्ड म्हणतात, संशोधनाचे सर्वांत महत्त्वाचे प्राथमिक तंत्र हे मानव आणि त्यांच्या अनुभवाच्या आधारे केलेले 'निरीक्षण' आहे. ज्याद्वारे घडलेल्या महत्त्वाच्या घटनांना आपण जाणून घेऊ शकतो.
- गुड आणि हॅट म्हणतात, विज्ञानाचा प्रारंभच मुळी निरीक्षणाने होतो. म्हणून समाजशास्त्रज्ञांनी निरीक्षण करताना अतिशय सावधानता बाळगली पाहिजे. मोझर म्हणतात, निरीक्षण हे शास्त्रीय/वैज्ञानिक संशोधनासाठी शास्त्रीय पद्धती (क्लासिकल मेथड) आहे. ती वैज्ञानिक पद्धतीची महत्त्वपूर्ण पद्धत आहे. कोणत्याही प्रकारचे ज्ञान संपादन करण्यासाठी निरीक्षण हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

सामाजिक संशोधन पद्धतीमध्ये निरीक्षण पद्धतीचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. एका विशिष्ट वातावरणात मनुष्य अथवा समूह कसे वर्तन करतात, तसेच त्यांच्या दैनंदिन समस्या, जीवन जगण्याची पद्धत, समाज संस्कृती इत्यादी हे निरीक्षण पद्धतीचा वापर करून जाणून घेता येते. अशा प्रकारे नैसर्गिक वातावरणात राहून संशोधक आपली निरीक्षणे नोंदवीत असतो. त्यामुळे संशोधकाने केलेले निरीक्षण हे प्रत्यक्ष असते आणि त्यामुळे एखाद्या विशिष्ट गटाचे अथवा व्यक्तीचे वर्तन नेमके कसे घडते, त्यामागे काही घटक कार्य करतात का, याचे वास्तव दर्शन या पद्धतीमार्फत होते.

**निरीक्षणाची वैशिष्ट्ये :**

- **निरीक्षण हे डोळ्याचे काम :** सी. ए. मोरसर यांच्या मते, निरीक्षणामध्ये खऱ्या अर्थाने कान किंवा आवाजापेक्षा डोळ्यांचा वापर असतो. इतर कोणत्याही पुराव्यापेक्षा डोळ्याने पाहिलेले पुरावे सर्वांत विश्वसनीय असतात.
- **निश्चित उद्दिष्ट :** शास्त्रीय निरीक्षण हे नेहमीच उद्दिष्टपूर्ण असते आणि एकाद्या घटनेतील वेगवेगळ्या वस्तुस्थितीमधील संबंध शोधणे हा उद्देश असतो.
- **नियोजन :** उद्दिष्टपूर्ण निरीक्षणासाठी सुसंबंधित आणि पद्धतशीर प्रयत्नांची गरज असते.
- **नोंदी करणे :** मानवी स्मृती फसण्यासारखी असते. त्यामुळे निरीक्षणाच्या सर्व नोंदी त्या त्यावेळी किंवा निरीक्षणानंतर लगेच करणे आवश्यक असते. आधुनिक काळात व्हिडीओ, कॅमेरा, टेपरेकॉर्डर यांचा नोंदीसाठी वापर केला जातो.

**निरीक्षण पद्धतीचे फायदे**

- निरीक्षण पद्धत सर्व सामाजिक शास्त्रासाठी सामान्य पद्धत आहे.
- सुबोधता, साधेपणाने निरीक्षण करण्यासाठी तंत्रज्ञानाची किंवा प्रशिक्षणाची फारशी गरज नसते. त्यामुळे ती इतर पद्धतीपेक्षा साधी आहे.
- वास्तववादी पद्धत आहे.
- गृहितके मांडण्यासाठी उपयुक्त आहे.
- गृहितके तपासण्यासाठी उपयुक्त आहे.

- निष्कर्षामध्ये विश्वसनीयता असते.
- जेथे तोंडी माहिती सांगू शकत नाही, तेथे निरीक्षण पद्धत उपयुक्त ठरते.

**निरीक्षण पद्धतीच्या मर्यादा (दोष)**

- काही घटनांचे निरीक्षण करता येत नाही. उदा. वैवाहिक मतभेद
- काही गोष्टींचे निरीक्षण होऊ शकत नाही. उदा. भावनिक आवड – ना आवड
- निरीक्षक व निरीक्षण करावयाची घटना समकालीन असते असे नाही. उदा. आपण जातीय दंगल घडवून त्यांचे लोकांवरील परिणामांचे निरीक्षण करू शकत नाही.
- निरीक्षण फसवे असू शकते. उदा. मृगजळ
- ज्यांचे निरीक्षण केले जाते, त्याला त्याची जाणीव असल्याने खरे निरीक्षण होत नाही. उदा. एखाद्या माणसाला समजले की त्याचे निरीक्षण चालू आहे, तर तो नेहमीपेक्षा चांगले व जास्त काम करतो.
- व्यक्तिनिष्ठ स्पष्टीकरण
- सावकाश संशोधन
- खर्चिक पद्धती आहे.
- फक्त निरीक्षण पद्धत पुरेशी नाही, त्यासाठी इतर पद्धतीची जोड असावी लागते

### ३.२.७ सर्वेक्षण पद्धती :

संशोधन करतांना सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी उपयोगी पडणाऱ्या पद्धतीला सर्वेक्षण पद्धती म्हणतात. सर्वेक्षणात वर्तमानस्थिती, अपेक्षित स्थिती, आवश्यक साधनांचा बोध इत्यादी प्रकारची माहिती संकलित केली जाते. सर्वेक्षण पद्धती वर्तमान माहितीस योग्य बदल करण्यासाठी मार्गदर्शक ठरते.

**सर्वेक्षण संशोधनाचे स्वरूप :–**

सर्वेक्षण पद्धतीची कर्लिंगरची व्याख्या पुढे देण्यात आली आहे. “Survey Research studies large and small population (or universes) by selecting and studying samples chosen from the population to discover the relative incidence, distribution and interrelations of sociological and psychological variables.”

International Dictionary of Education G. Terry Page and J.B. Thomas with A. R. Marshal या मध्ये survey studies चा अर्थ पुढीलप्रमाणे दिलेला आहे. Research or investigation of an educational problem using scienific methods of sampling and carefully planned methods of questioning”

विशिष्ट समुहाच्या विविध पैलूंचा अथवा सर्वांगिण अभ्यास करून, तथ्य संकलन. विश्लेषण करून, त्यांचा समन्वय साधून त्यांचे स्पष्टीकरण व मूल्यमापन करणे म्हणजे सर्वेक्षण होय.

सर्वेक्षणाच्या माध्यमातून तीन प्रकारची माहिती संकलित करता येते.

१. वर्तमान

२. अपेक्षित स्थिती

३. आवश्यक साधनांचा शोध

सर्वेक्षणामुळे विशिष्ट क्षेत्रातील वर्तमान स्थितीचे यथार्थ चित्र मिळते. कोणकोणत्या बाबी, कोणत्या स्थितीत उपलब्ध आहेत. याची माहिती मिळते. समस्या निराकरणाकरिता कोणती स्थिती अपेक्षित आहे. हे अन्य सर्वेक्षणाच्या आधारे कळते व ही अपेक्षित स्थिती प्राप्त करून समस्येची उकल करण्याकरिता कोणत्या साधनाची व प्रयत्नांची आवश्यकता आहे हे त्यामुळे कळते.

सर्वेक्षणाचा प्रमुख हेतू विभिन्न क्षेत्रातील स्थितीचा शोध घेणे हा आहे. वर्तमान स्थितीच्या शोधाच्याही ते कधी कधी पुढे जाते आणि प्राप्त तथ्यांचे मूल्यांकन अधिक चांगल्या बदलांकरिता योग्य मार्गदर्शनही करते. सामाजिक समस्यांशी संबंधित असलेले सर्वेक्षण निव्वळ प्रचलित सामाजिक परिस्थितीत आढळून येणारे गुणदोष पाहून थांबत नाही तर त्यात सुधारणाही सुचविते.

**सर्वेक्षण पद्धतीची वैशिष्ट्ये :–**

- या पद्धतीने विशिष्ट काळातील माहिती फार मोठ्या प्रमाणात संकलित करता येते.
- सर्वेक्षण हे सामान्यतः तिर्थक छेदात्मक  असते. या तिर्थक छेदात वेगवेगळया गटाची वर्तमान वैशिष्टे संकलित करता येतात.
- सर्वेक्षण हे गटाच्या किंवा जनसंख्येच्या वैशिष्ट्यांशी संबंधित असते.
- सर्वेक्षणाचा हेतू समुहाची मध्यवृत्ती पाहणे हा असतो.
- सर्वेक्षणात समस्येचे स्वरूप निश्चित असते व हेतू सुस्पष्ट असतो.
- सर्वेक्षणात भाषेला महत्व आहे. तसेच गणितीय सांकेतिक भाषेचाही त्यात उपयोग होतो.
- सर्वेक्षण हे गुणात्मक असते तसेच संख्यात्मकही असते.
- स्थानिक समस्यांचे शीघ्र निराकरण करण्यासाठी सर्वेक्षण ही उपयुक्त पद्धती आहे.
- सर्वेक्षणाचा उपयोग वर्तमान स्थिती समजून घेण्याकरिता म्हणून तसेच संशोधनाचा पाठपुरावा प्रारंभिक कार्य करण्याकरिताही होतो.
- यात तुलना व विरोध याद्वारे स्पष्टीकरण करण्यात येते.
- सांख्यिकीय माहितीचे काळजीपूर्वक विश्लेषण केले जाते. तार्किक निष्कर्ष काढला जातो व कौशल्यपूर्ण प्रतिपादन केले जाते.
- याद्वारे मौलिक निष्कर्ष प्रस्तुत केले जातात.

**सर्वेक्षण पद्धतीचे महत्व :–**

- सद्यस्थितीमधील सामाजिक घटकांची जाणीव होते. संशोधकाला भेडसावणाऱ्या समस्या सोडविल्या जातात.
- ही पद्धती वर्तमान काळातील समस्येचे संशोधन करते.
- विकासाची दिशा स्पष्ट होते व योग्य शिफारशी स्पष्ट केल्या जावू शकतात.
- ज्ञानाचा विकास साधला जातो व संशोधकाच्या ज्ञानात भर पडते.
- याद्वारे सामाजिक समस्यांचे अध्ययन केले जाते.
- वर्तमान काळाचा उपयोग करून भूतकाळाचा अभ्यास केला जातो व यातून भविष्यकालीन प्रगतीचा वेध घेतला जातो.
- सर्वेक्षणाद्वारे मूलभूत संशोधनासाठी पूरक अशी माहिती पुरविली जाते. तसेच विशिष्ट क्षेत्रात ज्ञान वृद्धी होते.

सर्वेक्षण पद्धतीने एका विशिष्ट वेळेच्या खुप मोठ्या जनसंख्येच्या संदर्भात माहिती गोळा केली जाते. कोणत्याही एका व्यक्तिच्या गुण वैशिष्ट्यांशी याचा संबंध नसतो. सर्वेक्षणाचा संबंध मोठया संख्येमधून माहिती काढून यावरून निघलेल्या सर्वसामान्य संख्याशास्त्रीय माहितीशी असतो.

## ३.२.८ मुलाखत पद्धती :

संशोधनातील मुलाखतीच्या पद्धती या वेगवेगळ्या आहेत ज्या तुम्ही प्रभावी संशोधन होण्यासाठी वापरू शकता. अनेक संशोधक त्यांच्या संशोधन प्रक्रियेचा भाग म्हणून विषयांची मुलाखत घेतात. मुलाखती आयोजित केल्याने तुम्हाला व्यक्तींच्या वर्तन, वृत्ती आणि मतांची माहिती मिळू शकते.

सहसा, मुलाखती गुणात्मक संशोधनासाठी सर्वात उपयुक्त असतात, याचा अर्थ ते संख्यात्मक मूल्यांपेक्षा संकल्पना आणि अनुभवांवर अधिक लक्ष केंद्रित करते. तुम्हाला तुमच्या संशोधनामध्ये मुलाखतींचा समावेश करायचा असल्यास, तुम्ही तुमच्या विशिष्ट संशोधनासाठी योग्य असा दृष्टिकोन वापरण्यासाठी मुलाखतीच्या अनेक पद्धती निवडू शकता.

**संशोधनातील मुलाखतींची वैशिष्ट्ये :**

- **वैयक्तिक:** मुलाखती सहसा समोरासमोर, फोनवरून किंवा व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेतल्या जातात, ज्यामुळे संशोधक आणि सहभागी यांच्यात वैयक्तिक संवाद साधता येतो
- **इंटरएक्टिव्ह:** मुलाखती हे संशोधक आणि सहभागी यांच्यातील द्वि-मार्गी संभाषण आहेत, जे फॉलो-अप प्रश्न आणि स्पष्टीकरणांना अनुमती देतात.
- **गुणात्मक:** मुलाखती ही एक गुणात्मक संशोधन पद्धत आहे, ज्यामध्ये सहभागींचे व्यक्तिनिष्ठ अनुभव, मते आणि वृत्ती यावर लक्ष केंद्रित केले जाते.

- **सखोल:** मुलाखती एखाद्या संशोधन विषयावर सखोल माहिती देऊ शकतात, ज्यामुळे गुंतागुंतीच्या समस्या आणि घटनांचा सखोल शोध घेता येतो.
- **संदर्भात्मक:** मुलाखती एखाद्या संशोधन विषयावर संदर्भित माहिती देऊ शकतात, ज्यामुळे विषयावर प्रभाव टाकू शकणाऱ्या सांस्कृतिक, सामाजिक आणि ऐतिहासिक घटकांची अंतर्दृष्टी मिळते.
- **वेळ घेणारे:** मुलाखती घेणे वेळखाऊ असू शकते, त्यासाठी महत्त्वपूर्ण नियोजन, तयारी आणि पाठपुरावा आवश्यक आहे.

**संशोधनातील मुलाखतीसाठीच्या सात पद्धती :**

**१. लक्ष आधारित गट**

एक लोकप्रिय संशोधन मुलाखत पद्धत म्हणजे फोकस ग्रुप इंटरव्ह्यू आयोजित करणे, ज्यामध्ये एकाच वेळी मुलाखत घेतलेल्या व्यक्तींचा समूह असतो. फोकस ग्रुप मॉडरेटर सहसा सहभागींना एकमेकांशी संवाद साधण्यासाठी प्रोत्साहित करतात आणि वास्तविक वृत्ती आणि दृष्टीकोनांमध्ये अंतर्दृष्टी मिळविण्यासाठी ते गटाचे निरीक्षण करतात.

**२. संरचित मुलाखत**

संरचित मुलाखती हा दुसरा पर्याय आहे. सामान्यतः, संरचित मुलाखतींमध्ये क्लोज-एंडेड प्रश्नांचा समावेश असतो, जे असे प्रश्न असतात ज्यांचे उत्तरदाते ''होय'' किंवा ''नाही'' मध्ये उत्तर देऊ शकतात.

**३. असंरचित मुलाखत**

एक असंरचित मुलाखत, ज्याला अनौपचारिक मुलाखत देखील म्हणतात, संरचित मुलाखतीच्या उलट आहे. असंरचित मुलाखतींमध्ये, मुलाखतकार प्रत्येक मुलाखतीला प्रमाणित प्रश्न विचारत नाही. त्याऐवजी, असंरचित मुलाखती ओपन-एंडेड प्रश्नांवर अवलंबून असतात, जे प्रश्न आहेत जे साध्या ''होय'' किंवा ''नाही'' पेक्षा लांब उत्तरांना प्रोत्साहन देतात.

**४. अर्ध-संरचित मुलाखत**

तुम्ही अर्ध-संरचित मुलाखत पद्धत देखील वापरू शकता, जी संरचित आणि असंरचित मुलाखतींचे तुकडे एकत्र करते. जरी मुलाखतकार सामान्य योजना आणि प्रश्नांच्या संचाचे अनुसरण करू शकतात, तरीही त्यांच्याकडे बदल करण्याची लवचिकता असते. हे मुलाखतकारांना त्यांच्या संशोधनासाठी आवश्यक असलेला डेटा मिळविण्यासाठी सर्जनशील होण्यास अनुमती देऊ शकते.

**५. वैयक्तिक मुलाखत**

एक वैयक्तिक मुलाखत घेणारा आणि मुलाखत देणारा यांच्यातील एक-एक संवाद म्हणून वैयक्तिकरित्या घेतली जाते. तुम्हाला एखाद्या व्यक्तीशी थेट बोलायचे असेल आणि तुमचे प्रश्न त्यांच्यासमोर मांडायचे असतील तर वैयक्तिक मुलाखती उत्तम आहेत.

### ६. दूरध्वनी मुलाखत

तुम्ही फोनवरूनही मुलाखती घेऊ शकता. दूरध्वनी मुलाखती हा प्रतिसाद गोळा करण्याचा एक सोपा मार्ग असू शकतो. ही मुलाखत पद्धत देखील तुलनेने स्वस्त आहे, जर तुम्हाला जास्त संसाधने खर्च न करता पटकन माहिती गोळा करायचा असेल तर ती आदर्श बनवते.

### ७. ऑनलाइन मुलाखत

ऑनलाइन मुलाखती हा आणखी एक संशोधन मुलाखत पर्याय आहे. ऑनलाइन मुलाखतींमध्ये सर्वेक्षण किंवा व्हिडिओ चॅट अनुप्रयोग समाविष्ट असू शकतात. या पद्धतीमध्ये, मुलाखत घेणारे आणि मुलाखत देणारे एकाच वेळी एकाच ठिकाणी असणे आवश्यक नाही. हे आपल्याला विषयांच्या मोठ्या गटातून द्रुतपणे डेटा संकलित करण्यास अनुमती देऊ शकते.

## ३.३ सारांश

संशोधन पद्धती ही संशोधन आयोजित करण्याच्या संरचित प्रक्रियेसाठी एक सामूहिक संज्ञा आहे. विविध प्रकारच्या संशोधनामध्ये अनेक भिन्न पद्धती वापरल्या जातात. संशोधन पद्धती हे माहिती देण्याचा प्रयत्न करते: संशोधन अभ्यास का केला गेला आहे, संशोधनाची समस्या कशी परिभाषित केली गेली आहे, कोणत्या प्रकारे आणि का गृहितक तयार केले गेले आहे, कोणता डेटा गोळा केला गेला आहे आणि कोणत्या विशिष्ट पद्धतीचा अवलंब केला गेला आहे का, विशिष्ट तंत्र विश्लेषण डेटाचा वापर केला गेला आहे आणि जेव्हा आपण संशोधन समस्या किंवा अभ्यासासंबंधी संशोधन पद्धतीबद्दल बोलतो तेव्हा सामान्यत: तत्सम इतर प्रश्नांची उत्तरे दिली जातात.

## ३.४ पारिभाषिक संज्ञा :

सर्वेक्षण : पाहणी करणे, मुलाखत : दोन व्यक्तीतील संवादरूपी संवाद,

प्रश्नकर्ता = प्रश्न विचारणारा, निवेदक = मुलाखत देणारा

## ३.५ सरावासाठी प्रश्न

१. नमुना निवड पद्धतीतील पायऱ्या विशद करा.

२. क्षेत्रीय अभ्यास पद्धत सांगा.

३. सर्वेक्षण पद्धतीचे गुण –दोष स्पष्ट करा.

४. मुलाखत पद्धतीचे प्रकार सांगा.

५. सर्वेक्षण पद्धतीची माहिती थोडक्यात लिहा.

६. मुलाखत पद्धतीने प्राथमिक सामुग्री कशी गोळा करतात ते सविस्तर स्पष्ट करा.

## ३.६ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. पाटील व्ही. बी. (२०१२), संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन जळगाव

२. भांडारकर पी. एल. (१९९४), सामाजिक पद्धती, नवी दिल्ली पब्लिशिंग हाऊस

३. ताम्हणकर पी.- अर्थशास्त्रीय संशोधनाची तोंडओळख, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, जुलै, १९७९

४. घाटोळे रा.- समाजशास्त्रीय संशोधन, तत्त्व आणि पद्धती, श्री प्रकाशन, नागपूर, १९८३

५. नाडगोंडे गुरुनाथ - सामाजिक संशोधन पद्धती फडके प्रकाशन, कोल्हापूर

६. कुंभोजकर - संशोधन पद्धती संख्याशास्त्र, सामाजिक शास्त्रांची प्रणाली, अद्वैत प्रकाशन, अकोला, २००४

७. प्रदीप आगलावे- सामाजिक संशोधन पद्धती, पींपळापुरे प्रकाशन, नागपूर, २००७


❑❑❑

## घटक ४
# संशोधन अहवाल लेखन

**अनुक्रमाणिका**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ संशोधन अहवाल लेखन

४.२.२ संशोधन पेपर लेखन

४.२.३ संदर्भग्रंथ सूची, संदर्भ सूची, परिशिष्ट

४.३ सारांश

४.४ पारिभाषीक शब्द व शब्दार्थ

४.५ स्व:यंअध्ययनासाठी प्रश्न व त्याची वस्तुनिष्ठ उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ संदर्भ ग्रंथ


## ४.० उद्दिष्ट्ये

१) संशोधन पेपर व अहवाल लेखन प्रक्रीया जाणून घेणे.

२) संशोधनांतर्गत वापरलेल्या अहवाल व पेपर लेखन पध्दतीने विश्लेषन करणे.

३) तथ्य विश्लेषन व त्याच्या सादरीकरणाच्या पध्दती, तंत्रे व रूपरेषा याची माहिती घेणे.

४) संशोधन निबंध व अहवाल लेखनाच्या शास्त्रीय पध्दती, तंत्रे व रूपरेषा याची माहिती घेणे.

## ४.१ प्रास्ताविक

संशोधकाने संशोधन विषयक वेगवेगळ्या व्यवस्था पूर्ण केल्यानंतर संशोधनाची अंतिम अवस्था म्हणजे संशोधन अहवाल होय. ज्या संशोधन संस्थेत किंवा विद्यापीठात संशोधनाचे कार्य सुरू असेल त्या संस्थेला निश्चित कालावधीत आपला स्वत: लिहीलेला व मार्गदर्शकाने प्रमाणित केलेला अहवाल सादर करावा लागतो. संशोधकाने ज्या समस्येवर संशोधन कार्य हाती घेतलेले असते आणि वस्तुनिष्ठ व शास्त्रशुद्ध पद्धतीवर आधारित प्रदिर्घ परिश्रमाने ते पूर्ण केलेले असते त्या संशोधन प्रक्रीयेचा शेवटचा टप्पा हा अहवाल

लेखनाचा असतो संशोधकाने संशोधन समस्येची निवड केल्यानंतर संशोधन आराखडा तयार केला जातो या संशोधन आराखड्यानुसार वेगवेगळया स्त्रोताद्वारे माहितीचे संकलन केले जाते. संकलीत तथ्यांचे वर्गीकरण, विश्लेषण, सादरीकरण, सांख्यीकीय तंत्राचा वापर करून निष्कर्ष काढले जातात, शिफारसी केल्या जातात या सर्व अवस्थातून गेल्यानंतर संशोधकास संशोधन पेपर व अहवाल तयार करावा लागतो संशोधन पेपर/अहवाल तयार करताना संशोधकास वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागते संशोधकाने संकलीत केलेल्या संपूर्ण तथ्याचे वर्गीकरण, सादरीकरण, विश्लेषन आणि अर्थबोध झाल्यानंतर संशोधन विषय निवडण्याच्या पार्श्वभूमी पासून निष्कर्ष काढण्यापर्यंतची माहिती सुत्रबध्दरित्या शब्दांकीत करण्याच्या प्रक्रीयेचा समावेश संशोधन पेपर/अहवालात होतो.

संशोधन केले परंतु ते अहवालाच्या रूपाने मांडलेच नाही तर ते संशोधकापुरते मर्यादीत राहते भविष्यातील संशोधनाला त्यातून प्रेरणा मिळत नाही. आपल्या संशोधनातून प्राप्त झालेल्या नवीन ज्ञानाची मालकी व्यक्तिची नसते, त्यांची मालकी ही संपूर्ण समाजाची असते. समाजातील ज्ञानोत्सुक वाचकांसाठी ती अहवालात सादर करणे हे संशोधकाचे उत्तरदायित्व असते. संशोधनातील संदर्भ तथ्ये, निष्कर्ष अंधारात राहतात आणि सामाजिक, राजकीय दृष्टया त्या संशोधन केल्यानंतर संशोधन प्रक्रीयेच्या भाग म्हणून संशोधन अहवाल लिहिणे आवश्यक व गरजेचे असते. तसेच संशोधन तंत्रामध्ये तळटीपा, संदर्भ, संदर्भग्रंथ सूची आणि परिशिष्टे याचा वापर संशोधनाच्या शास्त्रीय दर्जा सिध्दतेसाठी गरजेचा असतो.

## ४.२ विषय विवेचन:

सामाजिक संशोधनातील संशोधन पेपर व अहवाल लेखन ही अंतिम व शेवटची अवस्था आहे. संशोधनासाठी संशोधन समस्येची निवड ही संशोधनाची पहिली पायरी आहे तर संशोधन पेपर व अहवाल लिहित असताना आधार सामग्री म्हणून वापरलेले संदर्भ, त्या अनुषंगाने तळटीपेद्वारे दिलेली विस्तृत माहिती संदर्भासाठी वापरलेल्या संदर्भ ग्रंथाची सूची, आणि परिशिष्टाद्वारे संशोधन समस्ये संदर्भातील विस्तृत ज्ञान यांची सामाजिक शास्त्रातील रितीपध्दतीद्वारे मांडणी केलेली असते.

### ४.२.१ संशोधन अहवाल लेखन:-

संशोधन अहवाल म्हणजे संशोधन करताना आलेल्या अनुभवांची व मिळवलेल्या माहितीची, कल्पनांची आणि त्यावरून काढलेल्या निष्कर्षाची वस्तुनिष्ठ मांडणी करणे होय. इतर व्यक्तींना आपण केलेल्या संशोधनाची माहिती देण्याचे ते एक साधन आहे संशोधन अहवालात समस्येला वापरलेल्या संकल्पनाचा, पारिभाषिक शब्दाचा अर्थ, समस्येतून निर्माण होणारे प्रश्न या प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी माहितीचे वर्गीकरण, पृथक्करण याविषयीची माहीती दिली जाते संशोधनातून निघालेले निष्कर्ष व शिफारसी यांचा समावेश यात असतो. प्रा. हसराज यांच्यामते समाजाला केलेले परिणामकारक व हेतुपूर्वक निवेदन म्हणजे खरेखुरे अहवाल लेखन होय.

**४.२.१.१ संशोधन अहवालाचा उद्देशः–**

संशोधन अहवाल सादर करण्याचे संशोधकाचे वेगवेगळे उद्देश असतात ते खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१) नवीन ज्ञानाचे प्रस्तुतीकरण :–** संशोधकाने वेळ श्रम खर्च करून मिळविलेले ज्ञान अहवाल रूपाने प्रस्तृत केले नाही तर त्यास कोणतेच महत्व राहत नाही संशोधनातून प्राप्त नवीन ज्ञानावर समाजाची मालकी असते ते गरजू लोकांपर्यंत पोहोचवणे हे संशोधकाचे कर्तव्य असते आणि पोहचवण्याचे माध्यम संशोधन अहवाल असते.

**२) ज्ञानवृध्दीसाठी :–** संशोधन कार्य हे नेहमी नवीन ज्ञानाचा शोध घेण्यासाठी असते. संशोधकाने आपल्या संशोधनाद्वारे जे ज्ञान ज्ञात केले आहे त्याचा लाभ इतरांना होण्यासाठी संशोधन अहवालाची मांडणी गरजेची असते.

**३) निष्कर्ष पडताळणी :–** निष्कर्षाची यथार्थता तपासण्यासाठी संशोधकाने आपल्या संशोधनातून जे निष्कर्ष काढले आहेत त्याची सत्यता पडताळून पाहण्यासाठी उणीवा तपासणीसाठी अहवाल लेखन गरजेचे असते.

४) भविष्यातील संशोधकांनी उपयुक्त संशोधन अहवालातील निष्कर्षाचे निरीक्षण परिश्रम करून त्याची वैधता तपासणीची संधी अन्य संशोधकांना संशोधन अहवालामुळे प्राप्त होते. संशोधनात ज्या बाबींवर संशोधन झालेले नाही अशा नवीन क्षेत्रात नवीन संशोधकांना संशोधन करण्याची संधी संशोधन अहवाल मांडणीतून मिळते.

**५) धोरण व उपाय ठरविणे :–** संशोधन अहवालातून संशोधकाने सामाजिक समस्या व त्यावर उपाययोजना सुचवलेल्या असतात त्या समस्या सोडवण्यासाठी उपयुक्त ठरतात त्याचबरोबर भविष्यात अशी समस्या उदभवू नये यासाठी कोणत्या उपाय योजना कराव्यात याचे मार्गदर्शन संशोधन अहवालातून धोरण निर्धारकांना मिळते.

**६) सत्यतेचा पडताळा :–** संशोधकाने केलेले संशोधन योग्य आहे की अयोग्य याचा पडताळा संशोधन अहवालाच्या चिकीत्सेतून केला जाऊ शकतो त्याने मांडलेले संशोधन निष्कर्ष योग्य आहेत की नाहीत याची पडताळणी अहवाल लिखीत स्वरूपात मांडलेले असेल तर घेणे शक्य होते.

**७) सार्वजनीक उपाययोजना :–** संशोधकाने केलेले संशोधन लिखीत स्वरूपात अहवाल रूपाने मांडले जाते ते समाजाच्या उपयोगी असले पाहीजे, सामाजिक समस्येची सोडवणूक करणारे असले पाहीजे तसे असेल तर अनेक समस्याची सोडवणूक शक्य होते यातील निष्कर्षा आधारे शासनास धोरणे, योजना ठरवून कार्यान्वीत करता येतात

**८) संशोधन पदवी प्राप्ती :–** संशोधन संस्था व विद्यापीठातून संशोधन करणाऱ्या संशोधकास संशोधन पदवी प्राप्तीसाठी आपला संशोधन अहवाल सादर करावा लागतो त्यातून त्यास एम. फील., पी. एच. डी ही संशोधन पदवी प्राप्त करता येते.

**४.२.१.२ संशोधन अहवाल स्वरूप व आकृतीबंध :–**

अहवाल लेखन हे बुध्दीवादी समुदायाला उद्देशून केलेले सुयोग्य कथन असते त्यामुळे अहवाललेखनात जागरूकता, सुयोग्य तर्कशक्ती, पुरावे, बुध्दीप्रामाण्यवाद याचा पदोपदी प्रत्यय यावा संशोधन अहवाल म्हणजे संशोधकाने काय वाचले आहे, माहिती कशी मिळविली, त्यातून काय अनुभवले, कोणत्या दृष्टीने विचार केला, काय निष्कर्ष काढले या सर्व बाबींचे एकत्रीकरण होय. संशोधन अहवालाचे लेखन संक्षीप्त स्वरूपात केले जाते ते विशिष्ट मुद्दयांना धरून करावे लागते संशोधन अहवालाची रूपरेषा संशोधन अहवाल लेखनासाठी उपयुक्त ठरते सर्व साधारणपणे संशोधन अहवाल तीन भागात लिहीला जातो प्राथमिक विभाग, मुख्य विभाग व अंतिम विभाग अशा पध्दतीने त्याची मांडणी केली जाते ती खालील तक्त्याआधारे अधीक स्पष्ट होते.

**संशोधन अहवालाचे विभाग**

| प्राथमिक विभाग | मुख्य विभाग | अंतिम विभाग |
|---|---|---|
| १. मुखपृष्ठ | अ) प्रस्तावणा | १) संदर्भ सूची |
| २. प्रथमपृष्ठ | १. संशोधन समस्येचे वर्णन | २) संदर्भग्रंथ सूची |
| ३. प्रमाणपत्र | २. संशोधनाचा उद्देश | ३) परिशिष्ट |
| ४. प्रतिज्ञापत्र | ३. संशोधनाचे क्षेत्र | ४) तळटिपा |
| ५. ॠणनिर्देश | ब) संशोधन पध्दती | ५) 18 Recomandetion |
| ६. अनुक्रमणिका | १. तथ्य संकलन पध्दती | |
| ७. कोष्टके व आकृत्याची सूची | २. नमुना निवड पध्दती | |
| | ३. संशोधन कार्याचे संघटन | |
| | क) तथ्यांचे विश्लेषन आणि निर्वचन | |
| | ड) संशोधन निष्कर्ष, शिफारसी व उपाययोजना | |

**प्राथमिक विभाग :** प्राथमिक विभागामध्ये मुखपृष्ठ व प्रथम पृष्ठामध्ये कोणत्या विद्यापीठात, कोणत्या विद्याशाखेत, कोणत्या विषयासाठी, कोणत्या पदवीसाठी, प्रबंध सादर करण्यात येत आहे, संशोधन विषयाचे

नांव, संशोधकाचे नांव, मार्गदर्शकाचे नांव, जेथे संशोधन केले आहे त्या संशोधन संस्थेचे नाव व कोणत्या महीन्यात व वर्षात प्रबंध सादर केला आहे इत्यादी माहिती असते प्रमाणपत्र संबंधीत संशोधकाचे मार्गदर्शक विद्यापीठीय नमुन्यानुसार तर प्रतिज्ञापत्र संशोधक विद्यापीठीय नमुन्यानुसार स्वाक्षरी कृत करतात, ऋणनिर्देश संशोधक आपल्या संशोधकास ज्यांनी सहकार्य केले आहे त्याच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करण्यासाठी मांडतो. अणुक्रमणिकेमध्ये प्रथम भाग हा प्राथमिक विभागाचा असतो तेथे पृष्ठ क्रमांकावर रोमन अंकांची मांडणी करतो तर दुसऱ्या भागात संशोधनाचा मुख्य विभागाची मांडणी प्रकरण योजना व पृष्ठ क्रमांक या स्वरूपात तर शेवटी संदर्भ विभागाचे पृष्ठ क्रमांक दर्शवतो त्यानंतर कोष्टके व आकृत्यांची सूची सादर केली जाते.

**मुख्य विभाग :** संशोधन अहवालाचा मुख्य विभाग हा संशोधन दृष्टया फार महत्वाचा विभाग आहे वेगवेगळया प्रकरणात मांडणी केलेली असते. प्रकरण योजनेमध्ये

**अ) प्रस्तावना** – समस्येचे वर्णन, संशोधनाचा उद्देश, संशोधकाचे क्षेत्र यासंबंधीची माहिती असते.

**ब) संशोधन पध्दती** – तथ्य संकलन पध्दती, नमुनानिवड पध्दती, संशोधन कार्याचे संघटन यासंबंधी विस्तारवार मांडणी केलेली असते.

**क) विश्लेषण आणि निर्वचन** – संकलीत तथ्यांचे सांकेतीकरण – सादरीकरण, कथन, प्रस्तुतीकरण केले जाते विश्लेषणात कार्यकारणभाव स्पष्ट केले जातात, लेखांचा वापर सांख्यीकीय विश्लेषण, तुलनात्मक मांडणी केली जाते.

**ड) सारांश व निष्कर्ष** – संशोधन प्रकरणांचा सारांशाने आढावा, गृहीतकांची पडताळणी, संशोधन निष्कर्षाचे प्रतिपादन, शिफारसी व उपाय योजनांची मांडणी केलेली असते.

**अंतिम विभाग/संदर्भ विभाग** – संशोधन अहवालाच्या या विभागात संशोधकाने संशोधनासाठी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष उपयोग केलेल्या संदर्भीय साहित्याची मांडणी केलेली असते ही मांडणी A B C D अशी क्रमवार असते सांधनांची मांडणीही क्रमवार असते. सूचीपत्रामध्ये संकल्पना संज्ञा पारिभाषीक शब्द, घटना कोणत्या पृष्ठावर आहेत त्याची मांडणी असते तर परिशिष्टामध्ये तथ्य संकलन स्त्रोताची माहिती परिशिष्टात दिलेली असते तसेच संशोधनाच्या मुख्य भागात जी माहिती पूर्णपणे देणे शक्य नसते अशी माहिती आकडेवारी जर महत्वाची वाटत असेल ती परिशिष्टात दिली जाते संशोधनाच्या मुख्य भागात पृष्ठाच्या शेवटी तळटिपा म्हणून संदर्भीय माहिती विस्तृत सादरीकरणासह दिली जाते. 18 Recomandetion अंतर्गत संशोधकाकडून भविष्यात संशोधनासाठी वाव असणाऱ्या विषयांची यादी दिली जाते.

संशोधन अहवाल आदर्श बनण्यासाठी तो खालील वैशिष्टयांनी परिपूर्ण असावा संशोधन अहवालाची बांधणी आकर्षक असावी स्पष्ट व संतुलित भाषेचा वापर केलेला असावा तथ्याची क्रमवार मांडणी, तर्कशुध्द प्रतिपादन केलेले असावे, तथ्याचे शास्त्रीय पध्दतीने विश्लेषन व निर्वचन व तथ्याच्या स्त्रोतांचे संदर्भ

संशोधन अहवालात नमूद केलेले असावेत संशोधन करताना आलेल्या अडचणी समस्याचा उल्लेख असावा, संशोधनाची व्याप्ती, पध्दती व तंत्राचा स्पष्ट विवरणात्मक उल्लेख असावा संशाधन अहवाल सर्वसामान्य लोकांना उपयुक्त बनणारा व त्यातून नवीन संकल्पना व सिध्दांताचा विकासाचा प्रयत्न करणारा असला पाहीजे.

### ४.२.२ **संशोधन निबंध लेखन** (Research Paper Writing)

संशोधन निबंध अथवा लेखाचे लिखान ही सामाजिक शास्त्रीय संशोधनातील संशोधन पेपर व लेख ही महत्वाची अवस्था आहे. उच्च शिक्षणातील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील तो अविभाज्य व अनिवार्य भाग बनला आहे. सामाजिक संशोधनातील राज्यशास्त्रीय संशोधनात संशोधकास ज्या राजकीय समस्यांना सामोरे जावे लागते. त्या समस्येची शास्त्रीय कारणमिमांसा करून ती सोडवण्यासाठी उपाययोजना सूचवणेच्या हेतूने संशोधन करून निबंध रूपाने मांडणी करतो. उच्चशिक्षण देणाऱ्या संशोधन संस्थामधून संशोधनाचे कार्य निरंतर होत असते. तेथील संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक आपआपल्या विषयास अनुसरून निर्माण झालेल्या, अस्तित्वात असलेल्या समस्येवर संशोधन करीत असतात. या घटकांना संशोधन निबंध लिहिणे बंधनकारक असल्यामुळे त्याचे कडून संशोधनाचे कार्य सातत्याने सुरू असते. संशोधन निबंधाचे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरीय चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळामधून वाचन केले जाते. यासाठी ICSSR किंवा युजीसी तसेच विद्यापीठाकडून प्रोत्साहनपर अनुदान प्रदान केले जाते. सदर संशोधन निबंध ISSN मान्यताप्राप्त संशोधन पत्रीका (Research Journal) किंवा ISBN नंबरप्राप्त शोधपुस्तीका मधून प्रकाशित केले जातात. संशोधन संस्थांकडून या प्रक्रीयेवर नियंत्रण असते.

संशोधक विद्यार्थ्यासाठी संशोधन निबंधाचे चर्चासत्रातून वाचन आणि मान्यताप्राप्त जर्नल मधून ते प्रसिध्द झालेशिवाय त्यांना प्रबंध जमा करता येत नाही. तर प्राध्यापकांना आपला वार्षिक स्व अहवाल (Annual self Apprisal Report) देताना त्यामध्ये संशोधन निबंधाचे सादरीकरण / वाचन आणि संशोधन पत्रीकेत प्रसिध्दी अनिवार्य करण्यात आली आहे. त्याचे गुण त्यांना प्रदान केले जातात बढतीसाठीही संशोधन निबंधाची प्रसिध्दी ही अट आहे. त्यामुळे उच्चशिक्षण व्यवस्थेमध्ये संशोधन निबंध / लेख (Research Paper or Articles) लिहीले जातात ते १५०० ते ३००० शब्दापर्यंत लिहीले जातात.

समाजामध्ये अस्तीत्वात असलेल्या सर्व प्रकारच्या समस्या, प्रश्न, अडचणी, घटना, संघर्ष, परिस्थीती, भूमिका, विचार तसेच नव्याने निर्माण झालेले प्रश्न, समस्या, आव्हाणे याचे समाधानकारक उत्तर शोधण्यासाठी, परिक्षण करण्यासाठी शास्त्रीय पध्दतीने चिकीत्सक व पध्दतशीर अभ्यास क्रमबध्द प्रक्रीयेद्वारे संशोधन निबंधात केला जातो. एखादी समस्या का? केव्हा? कशी? कोणी? निर्माण केली त्याच्या अनुषंगाने राजकीय, सामाजिक, आर्थिक, नैतिक, सांस्कृतीक असे पैलू लक्षात घेऊन सामान्य नियमांचे व निष्कर्षाचे आणि उपाययोजनांचे प्रतिपादन संशोधन निबंधाद्वारे केले जाते. ही एक बौध्दिक प्रक्रीया असून जुण्या ज्ञानातील उणीवा दूर करून ज्ञानात भर घातली जाते. त्यातून मानवाचा सामाजिक स्तर उंचावतो संशोधकाच्या भविष्यकालीन प्रगतीस उपकारक ठरतो व त्यास नवीन संशोधनासाठी प्रेरणा मिळते.

प्रश्न समस्येचे समाधानकारक उत्तर शोधण्यासाठी वैज्ञानीक पध्दती, उपकरणे या आधारे सुक्ष्म अध्ययन केले जाते. घटकातील कार्यकारण सबंध तपासले जातात. गृहीतकांचा आधार घेऊन त्याचे परिक्षण करून प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांच्या आधारे मांडणी केली जाते संशोधनाद्वारे नविन विचार, तत्व, नियम व सिध्दांताचे प्रतिपादन केले जाते.

संशोधनात जिज्ञासेस महत्त्व असते. एखाद्या प्रश्न समस्येचे समाधानकारक उत्तर शोधण्यासाठी केलेल्या संशोधनातून दूसऱ्या अनेक अनपेक्षीत समस्या निर्माण होतात त्यासाठी पुन्हा नव्याने संशोधन करावे लागते म्हणून संशोधन ही कधी न संपणारी प्रक्रीया आहे. यातून जुण्या ज्ञानातील उणीवा दूर करून ज्ञानात सातत्याने भर घातली जाते. व्यवस्थीत व वास्तवीक रूपात मांडणी केली जाते.

➢ संशोधन निबंध लेखनाचा आकृतीबंध

अ) प्राथमिक विभाग

१) संशोधन समस्या

२) संशोधकाचे नांव, विषय/विभाग

३) संशोधक कार्यरत संशोधन संस्थेचे नांव

४) ई-मेल व मोबाईल नंबर

ब) मुख्य विभाग

१) सारांश / गोषवारा

२) प्रस्तावना

३) बीज संज्ञा

४) संशोधनाचा उद्देश

५) संशोधनाची गृहीतके

६) संशोधन पध्दती व तथ्य संकलन

७) संशोधनाचे क्षेत्र व महत्व

८) संशोधन साहित्याचे पुनरावलोकन

९) संशोधन विषय विवेचन (तथ्याचे विश्लेषन निर्वचन व सादरीकरण)

१०) संशोधन निष्कर्ष व उपाययोजना

क) संदर्भ विभाग

१) संदर्भ सूची

२) संदर्भ ग्रंथसूची

वरील प्रक्रीयेद्वारे संशोधन निबंधाचे लेखन केले जाते हा आकृतीबंध संशोधकाला संशोधन निबंध लिहीताना व सादर करताना मार्गदर्शक ठरतो. उत्कृष्ठ संशोधक निबंधासाठी संशोधकाने समतोल व नि:संधीग्ध भाषेचा वापर करावा, क्रमबध्द रितीने मांडणी करावी, तथ्याचे विश्लेषन निर्वचन करून व्यावहारीक उपयोगी प्रतिपादन करावे, संशोधन पध्दती, अध्ययन क्षेत्र, नमुन्याचे प्रकार तथ्य संकलन साधने, उद्दीष्टे व गृहीतकाचा समावेश करून संशोधन करताना आलेल्या अडचणी मांडाव्यात संख्याशास्त्रीय विश्लेषन करताना सारण्या, तक्ते, आलेख यांचा वापर करावा.

### ४.२.३ संदर्भ ग्रंथ सूची, संदर्भ सूची आणि परिशिष्ट

#### ४.२.३.१ संदर्भ ग्रंथ सूची व संदर्भ सूची

संशोधकाने संशोधनास सुरुवात केल्यापासून ते संशोधन पूर्ण करून अहवाल लेखन करीत असताना ज्या संदर्भिय साहित्याचे वाचन, आधार व वापर केला आहे. त्याची मांडणी विशिष्ट क्रमाने व पद्धतीने संशोधन अहवालाच्या शेवटी संदर्भग्रंथ सूची तर प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी संदर्भ सूचीत लिहिली जाते.

संशोधन प्रक्रियेमध्ये संदर्भ साधनांचा शोध हा जसा महत्त्वाचा टप्पा आहे. त्याचप्रमाणे ज्यातून संदर्भ मिळालेले आहेत त्याची सुची तयार करणे हे सुध्दा संशोधन पद्धतीचे वैशिष्ट्य आहे, नव्हे अविभाज्य अंग आहे. संशोधनकर्ता संशोधन कार्य प्रदीर्घ श्रमाने पूणत्वास नेत असतो. विषय निश्चिती पासून गृहीतक, संशोधन आराखडा, नमुना निवड पद्धती, तथ्य संकलन व त्याचे विश्लेषण, त्याची व्यवस्थित मांडणी व त्यातून समोर आलेले निष्कर्ष या सर्वांचा समावेश अहवाल लेखनात करावा लागतो. संशोधनकर्ता आपल्या संशोधन कार्यात आपल्या विषयाला अनुसरून विविध मुद्रित किंवा अमुद्रित बाबींचा आढावा घेत असतो. तत्संबंधी सुची तयार करण्याचे कार्य संशोधनकर्ता करीत असतो. म्हणूनच याला 'संशोधनाचा आधारभूत घटक' (Reference Material) असेही म्हणतात. संदर्भसूची तयार करतांना त्याबदल पूर्वतयारी म्हणून साधनांच्या व उपलब्ध ग्रंथ सामुग्रीची सूची बनविण्याच्या प्रक्रियेत संशोधन कार्याच्या सुरुवातीपासून ग्रंथाची नोंद घ्यावी लागते.

**सामाजिक शास्त्रांमधील संदर्भ पद्धती:–**

सध्या वेगवेगळ्या अभ्यास क्षेत्रामध्ये व्यावसायिक व संशोधनात्मक संस्थांनी आपआपल्या क्षेत्रातील लेखन व संशोधनासाठी काही पद्धती रूढ केलेल्या आहेत. अमेरिकेतील विद्यापीठांनी व व्यावसायिक संस्थांनी तसेच त्यांनी चालविलेल्या संशोधनात्मक नियतकालिकांनी आपआपल्या क्षेत्रासाठी विभिन्न संशोधन, पद्धती विकसीत केलेल्या आहेत आणि त्यांना आंतरराष्ट्रीय मानदंड म्हणून मान्यताही मिळालेली आहे.

- मॉर्डन लँग्वेज असोसिएशन हॅव अमेरिका या संस्थेने निश्चित केलेले लेखनशास्त्र एमएलअे स्टाईल सीट आणि हँण्डबुक फॉर राइटस हॅव रिसर्च पेपर यांच्या रुपात उपलब्ध आहे. साहित्य कला व इतर मानवविद्या या क्षेत्रामध्ये संशोधनाच्या प्रकाशनासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर हे संकेत मोठ्या प्रमाणात वापरले जातात.

- अमेरिकन सायकोलॉजीकल असोसिएशन या संस्थेने निश्चित केलेले लेखनशास्त्र किंवा संकेत पुरविणारे एपीए पब्लीकेशन मॅन्युअल हे मानसशास्त्र, शिक्षणशास्त्र आणि इतर सामाजिक शास्त्रांमधील संशोधनाच्या प्रकाशनासाठी वापरले जाते.

- शिकागो विद्यापीठाने 'द शिकागो मॅन्युअल अव्ह स्टाईल' या पुस्तकाद्वारे जे लेखनशास्त्र रूढ केलेले आहे ते प्रामुख्याने संशोधन व विद्वता यांच्या पलीकडे प्रत्यक्ष वा वास्तव जगाविषयी जे लेखन चालते. म्हणजेच वतर्मानपत्रीय लेखन तसेच सर्वसामान्य वाचकांसाठी लिहिलेले पुस्तक इत्यादीसाठी हे लेखनशास्त्र प्रामुख्याने वापरले जाते.

इंटरनेटवर आता ग्रंथ, नियतकालिके वैगेरे प्रचंड साठे उपलब्ध आहेत. या साधनांचे संदर्भ देण्यासाठी सुस्पष्ट व सोपी पद्धती वापरणे गरजेचे बनले आहे. वापरलेले विशिष्ट संदर्भ इंटरनेटवर पाहिले तर त्याची नोंद घ्यावी लागते. आणि इंटरनेटवर कोणत्या स्थळावर ते उपलब्ध झाले त्याचा संगणकीय पता दयावा लागतो. याला संगणकीय भाषेत U. R. L. यु. आर. एल. (युनिव्हर्सल किवां युनिफॉर्म रिसोर्स लोकेटर) असे म्हणतात.

उदा. Harlack, Andraw Eugene Keppinger online ! a reference quid to wing internet resources २००३ Retrieved jully २५, २००६ from http:// www.bedfordstamritns.com/online/index.html

http://www.bedfordstamritns.com/online/index.html>. येथे विशिष्ट संकेत स्थळावर उपलब्ध असणारा माहितीचा साठा विशिष्ट संगणकीय प्रक्रियेमुळे दुसऱ्या स्थळावर स्थलांतरीत केला जातो व त्यामुळे साधनांचा संगणकीय पता नीट समजावून घेणे आवश्यक आहे. ही संपूर्ण पद्धत आत्मसात करण्यासाठी मराठीमध्ये संशोधकाला आता वरच्या पातळीवरची संगणकीय क्षमता अंगी बानविली पाहिजे. त्यामुळे संगणकाचा वापर संशोधनात करुन इंटरनेटचा संदर्भ शोध व संदर्भ सूची बनविणे अधिक सुलभ होईल.

प्रत्येक विषयाच्या अभ्यास मंडळाकडून कोणती पद्धती संदर्भ देण्यासाठी वापरावी हे निश्चित केले जाते. राज्यशास्त्र विषयासाठी (American Psychologcal Association) द्वारा प्रमाणित APA पद्धतीचा अवलंब करावा अशी शिफारस केलेली आहे.

- **संदर्भग्रंथ सूची** (Biblography) **:**

संशोधन विषय किवां पद्धतीच्या संदर्भात संशोधनकर्ता अगदी सुरुवातीपासून अखेरपर्यंत जी पुस्तके, नियतकालिके, वृत्तपत्रे, अहवाल लेखन कागदपत्रे असे प्रकाशित व अप्रकाशित साहित्य जे वाचले असेल व संशोधन प्रक्रियेमध्ये ज्या साहित्यांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष उपयोग केला गेला असेल अशा सर्व साहित्यांचा एका विशिष्ट क्रमाने व विशिष्ट पद्धतीने तयार केलेली यादी म्हणजे ग्रंथसूची होय किंवा संदर्भ ग्रंथ साहित्य सूची होय.

**संदर्भग्रंथ सूची म्हणजे काय ?**

ज्या ज्या लिखित स्त्रोतातून संशोधन तथ्य सामुग्री संशोधणासाठी संकलित केलेली आहे त्यांचे संक्षिप्त विवरण ज्यामध्ये सूचित केले जाते त्याला संदर्भग्रंथ सूची (Bibliography) एके म्हणतात. मुद्रित, प्रकाशित किवा अप्रकाशित अशा सर्व लिखित तथ्य सामुग्रीचा उपयोग संशोधक संशोधन कार्यात करीत असतो. ग्रंथसूचीमध्ये समाविष्ठ करण्यात आलेली सामुग्री ही क्रमाने व व्यवस्तिथपणे संग्रहित केली जाते. संदर्भग्रंथ सूचीमध्ये सामुग्रीचे संक्षिप्त विवरण देतांना संशोधनकर्ता टअकारविल्हा पद्धतीचाथ (Alphabetical System) वापर करतो.

अकारविल्हा पद्धतीला इंग्रजी मध्ये Alphabetical System असे म्हणतात. संदर्भग्रंथ सूची मध्ये या पद्धतीचा अवलंब केला जातो. संशोधनकर्ता संदर्भग्रंथ सूची तयार करीत असतांना संदर्भ् ग्रंथाचा क्रम अकारविल्हा पद्धती स्वरुपात लावीत असतो. या पद्धतीमध्ये संदर्भग्रंथांचा क्रम मराठी वर्णमालेतील अक्षराप्रमाणे किंवा इंग्रजी वर्णमालेच्या अक्षराप्रमाणे लावला जातो. उदा. संशोधनकर्ता आपल्या विषयाला अनुसरून संशोधन करीत असेल तर त्याने वापरलेल्या एकूण ग्रंथाची सूची तयार करून त्या सूचीचा अकारविल्हा पद्धतीप्रमाणे सुरुवातीला अ किंवा A अक्षरांनी सुरुवात असणाऱ्या ग्रंथाची यादी संशोधक तयार करतो. नंतर ब किवा B अक्षराने सुरुवात असणाया ग्रंथाची यादी तयार केली जाते.

**संदर्भग्रंथ सूचीची वैशिष्ट्ये:-**

१) ग्रंथसूचीमध्ये ग्रंथसूचीचा क्रम अकारविल्हा पद्धतीनुसार लावण्यात येतो.

२) संशोधन अहवालामध्ये एकाच ग्रंथाचे अनेक संदर्भ येऊ शकतात परंतु ग्रंथ सूचीमध्ये त्या ग्रंथाचा उल्लेख एकदाच केला जातो.

३) संशोधनासाठी संग्रहित केलेल्या तथ्य सामुग्रीचे संक्षिप्त विवरण ग्रंथसूचित संशोधक देतो.

४) भविष्यात संशोधन करणाऱ्या संशोधनकर्त्यांला मार्गदर्शक म्हणून ग्रंथसूची तयार केली जाते.

**आकृतिबंध:-**

१. संदर्भग्रंथ सूची क्रम मांडावा लागतो. त्याचप्रमाणे संदर्भग्रंथ सूची तयारी करताना ती संदर्भग्रंथ सूची पुढील आकृतीबंधात तयार केली जाते.

| अनु. क्र. | लेखकाचे आडनाव व नाव | प्रकाशन वर्ष कंसात | पुस्तकाचे नाव | आवृत्ती | प्रकाशक व स्थळ |
|---|---|---|---|---|---|

उपरोक्त आकृतीबंधाच्या सहाय्याने संदर्भग्रंथ सूची तयार केली जाते. ग्रंथसूचीला पुढील विभागात विभाजित करण्यात येते.

१) संदर्भ ग्रंथ व पुस्तके

२) संशोधन पत्रिका

३) नियतकालिके

४) अहवाल

५) दस्तावेज

६) अप्रकाशित स्त्रोत

संदर्भ ग्रंथसूचीला उपरोक्त क्रमाने टाकून त्याची सविस्तर मांडणी केली जाते.

- **संदर्भ सूची** (Reference)

संशोधक आपल्या अहवालामध्ये विविध महत्त्वपुर्ण संज्ञा, संकल्पना, शब्द व घटनांचा समावेश करीत असतो. महत्त्वपूर्ण परंतु विषयाशी संबंधित संदर्भाचा उपयोग आपल्या अहवालात संशोधन करीत असतो. हे संदर्भ कोणत्या ग्रंथातून घेण्यात आले त्याचे तपशिलवार विवेचन संदर्भ सूचीमध्ये केले जाते. संदर्भ सूची पारंपारिक पद्धतीनुसार १, २, ३, असा अनुक्रमाक देऊन ज्यात्या पृष्ठाच्या किंवा प्रकरणाचा शेवटी दिली जात होती विषयाच्या अभ्यास मंडळाकडून मान्यता प्राप्तीनंतर कोणत्या संदर्भीय पद्धतीचा संशोधनासाठी वापर करावा हे सूचीत केले जाते. राज्यशास्त्र विषयासाठी APA पद्धतीचा अवलंब केला जातो. यानुसार जेथे संदर्भ दिला जातो. संदर्भीय लेखकाच्या पुस्तकांच्या ग्रंथाचे संदर्भ ज्या ज्या ठिकाणी खालीलप्रमाणे दिले जातात तेथे (तोडकर, (२०१२) पृ. क्र. २५) अशी नोंद करून त्याचे विस्तृत विवेचन अहवालाच्या शेवटी किंवा प्रकरणाच्या शेवटी संदर्भीय पुस्तके दिली जातात. संदर्भसूची तयार करीत असतांना.

१) ग्रंथकाराचे नाव २) प्रसिद्धीकाळ ३) ग्रंथाचे नांव ४) संपादक व भाषांतरकार ५) आवृतीचा उल्लेख ६) प्रसिद्धीचे ठिकाण ७) प्रकाशन संस्थेचे नांव ८) पृष्ठक्रमांक यांचा उल्लेख महत्वपूर्ण ठरतो. उदा. तोडकर बी. डी. (२०१२) आंतरराष्ट्रीय संबंध, प्रथमावृत्ती, डायमंड पब्लिकेशन्स,पुणे, पृ. क्र.२८

वरीलप्रमाणे संदर्भ सूची मध्ये उपरोक्त संदर्भ कोणत्या ग्रंथातून घेण्यात आले तसेच तो संदर्भ कोणत्या पृष्ठक्रमांकावर आहे. याचा समावेश केला जातो. त्या करिता सर्वमुद्रित किवा अमुद्रीत सामुग्री, नियतकालीकेतील लेखांचा संदर्भ, लेखसंग्रहातील लेख संदर्भ, कोषांतर्गत स्वाक्षरीयुक्त लेखांचा संदर्भ, ग्रंथालयीन हस्त लिखितांचा संदर्भ, खाजगी पत्राचा संदर्भ इत्यादी सामुग्रीचा उपयोग संशोधक करीत असतो.

संदर्भ सूची देण्यामागील उद्देश हा मूळ संशोधकाच्या प्रती आदर व्यक्त करणे त्यास त्यांच्या शोध मताबद्दल श्रेय देणे, मुळ संकल्पना व्यक्त करणाऱ्या व्यक्तीची व त्याच्या साहित्याची शोधाची मताची ओळख करून देणे किंवा एखादे मत खोडून काढणे, दुरुस्त करणे हा असतो.

**परिशिष्ट** (Appendix)

परिशिष्ट ही एक संशोधन क्षेत्रातील संज्ञा आहे. परिशिष्ट म्हणजे पुस्तकांच्या किंवा अहवालाच्या मागील भागात शेवटी जोडलेला संदर्भ विभाग होय. जो मुख्य मजकुरासाठी अतिरिक्त किवां पूरक माहिती प्रदान करतो. एखादे पुस्तक, लेख, संदर्भ ग्रंथ, संशोधन अहवाल, किवा इतर तत्सम गोष्टीचा तो भाग ज्यामध्ये अशा गोष्टी असतात. की ज्या काही कारणास्तव त्याचा योग्य ठिकाणी जसाचा तसा समाविष्ट केला जावू शकत नाही आणि तो भाग त्या संशोधनात समाविष्ट न केल्यास ते अपूर्ण राहू शकते. म्हणून सदर भाग योग्य ठिकाणी दर्शवणे गरजेचे असते. त्यामुळे संशोधनाला पूर्णत्व प्राप्त होते हा भाग परिशिष्टाच्या रूपाने संशोधनाच्या शेवटी अंतिम भाग म्हणून समाविष्ट केला जातो हा भाग संशोधनास उपयुक्त किवा पूरक म्हणून समजला जातो.

परिशिष्ट म्हणजे संशोधनातील मुख्य भाग नव्हे परंतु संदर्भा संबधी अधिक माहिती देणारा तो कच्चा डेटा किवा माहितीचा भाग असतो. तो प्रबंधातील मुख्य युक्तीवाद समजून घेण्यासाठी आवश्यक असतो परंतु तो मुख्य मजकुरात समाविष्ट करणे अनुचित असते. संशोधक संशोधन निष्कर्षाच्या समर्थनार्थ विविध परिशिष्टे टाकत असतो. संशोधन अहवालात, संदर्भ ग्रंथात, लेखात, पुस्तकात संशोधक लेखक जिथे जिथे वाचकाला अतिरिक्त माहिती हवी असल्यास जर संदर्भ उध्दरण किवां टिपा टाकल्या असतील तर त्यासाठी तो तिथे परिशिष्ट १ पहा अथवा परिशिष्ट २ पहा असे सूचित करतो ज्यामुळे वाचकास संबधीत बाबीची विस्ताराने व अधिकची माहिती उपलब्ध होते व त्या संदर्भातील त्याच्या शंकाचे निरसण होते, समाधान होते. प्रत्येक परिशिष्टास शिर्षक व क्रमांक वर्णानुक्रमे द्यावा. उदा. परिशिष्ट – १, २ परिशिष्टाचे क्रमांक व शिर्षक अनुक्रमणीकेत घालणे आवश्यक असते.

संशोधनाच्या शेवटी जोडलेले हे लेख म्हणजेच परिशिष्ट यामध्ये सांखीकीय आकडेवारी, लिखित स्पष्टीकरण, कथा, अवतरण, छायाचित्रे, मुलाखत सूची, अनुसूची, प्रश्नावली, नमुना, टेबल, सारण्या, टिपा, नकाशे, तकते, चित्रे, शब्द, वाक्यप्रचार, दृश्य साधने, पुस्तके, लेख, दस्तऐवज, ग्रंथसूची, उध्दरण, सारांश, इत्यादी सारख्या विस्तृत सामुग्रीचा समावेश असू शकतो. वरील प्रकारच्या बाबी संशोधक संशोधन निष्कर्षाच्या समर्थनार्थ विविध परिशिष्टाच्या रूपाने ठेवत असतो. प्रत्येक पृष्ठावर स्वतंत्र परिशिष्ट टाकणे अनिवार्य असते.

परिशिष्ठ लिहिताना खालील बाबी लक्षात ठेवणे आवश्यक असते.

१. प्रासंगिकता: परिशिष्टात केवळ मुख्य मजकुराशी सबंधित असलेली माहिती समाविष्ट करावी.

२. संदर्भाता: परिशिष्टातील माहिती तार्किक व अनुसन करण्यास सोप्या पद्धतीने आयोजित केल्याची खात्री करावी.

३. स्पष्टता: माहिती स्पष्ट व संक्षिप्त पद्धतीने सादर करावी आणि समजण्यास सोपी असल्याची खात्री करावी.

४. लेबलिंग: प्रत्येक परिशिष्टाला स्पष्ट आणि वर्णनात्मक शीर्षक आणि क्रमांकासह लेबल करा आणि मुख्य मजकूरात प्रत्येक परिशिष्टाचा संदर्भ समाविष्ट करा.

५. सुसंगतता: परिशिष्टाचे स्वरूप आणि शैली मुख्य मजकुराशी सुसंगत असल्याची खात्री करा.

६. पृथक्करण: परिशिष्टातील माहिती मुख्य मजकुरापासून वेगळी ठेवा आणि दोन्ही मधील फरक ओळखणे सोपे आहे याची खात्री करा.

७. प्रवेश योग्यता: सामग्रीची सूची देऊन किंवा मुख्य मजकुराचे स्पष्ट संदर्भ समाविष्ट करून परिशिष्टातील माहिती वाचकाला सहज उपलब्ध आहे याची खात्री करा.

परिशिष्टाचा उद्देशच मुळात अतिरिक्त संदर्भ माहिती प्रदान करणे, मुख्य मजकुरातील माहिती स्पष्ट करणे, किंवा मुख्य युक्तिवादाचे समर्थन करणे हा असतो त्यामुळे परिशिष्टाव्दारे वाचकांना अतिरिक्त भरपूर माहिती प्रदान केली जाते आणि संशोधनाचा आशय बळकट केला जातो.

## ४.३ सारांश

समाजशास्त्रीय व राज्यशास्त्रीय संशोधनामध्ये संशोधकाने आपल्या संशोधन अहवालाचे लेखन कशा पद्धतीने करावे याचे शास्त्रशुद्ध विवेचन या प्रकरणाद्वारे अभ्यासकांना प्राप्त झाले आहे. अहवाल लेखन व संशोधन पेपर लिहिताना कोणकोणत्या पायऱ्यांचा वापर संशोधकाने करणे गरजेचे आहे. तसेच संशोधन निष्कर्ष व उपाययोजना कशा पद्धतीने सामाजिक व राजकीय समस्या सोडवण्यासाठी उपकारक ठरू शकतात याची मांडणी केली आहे. तसेच संदर्भ देताना कशा पद्धतीने दिले पाहिजेत, संदर्भग्रंथ सूची व परिशिष्टाची मांडणी समाजशास्त्रीय संशोधनासाठी का गरजेची आहे व ती देण्याची पद्धत सूचवली आहे.

## ४.४ पारिभाषीक शब्द व शब्दार्थ

१. **तथ्य** – संशोधनास उपयुक्त माहिती.

२. **प्रबंध** – संशोधन पदवीसाठी सादर केलेला अहवाल.

३. **संदर्भ** – माहिती जेथून प्राप्त केली त्याबाबत माहिती.

४. **परिशिष्ट** – उपयुक्त माहितीचे विस्तीर्ण सादरीकरण

## ४.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न व उत्तरे

१. संशोधन अहवालाच्या प्राथमिक विभागात कोणत्या गोष्टी येतात?

उत्तर : प्रथमपृष्ठ, प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र, ऋणनिर्देश, अनुक्रमणिका, सूची

२. संशोन म्हणजे काय?

उत्तर : संशोधकाने समाजात निर्माण झालेली समस्य सोडवण्यासाठी केलेले संशोधन.

३. संशोधन पेपर कोठे सादर केले जातात?

उत्तर : चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद

४. संशोधन पेपर कोठे प्रसिद्ध केले जातात?

उत्तर : ISSN जर्नल मध्ये किंवा ISBN पुस्तीकामध्ये

५. संदर्भ का दिले जातात?

उत्तर : यापूर्वी ज्या संशोधकाने संशोधन केले आहे त्याचे श्रेय त्याला द्यावे म्हणून संदर्भ दिले जातात.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

१) शोध निबंधाचा आकृतीबंध स्पष्ट करा.

२) अहवाल लेखनाचे स्वरूप स्पष्ट करा.

३) संदर्भ ग्रंथसूची व संदर्भ सूची म्हणजे काय व ती देण्याची रित स्पष्ट करा.

४) परिशिष्ट म्हणजे काय?

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :-


१) बोधनकर व प्रा. अलोनी (२००७) सामाजिक संशोधन पद्धती, चतुर्थ आवृत्ती श्री साईनाथ प्रकाशन नागपूर,

२) डॉ. जरारे (२००४) संशोधन प्रणाली, आवृत्ती पहिली अद्वैत प्रकाशन गजानन पेठ अकोला.

३) कऱ्हाडे बी. एम. (२००७) शास्त्रीय संशोधन पद्धती पहिली आवृत्ती पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

४) पाटील व्ही. बी. (२०१२) संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.


❑❑❑